अकोला । शनिवार
दि. ३१ मे २०२५
वर्ष : १९ अंक : ९०
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




## थोडक्यात

### बाबा रामदेव यांच्या 'पतंजली'ला सरकारची नोटीस



**नवी दिल्ली :** बाबा रामदेव यांच्याशी संबंधित पतंजली आयुर्वेद लिमीटेड कंपनीच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण केंद्र सरकारने या कंपनीला फेडरल इकॉनॉमिक इंटेलिजन्स एजन्सीनी उघड केलेल्या संशयास्पद आर्थिक व्यवहारांबद्दल स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे. ब्लूमबर्गने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने फर्मला यासंबंधीची नोटीस बजावली असून संभावित निधी वळवणे आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे उल्लंघन यासंबंधीचा तपास केला जात आहे. यंत्रणांच्या रडारावर आलेले योगगुरू रामदेव यांच्या कंपनीचे व्यवहार हे असामान्य आणि संशयास्पद असल्याचे म्हटले जात आहे. असे असले तरी तपास सुरू असल्याने या व्यवहारांची रक्कम मात्र उघड करण्यात आलेली नाही. तसेच मंत्रालयाच्या या नोटीसला उत्तर देण्यासाठी पतंजलीला सुमारे दोन महिन्यांचा वेळ देण्यात आला आहे. गेल्या काही काळापासून पतंजली आयुर्वेद ही कंपनी चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे.

### कोल्हापूर जिल्हा बँक आणि गोकुळवर मुश्रीफ राज!



**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळमध्ये गेल्या महिन्याभरापासून घडलेल्या प्रचंड नाट्यमय घडामोडींनंतर अखेर अध्यक्षांची निवड झाली आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव नावेद मुश्रीफ यांची अध्यक्षपदावर वर्णी लागली आहे. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून चर्चेत असलेली सर्व नावे केवळ चर्चेतच राहिली. पहिल्यांदाच गोकुळमध्ये संचालक झालेले नावेद मुश्रीफ थेट अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. सतेज पाटील यांनी देखील या नावाला मान्यता देत त्यांच्या मित्राचाच म्हणजे हसन मुश्रीफ यांच्या मुलालाच अध्यक्ष केले असून महाडिक आणि भाजपला अध्यक्षपद आणि गोकुळपासून लांब ठेवण्यात यश मिळवले आहे.

# सरकारी अभियंत्याच्या घरावर छापा; २.१ कोटींची रक्कम जप्त!

## खिडकीतून फेकले नोटांचे बंडल

**भुवनेश्वर, दि. ३०** वृत्तसंस्था

ओडिशामधील भुवनेश्वरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका अपार्टमेंटच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल खाली पडू लागल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यानंतर काही जण नोटा गोळा करण्यासाठी धावले तर काहींनी व्हिडीओ रेकॉर्ड केला. ही घटना गुरुवारी घडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या घटनेची ओडिशामध्ये मोठी चर्चा रंगली आहे. तसेच एका सरकारी अभियंत्याच्या घरावर छापा टाकल्यानंतर सापडलेल्या २.१ कोटी रुपयांच्या घटनेनंतर प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

ओडिशामध्ये भ्रष्टाचाराच्या विरुद्ध सतत कारवाई करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवरच ओडिशा व्हिजिलन्स विभागाने भुवनेश्वरमधील बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता (रस्ते) बैकुंठ नाथ सारंगी यांच्याशी संबंधित वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. तेव्हा तब्बल २.१ कोटी रुपयांहून अधिक किमतीची बेहिशेबी रोकड जप्त करण्यात आली. या अभियंत्यावर बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याच्या आरोप झाला होता, त्यानंतर छापे टाकण्यात आले असता ही रक्कम जप्त करण्यात आली आहे. (पान २ वर)



### ७ ठिकाणी एकाच वेळी छापे

» ओडिशा व्हिजिलन्सच्या पथकाने भुवनेश्वर, अंगुल आणि पिपलीसह ७ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. या संपूर्ण कारवाईत दक्षता विभागाच्या ७ पथकांचा सहभाग होता आणि ५० हून अधिक अधिकारी उपस्थित होते. शोधासाठी २६ पोलिस अधिकाऱ्यांची एक टीम तयार करण्यात आली होती, ज्यामध्ये आठ पोलिस उपअधीक्षक (डीएसपी), १२ निरीक्षक आणि सहा सहाय्यक उपनिरीक्षक (एएसआय) आणि इतर सहाय्यक कर्मचारी होते. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.

### छाप्यांमध्ये जप्त केलेली मालमत्ता

- ₹२.१ कोटी रोख.
- महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि फर्निचर.
- मौल्यवान दागिने.
- जमीन आणि फ्लॅटशी संबंधित कागदपत्रे.
- अनेक बँक खाती आणि लॉकर्सची माहिती

# फटाक्याच्या कारखान्यात स्फोट

## पाच जण ठार; २५ जखमी



**चंदिगड, दि. ३०** वृत्तसंस्था

पंजाबमधील श्री मुक्तसर साहिब जिल्ह्यातील एका गावात शुक्रवारी सकाळी फटाका कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटात पाच जणांचा मृत्यू झाला आणि २५ जण जखमी झाले. ही घटना सिंगावाली-कोटली मार्गावरील दोन मजली काखान्यात घडली. स्फोटामुळे कारखान्याची दोन मजली इमारत कोसळली. फटाका हाताळणीत हयगय झाल्यामुळे स्फोट झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. पण स्फोटाचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही. स्थानिक पोलीस स्फोट प्रकरणी तपास करत आहेत.

फटाका कारखान्यातील स्फोटात जखमी झालेल्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांचे शवविच्छेदन केल्यानंर मृतदेह नातलगांच्या ताब्यात दिले जाणार आहेत. मृतांच्या कुटुंबियांना आणि जखमींना सरकारकडून मदत मिळण्याची शक्यता आहे. स्फोटाचे कारण जाणून घेण्यासाठी पोलिसांनी तज्ज्ञांच्या सहकार्याने तपास सुरू केला आहे. ताज्या घटनेमुळे फटाका कारखान्यांमध्ये सुरक्षेसाठीच्या नियमांचे पालन होते की नाही ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पंजाबमधील मुक्तसर साहिब भागातील लांबी येथील पिड सिंग वाला येथील फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाल्याचे वृत्त आहे. स्फोटाची माहिती मिळताच पोलिस प्रशासन घटनास्थळी पोहोचले. जखमींना उपचारासाठी भटिंडा येथील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. श्री मुक्तसर साहिब जिल्ह्यातील एका गावाजवळ एका फटाके उत्पादन आणि पॅकेजिंग युनिटमध्ये स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की इमारत कोसळली आणि अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. रात्री साडेबाराच्या सुमारास कारखान्याच्या (पान २ वर)

# सापाला बिळातून बाहेर काढून चिरडू!

## मोदींचा दहशतवाद्यांवर जोरदार हल्लाबोल

**बिहार, दि. ३०** वृत्तसंस्था

जर पुन्हा डोके वर काढले, तर सापासारखं बिळातून बाहेर काढून चिरडून टाकू, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना उद्देशून इशारा दिला आहे. रोहतास येथील सभेत बोलताना त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत पाकिस्तानलाही स्पष्ट शब्दांत इशारा दिला.

मोदी म्हणाले, पहलगाममध्ये आमच्या बहिणींच्या कपाळावरील सिंदूर पुसणाऱ्यांना आम्ही गप्प बसू देणार नाही. मी जे वचन दिलं होतं, ते आमच्या संरक्षण दलांनी पूर्ण केलं आहे. दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यात आलेत. भारताची



दहशतवादाविरोधातली लढाई थांबणार नाही. त्यांच्या या भाषणात पाकिस्तानवरही जोरदार प्रहार केला. पाकिस्तानचा इतिहास म्हणजे दहशतवाद आणि नरसंहार. तीन वेळा आम्ही घरात घुसून उत्तर दिलंय. ऑपरेशन सिंदूर संपलेलं नाही, ही १४० कोटी भारतीयांची गर्जना आहे, असे ते म्हणाले. पंतप्रधानांनी यावेळी विरोधकांनाही लक्ष केलं. जे लोक जंगलराज आणतात, गरीबांना सोडून देतात, ते आज सामाजिक न्यायाच्या नावाने गळा काढत आहेत. बिहारच्या जनतेने त्यांच्या खोट्या वचनांपासून सावध राहावं, असं आवाहनही त्यांनी केलं. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही पाकिस्तानला इशारा देत सांगितलं, यावेळी जर पाकिस्ताननं नापाक हरकत केली, तर कदाचित भारतीय नौदलही ओपनिंग करेल. भारत पुन्हा कोणतीही कारवाई सहन करणार नाही. दहशतवाद्यांचा खात्मा हा केवळ सुरक्षा नव्हे, तर राष्ट्रगौरवाचाही प्रश्न आहे, हेच मोदी आणि त्यांच्या सरकारचं धोरण असल्याचं या भाषणातून ठळकपणे दिसून आलं. (पान २ वर)

# पाकिस्तानातील दहशतवादाच्या मुद्द्यावर जागतिक नेत्यांचा भारताला पाठिंबा

**नवी दिल्ली, दि. ३०** वृत्तसंस्था

पाकिस्तानातील दहशतवादाच्या मुद्द्यावर रियाध, जाकार्ता, सौदी अरेबिया, इटली, इंडोनेशिया या सर्व देशांनी भारताला पाठिंबा जाहीर केला आहे. पाकिस्तानस्थित दहशतवादाविरोधात आपण भारताबरोबर असल्याचे सौदी अरेबियाने स्पष्ट केले. इटलीने द्विपक्षीय सहकार्य देऊ केले तर भारताला दहशतवादाविरोधातील शक्य त्या सर्व व्यासपीठांवर आपला पाठिंबा असल्याचे इंडोनेशियाने सांगितले. तर दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णूतेची भूमिका घेण्याच्या भारताच्या धोरणाची दक्षिण आफ्रिकेने प्रशंसा केली. फ्रान्सनेही या मुद्द्यावर आपण भारताबरोबर असल्याचे स्पष्टपणे सांगितले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आपल्या जनतेचे दहशतवादाविरोधात संरक्षण करण्याच्या भारताच्या अधिकाराला विविध देशांनी पाठिंबा दिला आहे असे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान-पुरस्कृत दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताची भूमिका जागतिक पातळीवर मांडण्यासाठी सात सर्वपक्षीय शिष्टमंडळे विविध देशांचा दौरा करत आहेत. (पान २ वर)








# निलेश चव्हाणला अखेर नेपाळमधून अटक

### वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरण

**पिंपरी-चिंचवड, दि. ३०** वृत्तसंस्था

पुण्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणातील फरार आरोपी निलेश चव्हाणला अखेर नेपाळमधून अटक करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणा-या निलेश चव्हाणच्या मुसक्या आवळण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांना यश आलं आहे.



वैष्णवीच्या आत्महत्येनंतर तिच्या कुटुंबीयांवर दबाव टाकणं, धमकावणं आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग असल्याच्या गंभीर आरोपाखाली निलेश चव्हाण फरार झाला होता. गेल्या ९ दिवसांपासून तो फरार होता. पोलिसांची सहा पथकं चव्हाणचा शोध घेत होती. या प्रकरणामुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली होती. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी या प्रकरणी विशेष लक्ष केंद्रित करत, एक-दोन नव्हे तर तब्बल ६ शोध पथकं तयार केली होती. सुरुवातीला चव्हाण दुसऱ्या राज्यात लपल्याचा संशय होता, पण गोपनीय माहितीच्या आधारे तो नेपाळमध्ये असल्याचं स्पष्ट झालं आणि पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला अटक केली. निलेश चव्हाणला भारतात आणून न्यायालयासमोर हजर केलं जाणार आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याच्याकडून आणखी अनेक महत्त्वाच्या बाबतीत माहिती मिळण्याची शक्यता असून, चौकशीत धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे. हा गुन्हा केवळ (पान २ वर)

# नाते बिघडले म्हणून बलात्काराचा गुन्हा दाखल करता येणार नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**नवी दिल्ली, दि. ३०** वृत्तसंस्था

**परस्पर संमतीने सुरू झालेलं प्रेमसंबंध बिघडलं म्हणून त्या आधारे बलात्काराचा गुन्हा दाखल करता येणार नाही, असं स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने एका २३ वर्षीय तरुणाविरोधात दाखल बलात्काराची केस फेटाळून लावली आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि सत्य चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला.**



फिर्यादी ही एक घटस्फोटित महिला असून तिचा चार वर्षांचा मुलगा आहे. ती २००१ पासून आई-वडिलांसोबत राहत होती. तिचा आरोप आहे की २०२२ मध्ये एका पदवीचे शिक्षण घेत असलेल्या तरुणाशी तिची ओळख झाली. जुलै २०२२ मध्ये त्याने तिला लग्नाचे आश्वासन देत लैंगिक संबंध ठेवले आणि पुढे अनेक वेळा त्याच कारणावरून शरीरसंबंध ठेवले. पण नंतर त्या तरुणाने संवाद कमी केला. म्हणून ती त्याच्या घरी गेली असता, त्याच्या पालकांनी धर्मभिन्नतेचा मुद्दा पुढे करत लग्न शक्य नसल्याचं सांगितलं. त्यानंतर तिने संबंधित तरुणाविरुद्ध कलम ३७६ (बलात्कार), ३७२ (२)(एन) (पुनरावृत्तीने बलात्कार), ३७७ (प्रकृतीविरुद्ध लैंगिक कृत्य), ५०४ (अपमान) आणि ५०६ (धमकी) अंतर्गत एफआयआर दाखल केला. या तरुणाने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता जो मंजूर झाला. त्यानंतर त्याने मुंबई उच्च न्यायालयात खटला रद्द करण्याची मागणी केली, मात्र उच्च न्यायालयाने ती नाकारली. त्यानंतर त्याने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे की, संमतीने सुरू झालेलं नातं बिघडल्यावर त्या व्यक्तीवर बलात्काराचा गुन्हा दाखल करणं योग्य नाही. फसवणूक झाल्याचं केवळ म्हणणं पुरेसं नाही. या प्रकरणात फिर्यादीने स्वतः कबूल केलं आहे की ती आणि आरोपीमध्ये प्रेमसंबंध होते आणि ते वर्षभर सुरू होते. दोघे लॉजमध्येही भेटले होते. त्यामुळे शारीरिक संबंध हे एका आश्वासनावरून जबरदस्तीने झाले, असं मानता येत नाही. न्यायालयाने स्पष्ट केलं की फिर्यादीच्या वर्तनातून तिच्या आरोपांना पाठबळ मिळत नाही. कुठल्याही प्रकारची जबरदस्ती, धमकी, शारीरिक इजा याचा पुरावा नसल्याचंही न्यायालयाने नमूद केलं.

### सावधगिरी बाळगण्याचे निर्देश

» सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयांना आणि तपास यंत्रणांना अशा प्रकरणांमध्ये सावधगिरी बाळगण्याचे निर्देश दिले आहेत. प्रेमसंबंधातून नातं तुटल्यावर लगेच बलात्काराचा आरोप लावणं ही कायद्याचा गैरवापर करणारी प्रवृत्ती आहे. प्रत्येक 'लग्नाचं वचन' हे खोटं असल्याचं समजून आरोपीवर बलात्काराचा गुन्हा लावणं ही चुकीची आणि घातक गोष्ट आहे. दरम्यान, ज्या प्रकरणात संमतीने संबंध सुरू झाले, मात्र नंतर तणावामुळे किंवा सामाजिक अडथळ्यांमुळे संबंध तुटले. अशा अनेक प्रकरणांवर या निकालानंतर परिणाम होण्याची शक्यता आहे.




# परीक्षा केंद्र बदल प्रकरणात नीलिमा टाके यांची प्राथमिक चौकशी करण्याचे शासनाचे आदेश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३० :** मार्च २०२४ च्या वर्ग १० व १२ वी च्या ३८ व ८१ विद्यार्थांची ऐनवेळी नियम बाह्य व बेकायदेशीर परिक्षाकेंद्र बदलांचे आदेश पारीत करणाऱ्या अमरावती विभागीय शिक्षण मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षा श्रीमती निलिमा टाके यांची प्राथमिक विभागीय चौकशी करण्याचे आदेश शासनाने क्र. अहवाल २०२५/प्र.क्र. ०२/प्रशा-३/ दि. २९ एप्रिल, २०२५ नुसार आयुक्त (शिक्षण) पुणे यांना दिले आहेत.

मार्च २०२४ चा वर्ग १० वी आणि १२ वी च्या अनुक्रमे ३८ व ८१ विद्यार्थ्यांचे ऐनवेळी परीक्षा केंद्र बदलून गरीब, गरजू व अभ्यासू विद्यार्थ्यांवर अमरावती विभागीय शिक्षण मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षा श्रीमती निलिमा टाके यांनी अन्याय केला आहे. याबाबत आप पक्षाने वेळोवेळी शासन व आयुक्त (शिक्षण), पुणे यांचेकडे केलेल्या तक्रारीवर आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी त्यांचे पत्र जा. क्र. आशिका/आस्था-क १४२/संकीर्ण-१४९०४/२०२४/५५४७ दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ नुसार राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद गोसावी यांनी चौकशीचे आदेश दिले. मात्र राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद गोसावी यांनी निःपक्षपातीपणे चौकशी न करता, श्रीमती निलिमा टाके यांना वाचविण्यासाठी निरपराध व बेकसूर कनिष्ट कर्मचाऱ्यांचा बळी घेवून चौकशी पूर्ण केलेली आहे.

पक्षाने झालेल्या चौकशीची व कार्यवाहीची मागणी केल्यानंतरही राज्य मंडळ चौकशीतील कार्यवाही उघड करण्यास टाळाटाळ करीत आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद गोसावी यांनी परीक्षा केंद्र बदल प्रकरणाची केलेली चौकशी ही पक्षपाती, बेकसूरदारांवर अन्याय करणारी व सत्य दडपणारी आहे व निलिमा टाके यांना पुरेपूर पाठीशी घालणारी आहे. त्यामुळे ही चौकशी आय. ए. एस अधिकाऱ्यामार्फत व्हावी यासाठी पक्षाने शिक्षणमंत्री, प्रधान सचिव व आयुक्त (शिक्षण) पुणे यांना दि. २८/०३/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली. त्या तक्रारींची दखल घेवून शासनाने श्रीमती निलिमा टाके यांची प्राथमिक विभागीय चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), पुणे यांना दि. २९ एप्रिल, २०२५ रोजी निर्देश दिले आहेत.

नियमबाह्य व बेकायदेशीर परिक्षा केंद्र बदल प्रकरणातील प्रमुख सूत्रधार ह्या निलिमा टाके ह्याच आहेत. चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचे पाप राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. शरद गोसावी यांनी केलेले आहे. पक्षाने या प्रकरणातील सक्षम व सबळ लेखी पुरावे राज्य मंडळाला दिलेले आहेत. सत्य दडपून दोषीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न संपूर्ण चौकशीत झालेला आहे. त्यामुळे चुकीच्या पध्दतीने झालेल्या चौकशीची चौकशी करून निरपराधांना शिक्षा देणाऱ्या व दोषींना अभय देणा-या श्री. शरद गोसावी यांचीही विभागीय चौकशी करण्याबाबत शिक्षणमंत्री यांना पक्षातर्फे विनंती करण्यात येईल.

या संपूर्ण प्रकरणाची आय. ए. एस. अधिकाऱ्या मार्फत चौकशी व्हावी व या प्रकरणात जे-जे दोषी आढळतील त्या सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी आम आदमी पक्षाचे अकोला जिल्हाध्यक्ष श्री. कैलाश प्राणजळे यांनी प्रसिध्दीला दिलेल्या पत्रकात केली आहे.

# पान 1 वरून...

## सरकारी अभियंत्याच्या घरावर छापा..

ओडिशा व्हिजिलन्स विभागाने अभियंता बैकुंठनाथ सारंगी यांच्या निवासस्थानी छापा टाकला. तेव्हा २.१ कोटी रुपयांची रोकड आढळून आली. या घटनेमुळे अधिकाऱ्यांनाही मोठा धक्का बसला. अद्यापही त्या ठिकाणी कारवाई सुरू असल्याची माहिती सांगितली जात आहे. प्राथमिक माहितीनुसार सारंगी यांनी घोषित केलेल्या मालमत्तेमध्ये आणि त्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नात मोठी तफावत असल्याचे उघड झाले आहे.

या संपूर्ण घटनेतील सर्वात नाट्यमय भाग तेव्हा घडला जेव्हा दक्षता अधिकारी त्याच्या घरी पोहोचले. बैकुंठनाथ सारंगी घाबरले. अशा परिस्थितीत त्यांना काय करावं हे सुचले नाही. त्यामुळे घाबरून त्यांनी त्यांच्या फ्लॅटच्या खिडकीतून रोख रकमेचे गठ्ठे बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला. या कारवाईमुळे अधिकाऱ्यांना आणखी सतर्कता मिळाली आणि संपूर्ण परिसरात तातडीने पाळत ठेवण्यात आली. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, जमिनीवर पडल्यानंतर गठ्ठे मोजण्यात आले आणि नंतर ते पिशव्यांमध्ये भरून घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

खिडकीतून फेकले ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल

भुवनेश्वरच्या एका अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमधून छाप्यादरम्यान १ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली, तर दुसरीकडे अंगुल येथील एका दुमजली अपार्टमेंटमधून आतापर्यंत १.१ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एका अपार्टमेंटच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल खाली पडू लागल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यानंतर काही जण नोटा गोळा करण्यासाठी धावले तर काहींनी व्हिडीओ रेकॉर्ड केला. ही घटना गुरुवारी घडल्याची माहिती समोर आली आहे.

## फटाक्याच्या कारखान्यात स्फोट...

फटाक्याच्या उत्पादन युनिटमध्ये ही दुर्घटना घडली. स्फोटात किमान २५ जण जखमी झाले. स्थानिक अधिकारी, अग्निशमन दल आणि आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू आहे. एजन्सीनुसार, लांबीचे पोलिस उपअधीक्षक जसपाल सिंह यांनी फोनवरून सांगितले की, ही घटना श्री मुक्तसर साहिबमधील सिंघावली-कोटली रोडवरील एका दुमजली फॅक्टरी युनिटमध्ये घडली. डीएसपी म्हणाले की, स्फोटामागील कारणांचा तपास केला जात आहे. कारखान्याच्या पॅकिंग युनिटमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या मते, सुमारे ४० कर्मचारी येथे दोन शिफ्टमध्ये काम करायचे. त्यापैकी काही त्यांच्या कुटुंबासह येथे राहत होते. बहुतेक कर्मचारी उत्तर प्रदेश आणि बिहारचे असल्याचे सांगण्यात येत आहे. कारागीर अरुण सक्सेना यांनी सांगितले की, ते रात्री कारखान्यासमोरील रिकाम्या जागेत झोपले होते. अचानक स्फोट झाला आणि काही क्षणातच संपूर्ण इमारत पत्त्यांच्या इमारतीसारखी कोसळली, अनेक कर्मचारी गंभीर जखमी झाले. हा कारखाना सिंगे वाला-फुतुहिवाला येथील तरसेम सिंह नावाच्या व्यक्तीचा आहे. ढिगाऱ्याखालून तीन मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

## सापाला बिळातून बाहेर काढून...

भात्यातून एक बाण काढला! : पंतप्रधान मोदी म्हणाले, बिहारच्या भूमीवरून मी पुन्हा सांगू इच्छितो की ऑपरेशन सिंदूरमध्ये शत्रूने भारताची शक्ती पाहिली आहे. शत्रूने हे समजून घेतले पाहिजे की हा आपल्या भात्यातील फक्त एक बाण आहे. दहशतवादाविरुद्ध भारताचा लढा थांबलेला नाही आणि थांबलेला नाही. जर दहशतीचा कणा पुन्हा उभा राहिला तर भारत त्याला त्याच्या भोवऱ्यातून बाहेर काढेल आणि चिरडून टाकेल. आमची लढाई देशाच्या प्रत्येक शत्रूशी आहे. मग ती सीमेपलीकडे असो किंवा देशाच्या आत!

## पाकिस्तानातील दहशतवादाच्या...

पाकिस्तान समर्थित दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २२ एप्रिलला केलेल्या हल्ल्यानंतर भारताने कोणत्या परिस्थितीत ऑपरेशन सिंदूरअंतर्गत पाकिस्तानवर कारवाई केली हे जागतिक नेत्यांना पटवून देण्यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत ३३ देशांच्या राजधान्यांनाही भेट दिली जात आहे. सौदी अरेबिया, ग्रीस, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, फ्रान्स, पनामा या देशांमधील भारतीय दूतावासाने विविध भेटींची एक्सवरून माहिती दिली.

## निलेश चव्हाणला अखेर...

आत्महत्येपुरता मर्यादित नसून, त्यामागे दबाव, छळ आणि गुन्हेगारी साखळी असल्याचा संशय आहे, त्यामुळे पुढील तपास अधिक गंभीर आणि व्यापक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिची नणंद करिश्मा हगवणेनं तिचं बाळ निलेश चव्हाणच्या ताब्यात दिलं. निलेश हा हगवणे कुटुंबाच्या जवळचा आहे. वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिच्या कुटुंबियांनी बाळाचा शोध घेतला. तिचं बाळ चव्हाणकडे असल्याची माहिती मिळताच वैष्णवीचे काका, मामा त्याच्या घरी गेले. त्यावेळी चव्हाणनं त्यांना बंदुकीचा धाक दाखवत त्यांना हुसकावून लावलं. यानंतर वैष्णवीच्या कुटुंबियांनी पोलिसात धाव घेतली. निलेश चव्हाणवर बाळाची हेळसांड केल्याचा गुन्हा दाखल झाला. अटकेची कुणकुण लागताच निलेश चव्हाण फरार झाला.

# २४ तासांत चोरी उघड!

## मालाबार ज्वेलर्समधून चोरी गेलेल्या २.४८ किमतीचे दागिने केले परत

अकोला शहरातील प्रसिद्ध मालाबार गोल्ड अँड डायमंड शोरूममधून तब्बल २.४८ लाख रुपये किंमतीचे दोन सोन्याचे चैन अज्ञात महिलेने चोरून नेल्याची घटना ८ मे २०२५ रोजी घडली. या प्रकरणात सिव्हिल लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमने केवळ २४ तासांत सदर चोरीचा छडा लावून महिला चोरट्याला अटक केली आहे.

या प्रकरणी प्रविण बालाजी वडजे यांनी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती की, त्यांच्या मालकीच्या मालाबार ज्वेलर्स या दुकानातून एक अज्ञात महिला ग्राहक बनून आली आणि सोन्याच्या दोन चैन एकूण वजन २४ ग्रॅम, किंमत २ लक्ष ४८ हजार ६२२ चोरून नेली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

गुन्ह्याचा तपास तांत्रिक पुरावे व गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांच्या पथकाने सुरू केला. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सतीश कुलकर्णी व पोलीस निरीक्षक जयवंत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. विनोद धर्माळे, पो.कॉ. प्रदीप पवार आणि पो.नं. ६२९ यांनी संयुक्तपणे तपास करत अवघ्या २४ तासांत महिला आरोपीचा शोध लावून अटक केली.

आरोपीकडून दोन सोन्याच्या चैन (किंमत २ लक्ष ४ हजार ६२२ तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली ज्युपिटर दुचाकी किंमत ५० हजार असा एकूण २ लक्ष ९८ हजार६२२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

तपास पूर्ण झाल्यानंतर, मा. न्यायालयाच्या आदेशाने सदर मुद्देमाल मालाबार ज्वेलर्सचे मॅनेजर आकाश सुरेंद्र वाहुरवाघ यांना मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते परत करण्यात आला.

या कारवाईमुळे अकोला पोलिसांच्या गुन्हे उघडकीकरणाच्या क्षमतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. शहरात व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

# पाऊस ५ जूनपर्यंत विश्रांती घेणार; हवामान विभागाचा अंदाज

**नागपूर , दि. ३० वृत्तसंस्था**

यंदा मान्सून नियोजित वेळेपूर्वी दाखल झाला असला तरी आजपासून हवामानाची दिशा बदलेल, असा अंदाज हवामान शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. मुंबईसह संपूर्ण राज्यात हा टप्पा २ जूनपर्यंत सुरू राहील आणि ५ जूननंतर मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे.राज्यात ५ जून रोजी मान्सून दाखल होण्याची अपेक्षा होती. परंतु, तो कोकणातील देवगड आणि गोवा भागात १० दिवस आधीच म्हणजे २५ मे रोजी दाखल झाला.दुसऱ्या दिवशी २६ मे रोजी मुंबई, ठाणे, पालघर आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये मान्सूनचे वारे सक्रिय झाले. पहिल्या वादळी पावसाने मुंबई, ठाणे आणि पालघर पाण्यात बुडाले. तथापि, मंगळवारी विश्रांती घेतल्यानंतर, बुधवारी मान्सूनच्या वाऱ्यांनी पुन्हा आपली दिशा बदलली आणि रिमझिम पावसाने लोकांना भिजवले. हवामान शास्त्रज्ञांनाही हवामानाच्या या युक्त्यांमुळे आश्चर्यचकित केले.

# मनरेगा अंतर्गत वृक्षलागवड मोठ्या प्रमाणात व्हावी

## उत्थान फाउंडेशनमार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३० :** उत्थान फाऊंडेशन मार्फत उप जिल्हाधिकारी रोहयो अकोला यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गावाच्या विकासासाठी तथा पर्यावरण संतुलित समृध्द होण्यासाठी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी या करीता मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हावी या उद्देशाने निवेदन देण्यात आले.यावेळी उत्थान फाऊंडेशन अध्यक्ष प्रविण इंगळे व मानद सदस्य प्रशांत टाले, राजु आमले उपस्थित होते. वाढत्या उष्णतेमुळे आज अनेक समस्या निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे अवेळी चक्रीवादळ, ढगफुटी सदृश्य पाऊस, पुर, उष्णतेच्यालाटा यामुळे मानवी जिवण प्रभावीत झाले आहे. याला आळा घालण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व संवर्धन महत्वाचे आहे . त्यामुळे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात वृक्षलागवड होणे महत्त्वाचे यामुळे गावातील मजुराला गावात काम तर मिळेलच सोबत निसर्गाचे संवर्धन देखील होईल. याबाबत उपजिल्हाधिकारी रोहयो यांना निवेदनाद्वारे सदर मागणी करण्यात आली.

# विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत 'माफसू'तर्फे विविध

**नागपूर , दि. ३० वृत्तसंस्था**




कृषि व शेतकरी कल्याण मंत्री, भारत सरकार अंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेतर्फे देशभरात २९ मे ते १२ जून दरम्यान संपूर्ण देशात 'विकसित कृषि संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. आज २९ मे २०२५ रोजी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु मा. डॉ. नितीन पाटील यांच्या शुभहस्ते विद्यापीठ परिसरात कृषि रथास हिरवी झेंडी दाखवून या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माफसूचे कुलगुरु मा. डॉ. नितीन पाटील यांनी केले आहे. या प्रसंगी अभियानाचे विद्यापीठ समन्वयक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता पशुविज्ञान डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक संशोधन डॉ. नितीन कुरकुरे, अधिष्ठाता मत्स्यविज्ञान व निम्नशिक्षण डॉ. सचिन बोंडे, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आरजु सोमकुवर, कृषि महाविद्यालय नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. व्ही. जी. अतकरे प्रामुख्याने उपस्थित होते.

या अभियानांतर्गत माफसू तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठांतर्गत नागपूर, सांगली व ठाणे येथील तीन कृषि विज्ञान केंद्रातर्फे प्रत्येकी दोन टिम च्या माध्यमातून २७० गावात तसेच विद्यापीठाने उन्नत भारत अभियानांतर्गत दत्तक घेतलेल्या ३० गावांत हे अभियान राबविण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त माफसूचे ३४ शास्त्रज्ञ ३४ जिल्ह्यात विविध कृषि विज्ञान केंद्राच्या चमूमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून आधुनिक पशु व मत्स्य क्षेत्रातील तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या अभियानांतर्गत गावामध्ये जाऊन शेतकऱ्यांमध्ये कृषि व संलग्नित विषयांबाबत जागरुकता निर्माण केली जाणार आहे. या अनुषंगाने सदरील अभियानांतर्गत सर्व शास्त्रज्ञ व अधिकारी गावांमध्ये उपस्थित राहुन कार्यक्रम घेतील. या अभियानात भारतीय अनुसंधान परिषदेतील शास्त्रज्ञ तसेच माफसू व कृषि विद्यापीठातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कृषि विज्ञान केंद्र हे आत्मा व राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या मदतीने कार्यक्रम आयोजित करणार आहेत.

कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. सारीपुत लांडगे यांच्या नेतृत्वात कृषि महाविद्यालय नागपूरचे डॉ. आर. खोब्रागडे, डॉ. धनराज मानकर, सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रिसर्च, नागपूरचे डॉ. रामकृष्ण आणि डॉ. संथी, सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च ऑन कॉटन टेक्नालॉजी, मुंबईचे डॉ. षणमुगम, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयातील डॉ. किशोर राठोड, डॉ. गजानन अंबोरे, डॉ. शायनी जॉय, डॉ. शेखर बढे, डॉ. क्रांती खारकर, डॉ. श्वेता लेंडे यांच्यासह पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. ओम भारवडे आणि डॉ. अदिती जिद्देवार या अभियानाच्या यशस्वितेकरीता कार्य करणार आहेत.

# इन-हाऊस कोट्यातील नव्या नियमांमुळे ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांच्या अडचणींत वाढ

**पुणे , दि. ३० वृत्तसंस्था**



इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेतील इन-हाऊस कोट्यासंदर्भातील नव्या सुधारीत नियमांमुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे कठीण झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे सांगत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी हा नियम तात्काळ रद्द करून पूर्वीच्या नियमांप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबवण्याची मागणी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, उपसंचालक, उच्च माध्यमिक, पुणे विभाग, आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे. यांच्याकडे केली आहे.

राज्यात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व उच्च माध्यमिक महाविद्यालयांमध्ये इ. ११ वी प्रवेश प्रक्रिया केंद्रीकृत ऑनलाईन पद्धतीने राबवली जाणार आहे. या प्रक्रियेत कनिष्ठ महाविद्यालयांना इन-हाऊस कोट्यांतर्गत ५ टक्के जागा राखीव ठेवून प्रवेश द्यावा लागणार आहे. मात्र नव्या नियमांनुसार इन-हाऊस कोट्यात प्रवेश मिळवण्यासाठी संबंधित संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे अनिवार्य ठरवण्यात आले आहे.

यापूर्वी एकाच संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय वेगवेगळ्या ठिकाणी असली तरी त्या संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्याच संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात इन-हाऊस कोट्यातून प्रवेश घेणे शक्य होते. त्यामुळे ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील गुणवंत विद्यार्थ्यांना शहरातील दर्जेदार शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घेण्याची संधी मिळत होती.

सध्याच्या सुधारीत नियमांमुळे अनेक विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नाही. संस्थांनाही आपल्याच विद्यार्थ्यांसाठी राखीव इन-हाऊस कोट्यातील ५ टक्के जागा भरता येणार नाहीत.

त्यामुळे या बदलामुळे ग्रामीण भागातील आणि गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे डॉ. गजानन एकबोटे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

### अकरावीत प्रवेश घेणाऱ्यांनो 'या' तारखा लक्षात ठेवा

- अकरावी प्रवेशासाठी नोंदणी वेळ: २६ मे ते ३ जून २०२५
- तात्पुरती गुणवत्ता यादी: ५ जून सकाळी ११ वाजता जाहीर होईल.
- आक्षेप आणि दुरुस्ती आणि विनंती वेळ: ६ जून ते ७ जून
- अंतिम गुणवत्ता यादीः ८ जून सायंकाळी ४ जाहीर होणार आहे.
- कॉलेज स्तरावर अल्पसंख्याक, कोटा, इन-हाऊस कोटा, व्यवस्थापन कोट्यासाठी शून्य फेरीचा प्रवेश ९ ते ११ जून दरम्यान केला जाईल.
- गुणवत्ता यादीनुसार, वाटप झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची यादी १० जूनला सकाळी १० वाजता जाहीर होईल. यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागणार आहे.

# ढेकळांचेही पंचनामे करायचे का? कृषिमंत्री कोकाटेंच्या वक्तव्याने नवा वाद !

**नाशिक, दि. ३० वृत्तसंस्था**



राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे पुन्हा एकदा त्यांच्या सडेतोड आणि थेट शैलीमुळे चर्चेत आले आहेत. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्यावर पंचनाम्यांची मागणी होत आहे. मात्र, कोकाटे यांनी दिलेलं "ढेकळांचे पंचनामे करायचे का?" हे वक्तव्य सध्या चर्चेचा विषय बनले आहे.

मे महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने नाशिक जिल्ह्यात सुमारे सात हजार हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान केले असून, यामध्ये कांद्याचं सर्वाधिक नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांनी काढणी केलेला कांदा चाळींमध्ये साठवून करावा, अशी मागणी होत असताना कोकाटे यांनी "हार्वेस्टिंग झालेलं आहे तिथे पंचनामे करुन काय करणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का?" असा थेट सवाल केला. त्यांचे म्हणणे आहे की, राष्ट्रीय आपत्ती निधीच्या नियमानुसार फक्त उभ्या पिकांनाच मदत मिळते, घरात किंवा चाळीत ठेवलेल्या कांद्याला नाही.

कांदा वाचवण्यासाठी साठवलेला कांदा पुन्हा बाहेर काढून निवडावा लागतो, जो खर्चिक आणि कष्टसाध्य प्रकार आहे. वाढलेल्या मजुरी दरांमुळे साठवणुकीचा खर्चही गगनाला भिडत आहे.

# तुम्ही तक्रार करा, न्याय देण्याची जबाबदारी आमची -रुपाली चाकणकर

**पुणे, दि. ३० वृत्तसंस्था**



पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणावरून टीकेच्या केंद्रस्थानी आलेल्या महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज नाशिकमध्ये आयोजित 'महिला आयोग आपल्या दारी' या जनसुनावणीत सहभाग घेत महिलांच्या तक्रारी ऐकल्या आणि त्यांना न्याय मिळवून देण्याचं आश्वासन दिलं.

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडलेल्या या जनसुनावणीत महिला आयोगाच्या अध्यक्षांनी स्पष्ट केलं की, "तुम्ही तक्रारींचा पाठपुरावा करा, तुम्हाला न्याय मिळवून देणं ही महिला आयोगाची जबाबदारी आहे."बालविवाह, हुंडा बळी, लैंगिक अत्याचारांविरोधात कठोर त्यांनी अधोरेखित केलं.

या उपक्रमात महिलांनी कोणतीही पूर्वसूचना न देता थेट उपस्थित राहून आपले प्रश्न महिला आयोगासमोर लेखी स्वरूपात मांडले. शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या मुलींच्या सायबर तक्रारींपासून ते ह्युमन ट्रॅफिकिंगपर्यंत अनेक गंभीर विषयांवर सुनावणी झाली

रुपाली चाकणकर म्हणाल्या की, "कायद्याचं अस्तित्व असूनही त्यातून पळवाटा शोधल्या जातात. मानसिकता बदलणं हे खऱ्या परिवर्तनासाठी अत्यावश्यक आहे.

# आषाढी एकादशीला काही वाहनांना टोल माफी: वारकऱ्यांसाठी एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई, दि. ३० वृत्तसंस्था**



आषाढी वारीबाबत सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. वारकऱ्यांना विमा संरक्षण आणि वैद्यकीय सुविधा पुरवल्या जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तसेच वारकऱ्यांना चालताना कोणते अडथळे निर्माण होऊ नये म्हणून वारी मार्गावरील रस्ते दुरुस्त केले जाणार आहे. त्याचबरोबर पाणी, वीज आणि निवाऱ्याची व्यवस्था केली जाणार आहे, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून महाराष्ट्र सरकार त्यांच्या सुरक्षेसाठी गट विमा मिळवणार आहे. तसेच, दरवर्षीप्रमाणे या वर्षीही त्यांना वैद्यकीय सुविधा मिळतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात एक विशेष बैठक झाली. यामध्ये आषाढी वारीची तयारी आणि वारकऱ्यांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. शिंदे यांनी या बैठकीबद्दल माध्यमांना माहिती दिली.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पावसामुळे वारीतील रस्ते खराब झाले आहेत. त्यांची त्वरित दुरुस्ती केली जाईल. वारकऱ्यांना भरपूर पाण्याची सोय करण्यात येईल. विजेची व्यवस्थाही केली जाईल. पालखीच्या प्लॅटफॉर्मवर वॉटरप्रूफ तंबू बसवले जातील. वारीला जाणाऱ्या वाहनांना टोलमध्ये सूट मिळेल. शिंदे यांनी आरोग्य सेवांबद्दलही सांगितले. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आरोग्य विभाग मोठे आरोग्य शिबिरे आयोजित करेल असे त्यांनी सांगितले.

**कार्डियाक रुग्णवाहिकेची व्यवस्था**

शिंदे म्हणाले की, वारकऱ्यांसाठी कार्डियाक रुग्णवाहिकेची व्यवस्था केली जाईल. पंढरपूरमध्ये तात्पुरती आयसीयू सुविधा देखील असेल. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर स्वतः पंढरपूरला जाऊन तयारीचा आढावा घेतील. वारीदरम्यान प्रत्येक जिल्ह्यातून येणाऱ्या मोठ्या दिंड्यांसह पूर्णपणे सज्ज रुग्णवाहिका असाव्यात असेही शिंदे म्हणाले.

**सरकार सर्व प्रकारची मदत होणार**

गेल्या वर्षी वारीदरम्यान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबियांना सरकार मदत करेल. पोलिसांशी योग्य समन्वय साधण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त केला जाईल. वारकऱ्यांचे जेवण आणि इतर विधी वेळेवर होतील याची खात्री केली जाईल.

# ‘पहलगाम’चा सूत्रधार पाकिस्तानात मोकाट

## पाकिस्तानच्या शहरांमध्ये भारतविरोधी रॅली

**लाहोर , दि.३०** वृत्तसंस्था

दहशतवादी-एतोयबा या दहशतवादी लोकशाहीचा कमांडर आणि पहलगाम इथला सूत्रधार सैफुल्लाह कसूरला बाहेर पडलेला आहे. पाकिस्तानी राजकीय पक्ष आणि अन्य वाँटे दहशतवादी देखील सामील होते. या रॅलीत प्रक्षोभक भाषणं आणि भारताची घोषणाबाजी करण्यात आली. पाकिस्तान मरकजी स्लीम लीने ही रॅली आयोजित केली होती, भारताच्या मुंढे गरळ ओकण्यात आली होती. मध्ये नेता-ए-तोयबाचा संस्थापक हाफिज सईदचा पुत्र आणि भारत दहशतवादी घोषित तल्हा सईद देखील सामील होता.

माझ्यावर पहलगामचा सूत्रधार मला आला आहे. आता माझे नाव प्रसिद्ध झाले आहे असे सैफुल्लाहने पंजाब प्रांताचे कसूर येथे आयोजित केले आहे. पहलगाम बैसरन खोलात २२ एप्रिल रोजी घडला भागाचा कट सैफुह कसूरीनेच रचला होता, असे महिला जाते. महिलांना शोधत करत या अपघातात लक्ष्य गाठून २६ जणांची गोळ्या झाडून हत्या केली होती. हा दहशतवादी युद्धस्टे-ए-तोयबाशी संबंधित द रेजिंस गुन्हेगारने घडवून आणला होता.

बहलपूर इलाहाबादमध्ये मुदसिर शहीद नावाने एक सेन्टर, स्वतःच्या आणि स्वतःच्या नावाने स्वतःला निर्माण करणार आहे कसूरवाला संबोधित करताना. मुदसिर अहमद भारत हाके प्रत्युत्तरादाखलाच्या सिंदूरमध्ये मारले गेले अनेक हाय-प्रोफाइल दहशतवादी एक होता, असे गुप्तचर सूत्रांचे सांगणे आहे. या संपूर्णलाच्या वाँटेड दहशतवादाच्या



यादीत ३२ स्थानावर असलेल्या तल्हादने भारताच्या सल्ल्या प्रक्षोभक भाषणाची घोषणाबाजी केली.

पीएमएमएललाला-ए-ए-पाक कायदा समर्थन आणि दहशतवादी पार्श्वची राजकीय घटना या सार्वजनिक जाते.पीएमएमएलने भारत विरोधी समर्थांना धार दिली आहे. हा पक्ष पाकिस्तान लाहौर, कर, इस्लामाबाद, निर्णयबाद या ठिकाणी निदर्शक करत हाफिज सईदच्या मुक्तेची सामना करत आहे. नियंत्रण-ए-तोयबा स्तरावर प्रतिबंधित आहे आणि दबाव टाकून पाकिस्तानने देखाव्यापोटी प्रतिबंध घातली आहे. २००८ च्या मुंबई संपर्क सूत्र, संयुक्त राष्ट्र संघ घोषित दहशतवादी हाफिज सैदच पीएम एमएलच्या कारवायांमागे विश्वासधार आहे. भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये ज्या दहशतवादी अभ्यागत होते, अनेक-ए-तोशी संबंधित होते. भारताच्या विजयात युसूफहर, अब्दुल मॉल रौफ आणि मुदसीर अहमद यासारखे वाँटेड दहशतवादी मारले गेले, हे आयसी-८१४ विमान अपहरण आणि पुलवामा आत्मघाती स्फोटाच्या कटात सामील होते.

## थोडक्यात

### पाकव्याप्त काश्मीर भारताला मिळालाच पाहिजे-सलमान खुर्शीद



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना लक्ष्य करत ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून मोठी कारवाई केली. भारताने केलेल्या या कारवाईनंतर ऑपरेशन सिंदूरसंदर्भात भारत सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर भारताची भूमिका मांडत आहे. या सर्वपक्षीय शिष्टमंडळामध्ये काँग्रेसच्या नेत्यांचा देखील समावेश आहे. दरम्यान, ऑपरेशन सिंदूरनंतर काँग्रेसचे काही नेते केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या धोरणांना पाठिंबा देत असल्याचं दिसून येत आहे.काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी देखील अनेकवेळा मोदी सरकारच्या थोरणांचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं आहे. त्यावरून राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चाही रंगल्याचं पाहायला मिळालं. यानंतर आता काँग्रेसचे नेते सलमान खुर्शीद यांनी देखील केंद्रातील भाजपा सरकारच्या धोरणांना पाठिंबा दिल्याचं पाहायला मिळत आहे. केंद्र सरकारने कलम ३७० रद्द केल्याच्या निर्णयावर भाष्य करत सलमान खुर्शीद यांनी मोदी सरकारचं कौतुक केलं आहे.एवढंच नाही तर सलमान खुर्शीद यांनी भाजपा सरकारच्या धोरणांना पाठिंबा दिल्याचंही पाहायला मिळालं आहे. सलमान खुर्शीद यांनी पाकव्याप्त काश्मीर (पीओके) भारताला परत करावे, या भारताच्या दीर्घकाळापासूनच्या मागणीलाही त्यांनी दुजोरा दिला. दरम्यान माजी केंद्रीय मंत्री सलमान खुर्शीद हे सध्या आशिया दौऱ्यावर असलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे सदस्य आहेत.

### मुंबई विमानतळावर पावणेसात कोटींच्या कोकेनसह परदेशी नागरिकाला अटक

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तवार्ता विभागाच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईत सुमारे ६७४ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारात अंदाजे पावणे सात कोटी रुपये किंमत आहे. या प्रकरणात घानामधील नागरिकाला डीआरआयने अटक केली. त्याच्याविरोधात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लिबेरिया येथून भारतात आला होता. त्यावेळी त्याच्या पोटात संशयीत कॅप्सूल असल्याचे निष्पन्न झाले होते. लिबेरिया येथून आलेल्या विमानातील एका प्रवाशावर डीआरआयच्या अधिकाऱ्यांना संशय आला. त्यामुळे डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी त्याला थांबवले. चौकशीदरम्यान संबंधित प्रवासी घाबरलेला व अस्वस्थ असल्याचे निदर्शनास आले. नंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यामध्ये त्याच्या पोटात पिवळ्या रंगाच्या अनेक कॅप्सूल असल्याचे निदर्शनास आले. वैद्यकीय देखरेखीखाली त्याच्या पोटातील ५० गोळ्या बाहेर काढण्यात आल्या. त्या गोळ्यांमध्ये पांढऱ्या रंगाचा पदार्थ सापडला. तपासणीत ते कोकेन असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पंचनामा करून कोकेन जप्त करण्यात आले. आरोपीकडून एकूण ६७४ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले. या अमली पदार्थाची अंदाजित किंमत सहा कोटी ७४ लाख रुपये असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी प्रवाशाला याप्रकरणी अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.याप्रकरणात आंतरराष्ट्रीय टोळीचा सहभाग असल्याचा संशय डीआरआयच्या अधिकाऱ्यांना आहे. आरोपी प्रवाशाला कोकेन तस्करीसाठी रक्कम मिळणार होती. त्यापूर्वीच त्याला अटक झाली. आरोपीच्या साथीदारांचा शोध सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

### नागपूरची सुनीता जामगडे पाकिस्तानी हेर?

**नागपूर :** नागपूर येथील रहिवासी सुनीता जामगडे प्रकरणी नवीन माहिती उघडकीस आली आहे, ती कामाच्या शोधात पाकिस्तानी नागरिकांच्या संपर्कात होती. पण पोलीसांना वेगळाच संशय आहे. पाकिस्तानात घुसखोरी करणाऱ्या महिलेवर हेरगिरीचा संशय व्यक्त करीत अमृतसर पोलिसांनी तिच्याविरुद्ध ऑफिशियल सिक्रेट ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल केला आणि हे प्रकरण कपिलनगर पोलिसांकडे वर्ग केले. तोच धागा पकडून कपिलनगर पोलीस पुढील तपास करणार आहेत. मध्यरात्री तिला मॅजिस्ट्रेटसमोर हजर करण्यात आले. मॅजिस्ट्रेट यांनी संपूर्ण प्रकरण ऐकल्यानंतर तिला अटक करण्याचे आदेश दिले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## अभियंत्यांच्या घरात सापडले कोट्यवधींचे घबाड

**भुवनेश्वर, दि.३०** वृत्तसंस्था



ओडिशाची राजधानी भुवनेश्वरमध्ये दक्षता विभागाने राज्य सरकारचे मुख्य अभियंता बैकुंठनाथ सारंगी यांच्या निवासस्थानासह सात ठिकाणी छापे टाकल्याने खळबळ उडाली. जप्त केलेले मुद्देमाल पाहून सर्वच जण अवाक झाले होते. २.१ कोटी रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम त्यांच्या घरातून जप्त करण्यात आली आहे. दरम्यान, बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याच्या संशयावरून हे छापे टाकण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार सारंगी यांनी घोषित केलेल्या मालमत्तेमध्ये आणि त्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नात मोठी तफावत असल्याचे उघड झाले आहे.

या संपूर्ण घटनेतील सर्वात नाट्यमय भाग तेव्हा घडला जेव्हा दक्षता अधिकारी त्याच्या घरी पोहोचले. बैकुंठनाथ सारंगी घाबरले. अशा परिस्थितीत त्यांना काय करावं हे सुचले नाही. त्यामुळे घाबरून त्यांनी त्यांच्या फ्लॅटच्या खिडकीतून रोख रकमेचे गठ्ठे बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला. या कारवाईमुळे अधिकाऱ्यांना आणखी सतर्कता मिळाली आणि संपूर्ण परिसरात तातडीने पाळत ठेवण्यात आली. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, जमिनीवर पडल्यानंतर गठ्ठे मोजण्यात आले आणि नंतर ते पिशव्यांमध्ये भरून घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

## पाकिस्तानने परत ‘नापाक’ हरकत केली तर यावेळी भारतीय नौदल ‘ओपनिंग’ करेल

### संरक्षणमंत्र्यांचा इशारा

**नवी दिल्ली , दि.३०** वृत्तसंस्था

भारताचे संरक्षणंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय नौदलाच्या ताफ्यातील स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतला भेट दिली. ऑपरेशन सिंदूरचं यश नौदलाबरोबर साजरं करण्यासाठी संरक्षणमंत्री तिथे गेले होते. यावेळी भारतीय नौदलाने अरबी समुद्रात शक्तीप्रदर्शन केलं. त्यानंतर युद्धनौकेवर आयोजित एका कार्यक्रमाद्वारे राजनाथ सिंह यांनी नौदलाच्या जवानांना संबोधित केलं. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी नौदलातील जवानांच्या शौर्याचं कौतुक केलं. ते म्हणाले, ‘‘भारतीय नौदलाने पूर्ण क्षमतेने कारवाई केली तर पाकिस्तानचे चार तुकडे होतील’’.

राजनाथ सिंह म्हणाले, ‘‘ऑपरेशन सिंदूरच्या



वेळी भारतीय नौदलाने कोणताही गाजावाजा न करता केलेल्या कामगिरीद्वारे प्रत्येक भारतीयाला प्रभावित केलं आहे. आपल्या सैन्याने अत्यंत शांत राहून पाकिस्तानी लष्कराला बांधून ठेवण्यात यश मिळवलं आहे. जो शांत राहूनही एखाद्या देशाच्या लष्कराला बाटलीत बंद करून ठेवू शकतो तो जेव्हा बोलू लागेल तेव्हा काय चित्र असेल याची कल्पना करा’’.संरक्षण मंत्री म्हणाले, ‘‘यावेळी पाकिस्तानी सैन्याला आपल्या फायर पॉवरचा सामना करावा लागला नाही. मात्र, जगाला माहिती आहे की पाकिस्तानने यावेळी कुठलीही नापाक हरकत (आगळीक) केली तर कदाचित त्यांच्याविरोधात भारतीय नौदल ओपनिंग करू शकतं’’. म्हणजेच, यावेळी भारतीय वायूदल किंवा भूदलाच्या आधी भारतीय नौदल पाकिस्तानविरोधात रणशिंग फुंकू शकतं’’.

राजनाथ सिंह म्हणाले, ‘‘अरबी समुद्रातून भारताने पाकिस्तानला कठोर संदेश दिला आहे. भारताची सागरी सीमा तुमच्या (नौदलाच्या) हातात आहे. तुम्ही इथे आहात म्हणून कोणी भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्यची हिंमत करत नाही. तुमच्या आजवरच्या कामगिरीबद्दल मी तुम्हाला नमन करतो.

## ट्रम्प सरकारला दिलासा :न्यायालयाकडून टॅरिफ वसूल करण्याची परवानगी

**वाशिंग्टन , दि.३०** वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील अनेक देशांवर परस्पर आयात शुल्क (रेसिप्रोकल टॅरिफ) लावलं आहे. परिणामी जग ट्रेड वॉरच्या (व्यापार युद्ध) उंबरठ्यावर आलं आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे जगभरातील अनेक देशांमधील शेअर बाजार गडगडले. अशातच एक चांगली बातमी समोर आली होती. ‘यूएस कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड’ने अमेरिकेच्या अध्यक्षांना फटकारत त्यांच्या टॅरिफच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. मात्र, अवघ्या काही तासांत न्यायालयाने ही स्थगिती उठवली आहे. त्यामुळे ट्रम्प प्रशासन त्यांच्या निर्णयानुसार आयात शुल्क वसूल करू शकतात.



अमेरिकेच्या एका फेडरल अपील कोर्टाने गुरुवारी अध्यक्ष ट्रम्प यांचे बहुतेक आयात शुल्क तात्पुरते लागू करण्यास परवानगी दिली आहे. या निर्णयाच्या आदल्या दिवशी यूएस कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेडने ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयावर ताशेरे ओढताना हे घटनाविरोधी कृत्य ठरवलं होतं. अमेरिकेतील आयात नियंत्रित करण्यासाठी टॅरिफचा वापर करणे हे घटनेनं अध्यक्षांना दिलेल्या अधिकारांचं उल्लंघन आहे. डोनाल्ड ट्रम्प सरकारने त्यांना घटनेनं दिलेल्या अधिकारांच्या कक्षा ओलांडून इंटरनॅशनल इमर्जन्सी इकोनॉमिक पॉवर्स ॲक्टचा वापर केल्याचं न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केलं होतं. मात्र, अपील कोर्टाने ही स्थगिती तात्पुरती उठवली आहे.

रायटर्सने दिलेल्या वृत्तानुसार फ ेडरल सर्किटसाठी अपील कोर्टाने ट्रम्प प्रशासनाने दाखल केलेल्या आपत्कालीन प्रस्तावास मंजुरी दिली आहे. न्यायालयाच्या स्थगितीमुळे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोर आव्हान निर्माण झालं असून देशाला हानी देखील पोहोचू शकते असं ट्रम्प प्रशासनाने आपल्या याचिकेत म्हटलं होतं. त्यानंतर अपील कोर्टाने टॅरिफवरील स्थगिती उठवली.

ट्रम्प सरकारने फेडरल अपील कोर्टाकडे ट्रेड कोर्टाचा टॅरिफवरील स्थगितीचा आदेश उठवण्याची विनंती केली होती. ही विनंती मान्य करत फेडरल कोर्टाने एक आदेश जारी केला आहे. परंतु, ही स्थगिती तात्पुरत्या स्वरुपात उठवण्यात आली आहे. अपील कोर्टाने स्थगिती उठवताना कोणतंही तपशीलवार कारण दिलेलं नाही. त्याऐवजी याचिकाकर्त्यांना (सरकारविरोधातील पक्ष) ५ जूनपर्यंत आणि ट्रम्प प्रशासनाला ९ जूनपर्यंत उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.

## पंजाबमध्ये फटाक्याच्या कारखान्यात मोठा स्फोट; पाच कामगार ठार

**चंदीगड, दि.३०** वृत्तसंस्था

पंजाबच्या मुक्तसर साहिब जिल्ह्यातील सिंघेवाला-फतुहीवाला गावात फटाक्याच्या कारखान्यात गुरुवारी रात्री मोठा स्फोट झाला. यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

सिंघवली-कोटली रस्त्यालगत फटाके उत्पादन आणि पॅकेजिंग करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की इमारत कोसळली आणि अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. रात्री साडेबाराच्या सुमारास कारखान्याच्या फटाक्याच्या उत्पादन युनिटमध्ये ही दुर्घटना घडली. स्फोटात किमान २५ जण जखमी झाले. स्थानिक अधिकारी, अग्निशमन दल आणि आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू आहे. कारखान्याच्या पॅकिंग युनिटमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या मते, सुमारे ४० कर्मचारी येथे दोन शिफ्टमध्ये काम करायचे. त्यापैकी काही त्यांच्या कुटुंबासह येथे राहत होते. बहुतेक कर्मचारी उत्तर प्रदेश आणि बिहारचे असल्याचे सांगण्यात येत आहे. कारागीर अरुण सक्सेना यांनी सांगितले की, ते रात्री कारखान्यासमोरील रिकाम्या जागेत झोपले होते. अचानक स्फोट झाला आणि काही क्षणातच संपूर्ण इमारत पत्त्यांच्या इमारतीसारखी कोसळली,

## इस्रायलमध्ये महिला सैनिकांना यापुढे प्रशिक्षण बंद

**तेल अवीव, दि.३०** वृत्तसंस्था



इस्रायलमध्ये महिला सैनिकांशी संबंधित एक मोठी बातमी समोर येत आहे. इस्रायल डिफेन्स फोर्सेस ने एक पायलट प्रोग्राम बंद केला आहे. आरोग्य आणि तंदुरुस्तीच्या चिंता लक्षात घेऊन हे केले जात असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रशिक्षित महिलांना ‘लढाऊ युनिट्स’मध्ये सेवा द्यायची होती जे शत्रूच्या प्रदेशात पायदळ दलांना उपकरणे आणि पुरवठा करतात आणि जखमी सैनिकांवर उपचार करतात. मात्र आता महिलांना सैनिकी शिक्षण न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रमुखांनी हा निर्णय घेतला असून जेरुसलेम पोस्टमधील वृत्तानुसार, चीफ ऑफ स्टाफ लेफ्टनंट जनरल इयाल झमीर यांनी गुरुवारी (२९ मे) ते बंद करण्याचा निर्णय घेतला.

आयडीएफच्या मते, लढाऊ कोर्समधून उत्तीर्ण झालेल्या महिलांची कामगिरी चांगली आणि त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांच्या बरोबरीची होती, परंतु ‘त्यांची शारीरिक आणि लढाऊ तंदुरुस्तीची पातळी भूमिकेसाठी आवश्यक असलेल्या मानकांपेक्षा कमी होती.’ महिला पायदळ भरतीसाठी नवीन पायलट कार्यक्रम सध्याच्या सहा महिन्यांच्या योजनेला रद्द केल्यानंतर पुढील वर्षी सुरू होईल. दरम्यान, या कोर्समध्ये नोंदणी केलेल्या महिलांना जर ते पुढे चालू ठेवू इच्छित असतील किंवा जर त्यांना बदल हवा असेल तर त्यांना सैन्यात इतर लढाऊ संधी दिल्या जातील. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या नेतृत्वाखालील दहशतवाद्यांनी दक्षिण इस्रायली समुदायांमध्ये घुसून सुमारे १,२०० लोकांची हत्या केल्यापासून, तेल अवीवने या नुकसानाचा बदला घेण्यासाठी मोठी मोहीम सुरू केली आहे.

## पंतप्रधान मोदींना जीवे मारण्याची धमकी; बिहारमध्ये संशयिताला अटक

**बिक्रमगंज , दि.३०** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या बिहार दौऱ्यावर आहेत. गुरुवारी, २९ मे २०२५ रोजी ते पाटणा येथे पोहोचले आणि त्यांनी शहरात भव्य रोड शो केला. आज, ३० मे रोजी त्यांचा रोहतास जिल्ह्यातील बिक्रमगंज येथे एक महत्वपूर्ण कार्यक्रम होणार आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एक व्यक्ती अडचणीत आला आहे. भागलपूरमध्ये या व्यक्तीला अटक करण्यात आली असून, गुरुवारी एसएसपी कार्यालयाने याबाबत अधिकृत माहिती दिली. या प्रकारामुळे सुरक्षेच्या दृष्टीने खळबळ उडाली असून, प्रशासन अधिक सतर्क झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बिहार दौऱ्यादरम्यान त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव समीर कुमार रंजन असे असून, त्याचे वय सुमारे ३५ वर्षे आहे. भागलपूर येथील एसएसपी कार्यालयाने गुरुवारी (२९ मे २०२५) जारी केलेल्या प्रेस रिलीजमध्ये सांगण्यात आले की, पंतप्रधानांच्या दौऱ्यादरम्यान मिळालेल्या धमकीच्या माहितीची गंभीर दखल घेतली गेली.

सुरक्षा यंत्रणांनी तत्काळ कारवाई करत भागलपूर येथील वरिष्ठ पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि कायदा व सुव्यवस्था विभागाचे पोलिस उपअधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली तपासासाठी विशेष पथक तयार केले. या पथकाने तातडीने तपास सुरू करून आरोपीला अटक केली. या घटनेनंतर पंतप्रधानांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.

या प्रकरणाच्या तपासादरम्यान, तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिस पथकाने मंटू चौधरी नावाच्या एका वृद्ध व्यक्तीला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीनुसार, मंटू चौधरी या वृद्धाने चौकशीत सांगितले की, तो मॅट्रिकही पास झालेला नाही आणि केवळ कीपॅड मोबाईल फोन वापरू शकतो. संपूर्ण प्रकरणात त्याला अडकवण्याचे काम समीर कुमार रंजन याने केले आहे. याच दरम्यान, तपास यंत्रणांना एक मोबाईल नंबर आढळून आला, जो (व्हर्चुअल प्रायव्हेट नेटवर्क) चा वापर करून तब्बल ७१ वेळा सक्रिय झाला होता. हा मोबाईल नंबरच संपूर्ण प्रकरणातील एक महत्त्वाचा दुवा ठरू शकतो, अशी शक्यता तपास पथकाने व्यक्त केली आहे.विशेष पोलिस पथकाने सुलतानगंज पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील महेशी गावातून समीर कुमार रंजन (वय ३५) याला अटक केली. या प्रकरणात त्याच्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना व्हॉट्सॲप कॉलद्वारे जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. चौकशीदरम्यान, समीर कुमार रंजन याने आपली कबुली दिली असून त्याने (व्हर्चुअल प्रायव्हेट नेटवर्क) चा वापर करून धमकीचा कॉल केल्याचे मान्य केले आहे.पोलिसांच्या प्राथमिक तपासात समीर आणि त्याच्या सह-भाडेकरूमधील जमिनीच्या वादाशी संबंधित असल्याचे समोर आले आहे.

## जखमांवर फुंकर घालणारी मोहीम; ‘चला काश्मीर’द्वारे पर्यटनाला पुन्हा चालना देण्याचा प्रयत्न

**श्रीनगर, दि.३०** वृत्तसंस्था

पर्यटनाला पुन्हा चालना देण्यासाठी जम्मू- काश्मीर पर्यटन विभागाने महाराष्ट्र टूर ऑपरेटर्स असोसिएशन (एमटीओए) आणि जम्मू-काश्मीर हॉटेलियर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ‘चला काश्मीरला’ (कश्मीर चलो) ही मोहीम सुरू केली आहे.

पहलगाममधील हल्ल्यानंतर देशभरातील नागरिकांच्या मनात विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावे, ठप्प झालेला पर्यटन व्यवसाय सुरू व्हावा, यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटन विभागाने एक बैठक आयोजित केली होती. त्यात महाराष्टातून आलेले सुमारे ६० टूर ऑपरेटरही सहभागी झाले होते. अमरनाथ यात्रेला पाठबळ देण्याबरोबरच ‘पृथ्वीवरील स्वर्ग’ हा लौकिक पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी या मोहिमेचा उपयोग होईल, असे पर्यटन विभागाचे म्हणणे



प्रत्येक भारतीय पर्यटकाच्या ह्रदयात काश्मीरचे एक खास स्थान आहे. येथील जनतेची जिद्द आणि सरकारने उचललेली ठोस पावले पर्यटनाच्या पुनरुज्जीवनासाठी भक्कम पाया आहे. सुरक्षित पर्यटनाला चालना देणे आणि काश्मीरला भारतातील एक प्रिय पर्यटनस्थळ म्हणून पुनर्स्थापित करणे हे आमचे कर्तव्य आहे.

- **विश्वजित पाटील,** ‘एमटीओए’चे अध्यक्ष

आहे. याबाबत मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला म्हणाले, ‘‘ऑपरेशन सिंदूरनंतर खोऱ्यातील स्थिती सुरक्षित आहे, याची आम्ही हमी देतो.आम्ही काळजीपूर्वक पावले उचलत आहोत. गेले काही आठवडे देशासाठी कठीण गेले. पर्यटन ही संघर्षमुक्त आणि राजकारणापासून अलिप्त असलेली बाब असावी, यासाठी कटिबद्ध आहोत.’’

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# लोकमाता अहिल्यादेवी एक कणखर आणि लोकाभिमुख राज्यकर्ती



शिवछत्रपतींनी स्थापना केलेल्या स्वराज्याचे वैभवशाली साम्राज्यात रुपांतर करण्यात इंदोरच्या होळकरशाहीचे फार मोठे योगदान आहे. अशा सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या समृध्द होळकरशाहीचे संस्थापक मल्हारराव होळकर होते. त्या संस्थानचे नेतृत्व मल्हाररावांची सुन म्हणून लोकमाता अहिल्याबाईनी अधिकृतपणे अट्ठावीस वर्षे तर त्या आधी सासरे, पती व मुलाच्या नावे तीस वर्षे असे एकूण अठ्ठावण वर्षे राज्य केले. त्यांना एकूण सत्तर वर्षाचे आयुष्य लाभले. हया खडतर आयुष्यात पत्नी, मुलगा, जावाई, मुलगी नात यांच्या अकाली निधनाची दुःखद मालीकाच त्यांच्या आयुष्यात सुरु राहीली. तरी जराही विचलीत न होता दुःखाचा डोंगर गिळून सर्वसंगपरित्याग करुन केवळ लोककल्याणाकरिता आपले सारे जीवन खर्ची घालणारी एकमेव राज्यकर्ती म्हणून अहिल्यामाईची नोंद भारताच्या इतिहासात झालेली आहे. अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ मध्ये चोंढीच्या माणकोजी पाटील शिंदे यांच्या पोटी झाला.

संतोष झामरे
९९२२६५०४६९

पती खंडेराव आणि सासरे मल्हारराव यांच्या मृत्युनंतर होळकरशाहीची संपुर्ण जबाबदारी अहिल्यामाईच्या खांदयावर आली. त्यांना शासन व प्रशासनाचा पुरेपुर अनुभव होता. त्याचप्रमाणे मल्हारावांसोबत मोहीमांवरही त्यांनी आपला पराक्रम वेळोवेळी गाजविल्यामुळे त्यांना युध्दाचाही अनुभव होता. म्हणूनच रघूनाथराव पेशव्यांनी होळकरशाही गिळंकृत करण्याचा केलेला प्रयत्न घेरोदात्तपणे न डगमगता उधळून लावला. व रघुनाथ पेशव्यांना खुले आव्हान केले ते येणेप्रमाणे, 'हे राज्य माझ्या पूर्वजांनी तलवारीच्या बळावर रक्ताचे पाणी करुन जिंकले आहे, भाटभडवेगीरी करुन नव्हे. प्रजेचे आणि राज्याचे रक्षण करणे हाच माझा धर्म आहे. राजा आणि प्रजा यांचे संबंध आई- पुत्राप्रमाणे असतात. मी अबला आहे, असे समजू नका. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधुन तुमचे स्वागत न केले तर होळकराच्या सुनेचे नांव लावणार नाही.'' हे पत्र वाचून रघुनाथराव गर्भगळीत झाला. अहिल्यामाईची सदिच्छा भेट घेवून अपमानित होवून परत गेला. इथे आम्हाला अहिल्यादेवी मध्ये भद्रकाली ताराराणीचे तेज दिसले.

**महादजी शिंदे यांना मदत :** उज्जैन-ग्वाल्हेर संस्थानचे शिंदे सरदार मराठा साम्राज्याचे प्रभावशाली आणि निष्ठावंत आधारस्तंभहोते. त्यांचा मान मोठा, परंतु पानिपतच्या लढाईनंतर हे संस्थान अतिशय डबघाईस आले होते. दैनंदिन कौटूंबिक खर्च व सैन्याचा पगार देण्यासही असमर्थ झाले होते. तेंव्हा महादजी शिंदेंच्या विनंतीवरुन अहिल्यादेवींनी ३० लाख रुपयांची सढळ हाताने कर्जाऊ मदत केली. मराठेशाहीत होळकरांइतकी संपत्ती कुणाकडेच नव्हती. त्याचप्रमाणे अडलेल्यांना मदत करण्याची दानतही त्यांच्यात होती. हे अहिल्यामाईच्या वरील निर्णयातून स्पष्ट होते. इथे आम्हाला अहिल्यादेवीमध्ये कर्णाची दानशूरता दिसली.

**चोर, डाकू, दरोडेखोरांचा बंदोबस्त :** अहिल्यामाईंनी सर्व सामान्य रयतेच्या अडचणी समजून घेवून त्यांच्यावरील अडचण दूर करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. राज्यातील चोर, दरोडेखोर, डाकू यांच्यापासून सामान्य प्रजेचे रक्षण करण्यासाठी आपल्या पोटच्या मुलीचे जीवन पणाला लावले. भरदरबारात घोषणा केली. ''जो कोणी वीर पुरुष राज्यात धुमाकूळ घालण्याऱ्या व प्रजेची लुट करुन त्यांना त्रास देण्याऱ्या चोर, लुटारु, दरोडेखोरांचा आपल्या पराक्रमाच्या जोरावर बंदोबस्त करील त्या शूर, धाडसी आणि चतूर पुरुषाशी मी माझ्या राजकुमारीचा विवाह करुन देईन.'' अहिल्यामाईच्या या अनपेक्षीत आवाहनामुळे सारेच अवाक झाले. राज्याच्या हितासाठी साऱ्या सुखसोईचा त्या करणाऱ्या या सर्वांच्या मातोश्रीचे हे वेगळेच रुप लोक पाहत होते. प्रजेसाठी तीने होणाऱ्या जावायाची जात-पात, धर्म हया सर्व बाबी गौण मानून एक लोकोत्तर आदर्श, मध्ययुगातील धार्मिक उच्छादाच्या काळात ठेवला. तेंव्हा बालविवाहाची प्रथा अगदी शिगेला पोहोचली होती. त्या काळात अहिल्यामाईंनी आपल्या कन्येचा-मुक्ताबाईचा विवाह वयाच्या १८ व्या वर्षी केला होता. म्हणजे त्यांनी त्याही काळात बालविवाहाला विरोध केला होता. इथे आम्हाला जात-पात न मानणाऱ्या आणि चूकीच्या रुढी परंपरा न पाळणाऱ्या पुरोगामी, दृष्टया अहिल्यादेवी दिसल्या.

अहिल्याबाई ही सर्वसामान्य प्रजेच्या हितासाठी अहोरात्र झटत होती. परंतू तिला भिल्ल, पेंढारी, गोवारी, रामोशी, पारधी इत्यादी जाती-जमातीचा व्यावसायीक गरजांपोटी त्रास सहन कराव लागत होता. पोटाची खळगी भरण्याकरीता त्यांना चोऱ्या, लुटालुट, दरोडे हया बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागत असे. तेंव्हा त्यांना रोजगार, कसण्यासाठी शेती, कर्जे उपलब्ध करुन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करुन एक नविन जीवन दिले. सन्मान दिला. त्यांच्या ठिकाणी असलेल्या वाईट वृत्तीचे मुळ शोधले. स्वतः शिवभक्त असणाऱ्या अहिल्यामाईंनी केवळ शिवमंदिरासच मदत केली असे नाही तर इतर धर्मपंथाच्या श्रध्दास्थानांचाही जिर्णोध्दार केला. भारतभर तिर्थयात्रेकरु व प्रवाशांसाठी अहिल्यामाईनी धर्मशाळा बांधल्या. हया धर्मशाळा सर्व जाती-धर्माच्या लोकांसाठी सदैव खुल्या होत्या. प्रवाशांना पाणी पिण्याकरीता थेट पाण्यापर्यंत पोहोचता यावे म्हणून त्यांनी साऱ्या देशभर पायविहीरी बांधून घेतल्या. अशा पाय विहीरींना 'अहिल्याबाईची बारव' या नावाने ओळखले जाते. अशाप्रकारे मराठेशाही अस्ताला जात असतांना, संपूर्ण उत्तर भारतात इंग्रजी सत्तेचा शिरकाव झालेला असतांना इंदौरचे राज्य अहिल्यामाईच्या देखरेखीत आनंदाने, सुखासमाधानाने नांदत होते. त्यासाठी हया लोकमातेने आपले सारे जीवन चंदनासारखे झिजवून दि. १३ ऑगष्ट १७९५ रोजी हया जगाचा निरोप घेतला. हया जगन्मातेस त्रिवार अभिवादन ! अहिल्यामाईच्या कार्यातून सांप्रतच्या समाजधुरीनांना अशीच लोककल्याणाची स्फुर्ती मिळो, ऊर्जा मिळो हाच हया लेखप्रपंचाचा उद्देश.

# तंबाखूचा विळखा; मृत्यूचा सापळा



प्रासंगिक

नितीन श्रीवास्तव
मो. ९४२१४९४०४०

जागतिक तंबाखू विरोधी दिनाची सुरुवात जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) वतीने ३१ मे १९८७ साली करण्यात आली. 'तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांपासून होणारे रोग' या संदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. अमेरिकेमध्ये इसवीसनपूर्व ६००० मध्ये तंबाखूची शेती केल्याचे सर्वात जुने पुरावे सापडतात. तंबाखू विरोधी दिन म्हणून ३१ मे हा दिवस आपण सर्वत्र साजरा करतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) ने २०२५ यावर्षीची जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे घोषवाक्य ''अनमास्किंग द अपील: तंबाखू आणि निकोटीन उत्पादनांवर उद्योग धोरण उघड करणे'' हे जाहीर केले आहे.

आज देशातील तरुणवर्ग व्यसनाच्या आहारी जात आहे, असे चित्र सर्वत्र दिसून येत आहे, आजच्या युवापिढीत गुटखा, दारू, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन, सिगारेट, गर्द, गांजा, अफिम आदी व्यसनांचा फैलाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यापैकी देशात सर्वात जास्त प्रमाणात लोकांमध्ये तंबाखू सेवनाचे व विडी, सिगारेट सेवन तसेच तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाचे प्रमाण वाढत चालले आहे. आज माणसाला अत्यंत वाईट व्यसन जलद गतीने जडले आहे ते म्हणजे तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाचे. या तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाच्या व्यसनापासून कॅन्सर, क्षय, हृदयरोग, पोटाचे अनेक विकार, दुर्बलता या सारखे आजार उदभवतात. हे माणसाला माहित असतांनाही माणूस तंबाखूचे व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करतो. तंबाखूमध्ये निकोटीन, कोलतार, आर्सेनिक व कार्बन मोनाक्साईड असे सूक्ष्म घटक असतात. यातील निकोटीनमुळे आपल्या नाकातील गंध शक्ती कमजोर होते तसेच डोळ्यांच्या ज्योतीवर निकोटीनचा वाईट प्रभाव होतो.आज लहान लहान मुले देखील तंबाखूचे सेवन करताना आपल्याला दिसून येतात. आज बंदी असताना देखील छुप्या मार्गाने गुटका विकला जातो तो बंद व्हायला हवा. तंबाकूचे दुष्परिणाम पाहता तंबाकू पासून नागरिकांनी दूर राहावे असे आवाहन लक्ष्मण दिनकर सरकटे जिल्हा सल्लागार जिल्हा तंबाकू नियंत्रण कार्यक्रम बुलढाणा यांनी केले आहे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ तसेच धुम्रपान यामुळे गळ्याचे व तोंडचे कर्करोग यासारखे महाभयंकर आजार होतात.'' तंबाखूचे व्यसन असणाऱ्याला तलफ लागली तेव्हा तंबाखू मिळाली नाही तर अस्वस्थ होऊन जातो. खर तर तंबाखू हा मादक पदार्थ नाही मात्र गंभीर दुष्परिणाम करणारा व्यसनी पदार्थ आहे. तंबाखूमध्ये निकोटीन हा शरीराची अत्यंत हानी करणारा पदार्थ असतो. तसेच तंबाखूमध्ये अनेकविद्य रासायनिक घटक असतात त्यामुळे कर्करोग होऊ शकतो. तंबाखूचे नियमित सेवन करत असलेल्या व्यक्तीस हृदय विकाराचा झटका येण्याचे प्रमाणही चौपटीने अधिक असते. तंबाखू सेवनाने तात्पुरता किंवा कायमचे नपुसकत्व येते. सिगारेटद्वारे तंबाखू ओढल्याने रक्तातील प्राणवायूची जागा कार्बन मोनोक्साईड हा विषारी वायू घेतो. गुटखा सेवनाने अथवा तंबाखूची गोळी सतत दाढेत धरल्याने तोंडाचा कर्करोग होतो. प्रत्येक सिगरेट, व्यक्तीचे आयुष्य ५ मिनिटांनी कमी करते आज देशातील अनेक लोक तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करतात जसे तंबाखू चुन्याची भुकटी, तंबाखुयुक्त गुटखा, तंबाखूयुक्त खररा, बिडी, सिगारेट, चिलम. आज आपण धुम्रपान विरोधी दिन साजरा करीत आहोत त्यामुळे आपण या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे की, जरासा आगीचा चटका जरी आपल्याला लागला तर आपल्याला किती वेदना होतात. हे आपल्याला माहित असतांना सुध्दा अनेक लोक सिगारेट, बिडी, चिलम याद्वारे निर्माण होणारा धूर तोंडाद्वारे शरीरात ओढतात. सिगारेट हि तंबाखू द्वारे बनवली जाते त्यामुळे बिडी आणि सिगारेट यामध्ये सुध्दा तंबाखूचे प्रमाण जास्त असते. तंबाकू आणि तंबाकूजन्य पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याने लहान बालके देखील तंबाकू आणि तंबाकूजन्य पदार्थ सेवन करत आहेत यावर कठोर पाऊले उचलून पालकांनी आपल्या पाल्ल्यांवर लक्ष द्यावे'', असे आवाहन डॉ.भागवत भुसारी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा यांनी केले आहे. आज तंबाखू विरोधी दिन म्हणून सिगारेट आणि बिडीचे असणारे धोकेही आपण जाणून घेणे गरजेचे आहे. सिगारेट, बिडी पितांना माणूस हा विचार का करत नाही की, सिगरेटचा, बिडीचा धूर तोंडाने आत ओढतो त्या धुराने आपल्या शरीरात किती काळे पडत असेल. माणसाने या गोष्टीचा विचार करायला हवा. तुम्ही स्वतः धुम्रपान करीत नसाल तरी, इतर व्यक्ती धुम्रपान करीत असतांना त्या ठिकाणापासून लांब राहण्याची सवयही लावून घ्या; कारण रस्त्यात, बारमध्ये, तसेच इतर ठिकाणी धुम्रपान होत असेल आणि तुम्ही या ठिकाणी उपस्थित असाल, तर तुनाच्या श्वासोच्छवासावरही परिणाम होऊ शकतो. युनिवर्सिटी ऑफ एथेंस, युनाँनमध्ये हॅलॅनिक कॅन्सर सोसायटी आणि हाँवर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थच्या संशोधकांनी एका अध्ययनात ही माहिती दिली. 'युनिवर्सिटी ऑफ एथेंस' च्या पानाजियोटीस बेहराकीस यांनी सांगितले की, बारच्या स्मोकिंग झोन किंवा बंद कारमध्ये धुम्रपान केल्यामुळे सूक्ष्म कणांची दाट घनता निर्माण होते. धुम्रपान न करणाऱ्या व्यक्ती काही वेळा श्वास घेतांना त्या कणांच्या संपर्कात येतात. याचा त्रासही त्यांना सहन करावा लागतो. धुम्रपान केल्यानंतर सोडलेल्या धुराच्या अल्पकालीन प्रभावाच्या अभ्यासावरून हे स्पष्ट झाले आहे की, धुम्रपान न करणाऱ्या व्यक्तीच्या श्वासनलीकांना थोड्या वेळही अशा वातावरणात राहिल्याने अपाय होऊ शकतो, राज्यात २०१२ पासून गुटखाबंदी आहे. अन्न व सुरक्षा मानदे कायदा २००६ विनियमन २०११ नुसार गुटखा विक्री करणे किंवा वितरण करणे गुन्हा ठरतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न व औषधी प्रशासन हा स्वतंत्र विभाग आहे. परंतु आज ही राज्यात छुप्या मार्गाने गुटका विकला जातो. यात कारवाही होते ती छोट्या टपऱ्यावाल्यावर परंतु जेथून हा गुटका येतो त्या कारखान्यावर कारवाही करने गरजेचे आहे. ३१ मे या तंबाखू विरोधी दिनी माणसाने जीवन जगतांना खर तर तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन न करता जीवन जगावे. कारण जीवन हे अनमोल आहे या जीवनाचे मोल माणसाने ओळखायला हवे व माणसाने चांगले जीवन जगावे हीच अपेक्षा!

# अहिल्यादेवी होळकर : भारतीय स्त्री चिंतनाचा आदर्श



अभिवादन

सौ. वैशाली बाभुळकर
अकोट



आपला भारत देश म्हणजे हजारो वर्षाच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय ,आर्थिक आणि धार्मिक बदलांचा देश. भारताच्या इतिहासाच्या पानावर अनेक थोर व्यक्ती आपल्याला दिसतात. ज्यांनी आपल्या पराक्रमाने आणि कर्तुत्वाने भारताचे नाव जागतिक पातळीवर उज्वल केले. १७व्या १८व्या शतकामध्ये अनेक वीर पुरुषांनी परकीय आक्रमणांशी लढून पराक्रम गाजविला आहे. वीर पुरुषच नाहीत तर अनेक थोर स्त्रियांचाही त्यात मोठा सहभाग आहे. त्यामध्ये झाशीची राणी, राजमाता जिजाबाई ,ताराबाई, मीराबाई ,कित्तूरची राणी चन्नम्मा, राणी अवंतीबाई लोधी, सरस्वतीबाई जोशी, अहिल्यादेवी होळकर या थोर स्त्रिया दिसून येतात. यामधील अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा इतिहास पाहिला तर अहिल्यादेवी ह्या एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व होत्या.

अहिल्यादेवीचा जन्म महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौडी या गावी ३१ मे १७२५ रोजी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे एक सामान्य शेतकरी होते. लहानपणापासूनच अहिल्यादेवी धार्मिक व धैर्यवान स्वभावाच्या होत्या. त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वामुळे इंदूरचे होळकर घराण्याचे मल्हारराव होळकर यांनी आपला मुलगा खंडेराव याचा विवाह अहिल्यादेवी शी केला.

भारतीय इतिहासात अनेक महान स्त्रियांनी समाज, धर्म आणि प्रशासनाच्या क्षेत्रात आपली असाधारण कामगिरी बजावली आहे. त्यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्या केवळ एक कर्तबगार राणी नव्हत्या तर त्या स्त्री शक्तीच्या जागृत प्रतिक होत्या. त्यांनी ज्या प्रकारे वैचारिक सामाजिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून नेतृत्व केले, त्यातून भारतीय स्त्री चिंतनाचे एक उच्चतम आदर्श समोर येते.

**अध्यात्मिक आणि नैतिक नेतृत्व :** अहिल्यादेवींचे जीवन हे साधेपणा, श्रद्धा, भक्ती आणि न्यायनिष्ठा यांचे उत्तम उदाहरण होते. त्यांनी आपल्या प्रशासनामध्ये धर्म आणि नीतीला अग्रक्रम दिला. राजकारणात असूनही त्या अत्यंत आध्यात्मिक वृतीच्या होत्या. स्त्रियांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता समाज घडवण्यातही भूमिका बजवावी असा संदेश त्यांच्या कार्यातून दिसून येतो

**स्त्री कर्तृत्वाची साक्ष :** अहिल्यादेवी होळकर या इंदूरच्या होळकर घराण्याच्या राणी होत्या. पतीच्या निधनानंतर त्यांनी राज्यकारभार सांभाळला आणि अत्यंत यशस्वीपणे तो चालवला. युद्ध कौशल्य न्यायव्यवस्था लोककल्याण आणि धर्मकार्यातील त्यांचे योगदान आदर्शवत आहे त्यांनी अनेक घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या ज्यातून त्यांच्या दूरदृष्टीचा आणि कर्तव्यपरायणतेचा परिचय मिळतो.

**स्त्री चिंतनाची प्रेरणा :** भारतीय स्त्री चिंतनामध्ये धर्म, त्याग, कर्तव्य आणि समानता या मूल्यांना महत्त्व आहे. अहिल्यादेवींच्या जीवनातून हीच मूल्य प्रतिबिंबित होतात. त्या काळातील परंपरागत स्त्री भूमिकेच्या मर्यादा पार करत त्यांनी स्वतःला एक आदर्श प्रशासक, न्यायप्रिय नेत्या आणि धार्मिक कार्यकर्त्या म्हणून सिद्ध केले.

अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आणि कार्य हे केवळ ऐतिहासिक गौरवापुरते मर्यादित नाही, तर आजच्या स्त्रीच्या आत्मभानासाठी आणि सामाजिक भानासाठी ही प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार, मूल्ये आणि कार्यपद्धती या आजच्या स्त्री विचारांच्या प्रवाहात अजूनही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामुळेच अहिल्यादेवी होळकर या भारतीय स्त्री चिंतनाच्या आदर्श स्थानावर विराजमान आहेत.

अशा या लोकप्रिय लोकमातेने श्रावण वैद्य चतुर्दशीला म्हणजेच १३ ऑगस्ट १७९५ ला अखेरचा श्वास घेतला. आजच्या युगात सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक सुधारणा घडवण्यासाठी त्यांच्या कार्याची स्मरण करणे आणि त्यांचे तत्त्वज्ञान आचरणात आणणे फार महत्त्वाचे आहे. अहिल्यादेवींनी केलेले कार्य अनेकांना धैर्य, शौर्य, स्फूर्ती देवो. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवींना माझा प्रणाम!!

**राणी असंख्य झाला या जगात,**
**पण पुण्यश्लोक कोणीही नाही,**
**गर्व आहे या मराठी हृदयाला**
**एकच ती महाराणी**
**अहिल्यादेवी हो झाली..!**

# राजमाता अहिल्याबाई होळकर : तेज, करुणा आणि नेतृत्वाचे अमर प्रतीक...



दिन विशेष

ज्योती चव्हाण (राठोड)
७५८८५९०९९८

भारताच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वं अशी असतात, ज्यांचं जीवन केवळ एक यशोगाथा नसते, तर तो एक युगप्रवर्तक प्रवास ठरते. अशा अजरामर व्यक्तिमत्त्वांमध्ये सर्वप्रथम नाव घेतलं गेलं पाहिजे राजमाता अहिल्याबाई होळकर यांचं. एक विधवा, एक आई, एक राणी, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, एक द्रष्ट्या नेत्या. त्यांचं आयुष्य हे केवळ प्रशासनाचा इतिहास नाही, तर ते आहे स्त्रीशक्तीच्या उज्वल प्रकाशाचं प्रतीक जे आजही अंधारात हरवलेल्या अनेकांना दिशा दाखवतं. मराठ्यांच्या इतिहासाच्या पटावर शुक्राच्या चांदणीसारखं लुकलुकणार तेजस व्यक्तिमत्व, त्या सत्ताधारी होत्या पण सिंहासनावर नव्हत्या, त्या राजकारणी होत्या पण सत्तेच्या चळवळीत कधीच नव्हत्या .त्या पेशव्यांशी निष्ठावंत होत्या पण त्यांच्यापुढे कधीच नतमस्तक नव्हत्या, त्या व्रतस्थ होत्या पण संन्यासीनी नव्हत्या. ज्यावेळी लढाई हे जीवन होतं आणि लूट हा धर्म होता, हुकूमत हा सत्तेचा स्वभाव होता, त्यावेळी त्यांच्या कल्याणी प्रतिभेचे किरण नदीवरच्या घाटातून उमटले. त्यांच्या जीवनदायी प्रेरणेने अन्नछत्रे धर्मशाळांच रूप घेतलं .त्यांच्या अनाक्रम धर्म शीलतेचे मंगलध्वनी भारत खंडाच्या मंदिरा मंदिरातून घुमले. असे तेजस व्यक्ती म्हणजे राजमाता अहिल्याबाई होळकर निश्चितच राष्ट्रासाठी भूषणावह आहेत.

३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चांडोळी या लहानशा खेड्यात अहिल्याबाईंचा जन्म झाला. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणं हे जवळजवळ पाप मानलं जात होतं. पण त्यांचे वडील, माणकोजी शिंदे, हे दूरदृष्टीचे होते. त्यांनी आपल्या कन्येला वाचन, लेखन, धार्मिक आणि सामाजिक ज्ञान देण्याचा धाडसी निर्णय घेतला. हेच संस्कार त्यांच्या पुढील जीवनात मार्गदर्शक ठरले. त्या केवळ बुद्धिमानच नव्हत्या, तर अंतर्मुख आणि करुणामयी होत्या. बालपणातच त्यांची मनोभूमिका शहाण्या स्त्रीच्या अंगभूत गुणांनी घडली होती. याच गुणवत्तेमुळे, मल्हारराव होळकरांनी एका सामान्य घरातील मुलीला आपल्या पुत्राच्या आयुष्यातील अर्धांगिनी म्हणून स्वीकारलं. पती खांडेराव होळकर यांचा अकाली मृत्यू, त्यानंतर सासऱ्यांचे निधन हे दुहेरी दुःख कोणा साधारण स्त्रीला कोसळवून टाकलं असतं. पण अहिल्याबाईंसाठी हे क्षण संघर्षातून उभं राहण्याचं सामर्थ्य घेऊन आले.तत्कालीन परिस्थितीत विधवा स्त्रीस सत्ता चालवण्याची परवानगी नव्हती. पण अहिल्याबाईंनी हा अन्याय स्वीकारला नाही. त्यांच्या नेतृत्वगुणांना ओळखून प्रजेनं त्यांचं राज्यारोहण उत्साहात स्वीकारलं. आणि इथेच एक नव्या युगाची, एका स्त्रीच्या विलक्षण नेतृत्वाची सुरुवात झाली.

इंदूरहून त्यांनी राज्यकारभार हाती घेतला. परंतु त्यांचा कारभार केवळ दरबारी सत्तेवर आधारित नव्हता, तो होता माणसांच्या मनांवर राज्य करणारा, न्याय, करुणा आणि समतेचा आधारभूत राज्यव्यवस्थेचा आदर्श.

त्यांनी दररोज सकाळी दरबारात न्यायनिवाडा केला. कोणत्याही जाती-पातीत न पाहता न्याय दिला.

शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी त्या त्यांच्या शिवारात जाऊन संवाद साधत.व्यापार, कृषी आणि पाणीसिंचनाच्या योजना राबवत, त्यांनी एक आर्थिकदृष्ट्या समृद्ध राज्य उभं केलं.त्यांनी गोरगरीबांसाठी अन्नछत्रं, धर्मशाळा, रस्ते, घाट आणि विहिरी बांधल्या. त्यांचा राजधर्म म्हणजे सेवा, आणि धर्मसेवा म्हणजे सामाजिक कल्याण. त्यांनी प्रजेच्या दुःखाला आपलं दुःख मानलं, आणि त्यांच्या विकासात स्वतःचं समाधान पाहिलं. अहिल्याबाई होळकर या गाढ धार्मिक होत्या,पण धर्मांध नव्हत्या .त्यांनी कधीच धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा, जातिव्यवस्था किंवा स्त्रीद्वेष स्वीकारला नाही. त्यांचा धर्म हा समतेचा, सहिष्णुतेचा आणि सेवाभावाचा होता. त्याकाळचे सुप्रसिद्ध इतिहासकार सर जॉन माल्कम लिहितात .''अहिल्याबाई ही एक असामान्य स्त्री आहे. दुरभिमानाचा त्यांना स्पर्शही नाही. धर्म पारायण असलेली ही स्त्री कमालची सहनशील आहे त्यांचे मन रूढीप्रिय असले तरी रुढीचा उपयोग जनकल्याणासाठी करून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. प्रत्येक क्षणाला सदसद्विवेकबुद्धी ने कर्तव्य करणारे हे उच्च प्रतीचे जीवन आहे. त्यांच्या चरित्राचा विकास अद्वितीय आहे.'' त्यांनी देशभरातील अनेक मंदिरांची पुनर्बांधणी केली. मंदिरांचं पुनरुज्जीवन म्हणजे केवळ धार्मिकतेचं दर्शन नव्हे, तर भारतीय सांस्कृतिक वारशाची जपणूक देखील होती. आजही अनेक घाटांवर आणि मंदिरांवर त्यांच्या नावाच्या शिलालेखा दिसतात, हा त्यांच्या दूरदृष्टीचा, श्रद्धेचा आणि स्थापत्यदृष्ट्या भव्यतेचा पुरावा आहे.

अहिल्याबाई होळकर यांचं जीवन म्हणजे स्त्रीशक्तीचा अमर दीप आहे. त्या काळात सती जाणं हा स्त्रियांसाठी आदर्श मानला जात होता. पण सासरे मल्हाररावांनी त्यांना सती जाऊ दिल नाही आणि त्यांनी सती जाणं नाकारून, स्वतः राज्यकारभार हातात घेऊन एक नवा आदर्श निर्माण केला. त्यांनी आपल्या निर्णयांनी, आचरणाने आणि नेतृत्वाने दाखवून दिलं की स्त्री केवळ सहनशील नसून सक्षमही आहे. ती केवळ सौंदर्याचं प्रतीक नाही, तर निर्णायक आणि द्रष्ट्या नेतृत्वाचं मूर्त स्वरूप आहे. ती धर्माची रक्षणकर्ती असूनही समाज बदलवणारी शक्ती आहे. त्यांच्या कर्तव्यकर्माचा पटच मोठा बुद्धीचा आवाज प्रचंड आणि सामर्थ्य दांडगे आयुष्यात पुढे टाकलेली संकटे व पचवलेली दुःखे अगणित आणि असंख्य . त्यांच्यावर आलेली संकटे यापुढे लाचार न होता स्वाभिमानाने त्यातून मार्ग काढला आणि कर्तव्याचा कर्मयोग आचरून कन्या, स्त्री, सून ,माता आणि कर्तव्य कठोर मुत्सद्दी , प्रजावत्सल राजकारणी यांचा मनोहर आणि वंदनीय आदर्श सर्व समाजापुढे त्यांनी ठेवला. आजच्या काळात जेव्हा आपण महिला सक्षमीकरण, स्त्री समानता याबद्दल बोलतो, तेव्हा अहिल्याबाईंचं जीवन हे एक जिवंत उदाहरण बनतं. त्यांनी दाखवून दिलं की स्त्री कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही संकटात, अत्युच्च स्थान गाठू शकते आणि ती जेव्हा सत्तेवर येते, तेव्हा सत्तेचा वापर जनतेच्या कल्याणासाठी कसा करायचा, हे ती अधिक चांगल्या प्रकारे शिकवते.१३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्याबाईंनी या जगाचा निरोप घेतला. पण त्यांचं कार्य, त्यांची मूल्यं, आणि त्यांचं तेज हे आजही अनेक स्त्री-पुरुषांच्या अंत:करणात दीपस्तंभासारखं तेज देतं. आजही इंदूर शहरात त्यांचे स्मारक, त्यांचं वास्तव्य आणि त्यांच्या कार्याची अनेक स्मृती जिवंत आहेत. अहिल्याबाई होळकर हे केवळ इतिहासातील एक नाव नाही, तर त्या आहेत संवेदनशीलतेच्या कुशीत धैर्याचं व्रत घेऊन चालणाऱ्या स्त्रीशक्तीचं चिरंतन प्रतीक. त्यांचं जीवन म्हणजे काळाच्या ओघातही झळाळत राहिलेलं एक तेजस्वी दीपस्तंभ आहे, जो आजही स्त्रियांना न्याय, करुणा, नेतृत्व आणि आत्मविश्वासाची प्रेरणा देतो. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे 'संवेदनशीलतेतून शक्ती, सेवेतून सत्तेचं भान, आणि त्यागातून समाज परिवर्तन' हे जीवनमूल्य आजच्या स्त्रीसाठी अहिल्याबाईंचं जीवन म्हणजे धैर्य, विवेक आणि नीतिमत्तेचा जिवंत पाठ आहे. त्या काळाच्या पलीकडे जाऊन आजही प्रत्येक स्त्रीच्या मनात आशेचा किरण बनून झळकतात. जेव्हा एखादी मुलगी स्वतःच्या अस्तित्वासाठी लढते, जेव्हा एखादी आई एका हाताने संसार आणि दुसऱ्या हाताने सामाजिक जबाबदारी निभावते, तेव्हा तिथं अहिल्याबाईंचा प्रेरणास्रोत नकळत कार्यरत असतो. त्यांनी घडवलेलं जीवन हे केवळ शौर्यगाथा नव्हे, तर प्रत्येक स्त्रीच्या स्वप्नांना बळ देणारी सजीव प्रेरणा आहे. त्यांनी दाखवलेलं संयमाचं, सहिष्णुतेचं आणि न्यायाचं मार्गदर्शन आजही काळाच्या वावटळीत स्त्रीला दिशा दाखवतं. अशा या तेजस्विनीचा आदर्श म्हणून उल्लेख करणे, म्हणजेच भारतीय स्त्रीशक्तीच्या उज्वल भविष्यासाठी ठाम पाया रचणे होय.





## लोकरंग

# खरीप पिकांच्या हमीभावात वाढ

दरवर्षी प्रमाणे यंदाही खरीप हंगामाच्या सुरवातीलाच केंद्र सरकारने खरिप हंगामात विविध राज्यात जी पीक घेतली जातात त्या पिकांच्या हमीभावात वाढ केलेली आहे. याशिवाय कृषी व्याज अनुदान योजनेस देखील मंत्रिमंडळाने वाढ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. खरीप पिकांच्या हमीभावात झालेल्या वाढी संदर्भात शेतकरी संतुष्ट आहेत का?आणि हि वाढ समाधानकारक आहे का?याच अनुषंगाने कृषी क्षेत्राचे अभ्यासक रमेश पाध्ये यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**साप्ताहिक संवाद**

### हमीभावात केंद्र सरकारने नेमकी किती वाढ केली आहे?

नुकतीच आगामी खरीप हंगामासाठी विविध पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केलेली आहे., आणि हि वाढ समाधानकारक आहे असं निश्चित म्हणता येईल. आगामी खरीप हंगामासाठी जुले ते ऑगस्ट सामान्य आणि अ दर्जाच्या वाणांसाठी आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली आहे. यानुसार भाताचा हमीभाव २,३२० रुपयांवरून २,३८९ रुपये करण्यात आला आहे. ज्वारीच्या किमतीत ३,३७१ रुपयांवरून ३,६९९ इतकी वाढ आहे. माल्दाडा जातीच्या ज्वारीच्या किमतीत ३,७४९ रुपये वाढ केलेली आहे. मोती बाजरीचा हमीभाव २,७७५ रुपये,नाचणी ४,८८६ रुपये,कपाशी ८,११० रुपये,मका २,४०० रुपये,तर तूरडाळ ७५५०वरून ८००० रुपये,मूग ८६८२ वरून ८,७६८ रुपये तर भुईमूग ६,७८३वरून ७,२६३ रुपये असा भाव दिला गेला आहे.

### यंदाच्या वर्षातील खरिपाच्या हमीभावात फरक दिसतो आहे का?

होय नक्कीच. मागील १० -१२ वर्षात खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत सातत्याने वाढविण्यात आलेली आहे. नवीन हमीभावामुळे सरकारी तिजोरीवर २ लाख ७ हजार कोटी रुपयांचा भार पडणार आहे. मागच्या वर्षाच्या हंगामापेक्षा यंदाची रक्कम हि ७ हजार कोटी रुपयांनी जास्त आहे. किमान आधारभूत पिकांच्या खर्चापेक्षा किमान ५० टक्के जास्त असेल. याची काळजी घेण्यात आलेली आहे.

### सरकारने कृषी व्याज अनुदान योजनेला देखील मुदतवाढ दिलेली आहे?

होय याच कृषी अनुदान योजनेत ज्या शेतकऱ्यांनी वेळेवर कर्ज फेडले आहे अशा शेतकऱ्यांना २०२५-२६ साठी १. ५ ते ३ टक्के अतिरिक्त व्याज अनुदानाचा लाभ देणाऱ्या किसान क्रेडिट कार्डची सुधारित व्याज अनुदान योजना देखील सुरु ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डद्वारे परवडणाऱ्या दराने अल्पकालीन कर्ज मिळते.देशात सुमारे ७. ७५ केसीसी खाती आहेत.

# रेमेडियम लाइफकेयरचा ट्रम्प फार्मा टॅरिफमुळे बलाढ्य कंपनी म्हणून उदय

संभाव्य फार्मास्युटिकल्स टॅरिफ्सवरून तर्कवितर्क वाढत असताना जागतिक स्तरावरील फार्मा स्टॉक्समध्ये नव्याने अस्थिरता पाहायला मिळत आहे. मात्र, बाजारपेठेतील तज्ज्ञांनुसार ही काळजी अवास्तव आहे, विशेषतः अमेरिकी बाजारपेठेशी मर्यादित किंवा अजिबात संबंध नसणाऱ्या कंपन्यांनी चिंता करण्याची गरज नाही.रेमेडियम लाइफकेयर ही मिड- कॅप, बीएसई नोंदणीकृत फार्मा कंपनी सध्या सुरू असलेल्या गोंधळात सुरक्षित कंपनी म्हणून उठून दिसत आहे. कंपनीचा व्यवसाय अमेरिका-केंद्रित धोरणांच्या जोखमींपासून धोरणात्मक पद्धतीने सुरक्षित असून, कंपनीने युरोप व आशियात दमदार विस्तार करत एपीआय इंटरमीडीएट्सवर लक्ष केंद्रित केले आहे. विशेष म्हणजे, रेमेडियमने नुकतेच युकेतील आघाडीच्या फार्मास्युटिकल कंपनीकडून १८२.७ कोटी रुपयांचे निर्यातीचे कंत्राट मिळवत बाजारपेठेतील स्थान आणि जागतिक अस्तित्व दाखवून दिले आहे.जागतिक गुंतवणूकदार अमेरिकी व्यापारावर प्रामुख्याने अवलंबून असलेल्या फार्मा स्टॉक्समधील त्यांच्या गुंतवणुकीचे पुनर्मूल्यांकन करत असताना वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेल्या, भविष्यकालीन योजना, नाविन्यावर आधारित विकास असलेल्या कंपन्यांकडे लक्ष वळत आहे. रेमेडियमचा सीएनएस, ऑँकॉलॉजी आणि मेटॅबॉलिक रिसर्चमध्ये सध्या सुरू असलेला विस्तार आणि सिंगापूरस्थित रेमलाइफ ग्लोबलसारख्या आधुनिक, प्राणीअंश मुक्त उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या मदतीने दीर्घकालीन मूल्य आणखी वाढत आहे.नाविन्य धोरणामध्ये भर घालण्यासाठी रेमलाइफ ग्लोबलने जियायु लाइफसायन्सेस या ग्रीन केमिस्ट्री प्लॅटफॉर्मसह भागिदारी केली आहे.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 57

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | रु | | | | |
| | द | म | द | मा | ट | | | | धि | | | | |
| | | | | | | | | | रा | | | | |
| | | | | | | | | | भि | | | | |
| | | | | | | | | | स | | | | |
| | | | | | | | | | र | | | | स |
| | | | | | | | | | ण | | | | र |
| | | | | | | | | | | | | | ब |
| | अ | मं | ग | ल | | | | | | | | | रा |
| म | | | | | | | | | | | | | ई |
| स | | | | | | | | | | | | | |
| ल | | | | | | | | | | | | | |
| त | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | बा | ई | ल | वे | डा |

### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
- अर्क
- कथा
- गदा
- गर
- गोड
- चेव
- जाब
- डबा
- तण
- नद
- नाभि
- निशा
- पक्का
- फेरा
- मान
- मास
- मीन
- यमी
- रमा
- रव
- लक
- वजा
- शास्त्र
- हल

**तीन अक्षरी**
- कणव
- कवन
- कामना
- जकात
- टक्कल
- ताकत
- दमन
- धिक्कार
- नकार
- नकुल
- नमाज
- नकोसा
- निशान
- माकड
- मांजर
- मांडव
- वस्तरा
- साकार
- हलका

**चार अक्षरी**
- अन्नसत्र
- अमंगल
- अलौकिक
- असामान्य
- आभूषण
- आवेदन
- काटकोन
- डरकाळी
- थाटमाट
- नागासाकी
- प्राणनाथ
- मसलत
- सचेतन
- संप्रदाय

**पाच अक्षरी**
- कुलभूषण
- गरजवंत
- दमदमाट
- नावलौकीक
- बाईलवेडा
- रुपगर्विता
- वचनबद्ध
- सभामंडप
- सरबराई

**अन्य अक्षरी**
- रुधिराभिसरण
- वेदशास्त्रसंपन्न

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | कु | र | | प | रि | घ | | स | मु | द्र | मं | थ | न |
| | ब | | क | ल | | र | क्ष | क | | वि | | क | र |
| कुं | ड | | ल | ट | पे | | म | ळी | | भ | | पे | |
| भ | | अ | | ण | | मा | | क | ल | व | ती | | ट |
| मे | ज | वा | नी | | व | र्च | स्व | | ज | न | | मा | मा |
| ळा | | स्त | | अ | | | त्य | | हे | | चि | ल | ट |
| | प | व | न | च | क्की | | वि | रा | म | चि | न्ह | | र |
| वा | डी | | स | म | | अ | रा | स | | ता | | ए | |
| चा | त | क | | न | | घा | म | | गौ | री | शं | क | र |
| ळ | | द | मा | | प | त | | पा | र | | क | ल | |
| | द | | न | का | र | | हि | र | व | ळ | | कें | द्र |
| वी | र | र | स | | स | ह्य | | द | | | पा | ड | व |
| | म | | | अ | दा | | द | र्श | नि | का | | | खे |
| म | हा | ब | ळे | श्व | र | | शा | क | | व | सुं | ध | रा |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 437

**—: आडवे संकेत :—**

1) चैतन्य, शुद्धी, मनाची जागृत स्थिती
3) काही कारण नसताना, अकारण
6) जमिनीवरील कर, पट्टी
8) सौजन्य, नम्रता
10) परिस्थितीनुसार रंग बदलणारा पालीसारखा एक प्राणी
11) तपास करण्याच्या कामावर नेमलेला अधिकारी, परीक्षक
12) उसाचा कढविलेला दाट रस
13) प्रत्यक्ष योजिलेल्या शब्दांच्या अर्थाला अगदी विपरित अर्थ अपेक्षित असतो त्याला ही संज्ञा देतात
16) कैलासवासीचे संक्षिप्त रुप
17) स्वामी, धनी 18) नाश पावणारे
22) मत्सर, द्वेष
23) बलिष्ठ, शक्तिशाली
25) स्वर्गलोकीचा राजा इंद्राचे आयुध
26) दुर्लभ, मोठ्या कष्टाने मिळण्यासारखे
27) गुपित, गूढ, गुप्त गोष्ट
29) केवळ उपचार म्हणून वरवर केलेले
31) जोड, गांठ 33) पित्ताशय
34) पृथ्वी, धरणी
36) काश्मिरातील एक प्रसिद्ध सरोवर
37) हलके, नीच कमी दर्जाचे
39) एक खासगी दूरचित्रवाहिनी
40) पातळ, क्षणिक, चंचल
43) नक्षत्र, तारका, चांदणी
44) चेष्टा करणारा, थट्टा करणारा
47) आकार देणे, घडविणे, वळण्यास लावणे
48) हुशार, ज्ञानी, विद्वान
51) सर्व अंगाभोवती गुंडाळलेले कापड, तोंडावरचा पदर
53) 'कोणतेही काम करण्यास नेहमी तत्पर असणे' या अर्थाचा एक वाक्प्रचार
56) वायस, कावळा
59) जिचे लग्न आहे अशी मुलगी
60) मुंबईतील एक उपनगर
61) मनातील इच्छा पूर्ण करणारा एक काल्पनिक वृक्ष
63) स्वतःशीच केलेले संभाषण
65) डोळ्यात घालावयाचे अंजन, काजळ (उर्दू)
67) ऐवज, द्रव्यसंख्या
68) शक्ती, सामर्थ्य
69) अंगरखा, शर्ट
71) लावण्य, सौंदर्य
72) दरवाजाची फळी
73) माझे (सं.)
74) कल्याण, मंगलकारक
75) वर्गवारी लावणे, क्रमवार मांडणे
77) पुत्र, मुलगा

**—: उभी विधाने :—**

1) नवऱ्याचा वडील भाऊ
2) अघोरी विद्या साध्य करण्यासाठी मंत्रतंत्राने एखाद्याचा नाहक प्राण घेणे
4) जनावरांचा समूह
5) तळहात
6) अपेक्षा धरून केलेले, दुसऱ्याशी तुलना करून होणारे
7) आराधना, पूजा, तप
8) नम्र, लीन, निगर्वी
9) शीर, नाडी
13) थोड्यावेळ विश्रांती घेणे, आरामासाठी थांबणे
14) संजयदत्तच्या वास्तव चित्रपटात त्याच्या आईची भूमिका करणारी मराठी चित्रपट चरित्र अभिनेत्री
15) वाईट सवय, खोड, दुर्गुण
18) आर्जव, प्रार्थना
19) चंद्र, शीतलता देणारा
20) लष्करी लोकांची वस्ती, सैन्याचा तळ
21) यांत्रिकीकरणामुळे वातावरणातील नैसर्गिक हवा खराब होणे
22) हयगय, दुर्लक्ष, अवहेलना
24) गोडी, चव, स्वाद
28) महाभारतात युद्धात अर्जुनाने सूर्यास्तापूर्वी याला ठार करण्याची प्रतिज्ञा घेतली होती
30) पाताळ, खालचा भाग
32) निरर्थक, अयोग्य, निरुपयोगी
35) तासणे, साल काढणे
38) माता, जननी
41) रविवार, सुटीचा दिवस
42) ज्ञानशक्ती, मति
45) वेश्या, वारांगना 46) पारवा
47) माल ठेवण्यात येणाऱ्या वखारीचा मालक
49) महाभारतात नकुल, सहदेवाची माता
50) श्री गणेशाचे रुप
52) गुण, किंमत, योग्यता
54) बेताचे, विशेष सांगण्यासारखे नसलेले
55) अंदाज, सुमार
56) कावळ्याचे ओरडणे
57) योजक, शोधक, कल्पना लढविणारा
58) वृक्ष, झाड
62) अंधार, काळोख
64) सैन्यातील बाजारबुणगे, लेंढार
65) इतिहासकालीन एक सुप्रसिद्ध अंध संतकवी
66) निरोगी, सुदृढ, आनंदी
70) दाबून टाकणे, संयमन
71) भगवान शंकराचा एक अवतार, भयंकर

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | स्त | क | | न | | आ | नं | द | घ | न | | ग | ल | ब | त |
| स्त | | | | र | हा | ट | | म | र | ग | ळ | णे | | टू | |
| क्षे | त्र | र | क्ष | क | | वि | | | | र | | श | त | | ड |
| प | | ज | | पा | र | णे | फि | ट | णे | | भू | | मा | प | |
| | ह | त | ब | ल | | | र्या | | | | पा | द | चा | री | |
| क | ल | म | | | म | | द | | | का | ळी | मा | | स | य |
| | | हो | ळ | प | ळ | णे | | प्रा | चा | र्य | | | पा | | म |
| बि | भ | त्स | | ट | का | | को | य | | का | च | कु | ई | री | |
| ज | | व | ण | वा | | र | | श्चि | | रि | | ल | क | | ता |
| व | र | | | री | | ज | | त | रु | णी | | दै | | श्वा | स |
| र | ब | ड | गा | | व | त | न | | द्रा | | सा | व | धा | न | |
| | डी | | ल | बा | ड | | स | रो | व | र | | त | | | आ |
| गो | | अ | बो | ल | | टी | | | ता | ट | वा | | अं | गा | ई |
| लं | का | | ट | क | म | क | | च | र | | | पा | ग | ल | |
| दा | स | | | | र्या | | ग | र्व | | फां | दी | | ण | | अ |
| ज | व | स | | उ | दा | ह | र | ण | | | न | त | | खु | जा |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या कोणत्याही ठिकाणी निर्णय घ्या. लोक तुमचा ॲप्लिकेशन अधिकारी करू शकतात.

**वृषभः** आज तुमचा दिवस बातमीने सुरू होईल. पोलीसात, मित्र आणि प्रियजन तुम्हाला तुमचे पूर्ण अधिकार आहेत. तुम्हाला आराम मिळेल.

**मिथून :** किंमतीच्या कामाची उत्कृष्ट कामगिरीचा प्रयत्न करा. जर तुम्ही ते इतर सोडले तर तुमचे काम खराब होऊ शकत नाही.

**कर्क :** आज आर्थिक राष्ट्र काही चढ-उतार चिन्हे. उत्पन्ना प्रमाणच खर्चही त्याच विकासाची प्रगती आहे. कुटुंबातील सदस्य एकत्र करा.

**सिंह :** मला विनंती जास्त कारण मला तुम्हाला चिंता आणि क्षणात सांगता येईल. शारीरिक आणि मानसिक दुर्बल-ता वाढू शकते. आज तुमी घ्या.

**कन्या:** आज तुमची एक जुनी इच्छा पूर्ण होईल. तुमच्या व्यवसायावर लक्ष केंद्रित करा. अन्यथा, व्यवसायातील अस्वस्थ-तेमुळे तुमचे मन दुःखी होऊ शकते.

**तुळ :** आज वैवाहिक जीवनात पती-पत्नी आनंद आणि उत्तीर्ण. कुटुंबातील सदस्य एकत्र करा. प्रेमबंधांमध्ये विश्वासाची भावना कायम ठेवा.

**वृश्चिक :** आजच्या ठिकाणी तुमच्याप-ासून सावध राहा. सामान्य संघर्ष, काही प्रलंबित पूर्ण होती. आज गोंधळात टाकून वैध संयमाने निर्णय घ्या.

**धनु :** आज तुम्ही तुमच्या उत्पन्नावर अधिक लक्ष केंद्रित करा. कामात यश न मिळाल्याने, आर्थिक लाभ होणार नाही.

**मकर :** राजकारणावर मात कराल. तुम्हाला जुना खटला गेलाल. व्यवसायात प्रांतच नफाही होईल. बहुराष्ट्रीय संबंधित लोकांना पोलिसात विजयी. तुमच्या माझ्यात तुमच्या नातेवाइकांचा फायदा तुम्हाला आहे.

**कुंभ :** व्यवसायात चांगले उत्पन्न आर्थिक स्थिती फलित होईल. संपत्ती जमीन, प्रोत्साहन, वाहन आणि भौतिक सुखसोयी सुरक्षित करण्यासाठी प्रयत्नशील होणार.

**मीन :** आज तुम्हाला काही सुवार्ता सांगू शकते. तुमची एखाद्या प्रिय व्यक्तीशी भेट होईल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होती. व्यवसायात प्रचंड उत्साह.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### हिंगणा तामसवाडीवासी भोगताहेत नरकयातना



**हिंगणा, :** येथून जवळच असलेल्या गटग्रामपंचायत हिंगणा, तामसवाडी, निंभोरा येथील नागरीकांना नरकयातना भोगाव्या लागत आहेत. गावातील अजाबराव बबन ओहे या गावकऱ्याचे निधन झाले असता त्याची अंत्ययात्रा ही सुद्धा जागोजागी असलेल्या पाण्याच्या डबक्यामधून काढावी लागली आहे. ही संपूर्ण गावकऱ्यांकरिता व लोकप्रतिनिधींकरिता शरमेची बाब आहे. जीवनभर मरणयातना भोगणाऱ्या नागरीकांना मेल्यानंतरही त्याच्या अंत्ययात्रेला सुद्धा यातना होत असतील तर याला प्रशासनाची किती संवेदनशीलता म्हणावी. ग्रामीण भागाकडे लोकप्रतिनिधी हे नेहमीच दुर्लक्ष करित असतात. आयुष्यभर राब राब राबून आपले जीवन व्यापन करणाऱ्या व्यक्तीला शेवटचा क्षण तरी गोड व्हावा हीच एक अपेक्षा असतांना दुर्लक्षीत असलेल्या ग्रामीण भागामध्ये जर अंत्ययात्रेच्या वेळी सुद्धा अशी अवस्था होत असेल तर याविषयी कोणाला जाब विचारावा असा प्रश्न गटग्रामपंचायत हिंगणा, तामसवाडी, निंभोरा येथील नागरीकांना पडला आहे.

### पालकमंत्र्यांकडून स्व. महानकर यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन



**अकोला :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व आणीबाणी स्वातंत्र्यसैनिक बंडू उर्फ रमेश रामभाऊ महानकर (८१ वर्षे) यांचे आज निधन झाले. राज्याचे कामगार मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज अकोट येथे स्व. महानकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. पालकमंत्र्यांनी स्व. महानकर यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी आमदार प्रकाश भारसाकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# राज्यात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पद भरती नाहीच!

## आधी समायोजन नंतरच निर्णय । शिक्षण संचालकांचे स्पष्ट निर्देश

। सुधीर केने ।

**अमरावती, दि. ३० : राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने ४ एप्रिल २०२५ रोजी अध्यादेश काढून राज्यात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा मार्ग मोकळा केला होता. मात्र, आता हा मार्ग तूर्तास थांबविण्यात आला आहे. राज्यात सध्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करू नये, आधी अतिरिक्त पदांचे समायोजन केले जाईल त्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल असे स्पष्ट निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहे.**



राज्यात मान्यता प्राप्त खाजगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत .त्यामुळे या जागा भरण्याबाबत वारंवार मागणी केली जात होती. दरम्यान ४ एप्रिल २०२५ रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने अध्यादेश काढला. त्यानंतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीचे प्रमाण निश्चित करण्यात आले.

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सुधारित आकृतीबंध लागू करण्यात आला. शासन निर्णयानुसार विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे शिक्षकेतर संवर्गातील कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक ,मुख्य लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक ही नियमित पदे मंजूर करण्यात आली होती .त्याबाबतच्या अटी व शर्ती या अध्यादेशात देण्यात आल्या होत्या. त्यामुळे शिक्षण संस्थांमध्ये कमालीचा उत्साह संचारला होता. परंतु त्यांचा हा उत्साह फार काळ टिकला नाही. २८ मे २०२५ रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक ,माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना निर्देश दिले. पूर्वी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेला मान्यता देण्यात आली होती. २७ मे २०२५ रोजी शिक्षण आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये पदभरती बाबत काही निर्देश देण्यात आले.

सन २०२३_ २४ च्या संच मान्यता निर्गमित करण्यात आल्या आहेत तथापि सन २४-२५ च्या ऑनलाईन संच मान्यता निर्गमित करण्याची कार्यवाही एन आय सी च्या माध्यमातून सुरू आहे. सदरच्या संच मान्यता निर्गमित झाल्यानंतर मंजूर होणाऱ्या पदांनुसार मंजूर, अतिरिक्त, रिक्त बाबतचा अहवाल व अतिरिक्त होणारे शिक्षकेतर कर्मचारी यांचे समायोजन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच भरती बाबत निर्णय घेतला जाईल असे स्पष्ट केले आहे.

### अन्यथा प्रशासकीय कारवाई

» जोपर्यंत शासन स्तरावर शिक्षकेतर कर्मचारी भरती संदर्भात निर्देश प्राप्त होत नाहीतोपर्यंत कोणत्याही प्रकारची शिक्षकेतर कर्मचारी भरती तसेच या उपरही अनुषंगिक लाभ पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत दिले जाऊ नये ,अन्यथा भरती प्रक्रिया केल्यास किंवा शालार्थ आयडी प्रदान केल्यास त्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील व त्यांच्यावर नियमानुसार प्रशासकीय कारवाई केली जाईल असे डॉ.महेश पालकर यांनी स्पष्ट केले आहे.

# कापसाचे भरघोस उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज - विजय लाडोळे

## हरिओम मंगल कार्यालयात आज कार्यशाळा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. ३० :** यवतमाळ जिल्हातील महागांव तालुक्यातील आंबोडा ह्या छोट्याश्या गावातील शेतकरी अमृतराव देशमुख ह्यांनी स्वतःच्या शेतात एकरी ५१ क्विंटल कापसाचे उत्पादन कसे घेतले त्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून आज दि ३१/५/२०२५ ला दुपारी २ वाजता अंजनगाव, अकोट रोडवरील हरिओम मंगल कार्यालयात शेतकऱ्यांकारिता मोठा उदबोधन कार्यक्रम आयोजित केला आहे. सदर कार्यक्रम कार्ड संस्था,



आर्ट ऑफ लिविंग चे वतीने आयोजित केला आहे. ह्यामध्ये कापसाचे भरघोस उत्पन्न देणारा कमी खर्चिक अमृत पॅटर्न ने कापूस शेती कशी करावी ह्या बाबत कार्यक्रम घेण्यात आला असून संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्रात कापसाचे क्षेत्र सगळ्यात जास्त आहे पण उत्पादनामध्ये शेवटचा क्रम लागतो. त्यामुळे हे पीक आर्थिकदृष्ट्या परवडणारे राहिले नाही. याचा दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर कापूस उत्पादकाच्या आत्महत्ये मध्ये होत आहे.

ह्यासाठी यवतमाळचे प्रगतिशील कापूस उत्पादक शेतकरी श्री अमृतराव देशमुख यांनी वापरलेल्या कापूस उत्पादन तंत्रज्ञानानुसार एकरी ५१ क्विंटल पर्यंत कापूस उत्पादन घेतल्या जाते. या कापूस उत्पादनाच्या तंत्रज्ञानास अमृत पॅटर्न या नावाने ओळखल्या जाते. या तंत्रज्ञानामध्ये कापसाचे भरघोस उत्पादन घेण्याकरिता कमी खर्चाच्या निविष्ठा योग्यवेळी वापरण्यावर भर आहे. त्यामुळे या पिकाचा खर्च मर्यादित राहण्यास मदत होते.

तसेच वातावरणातील प्रदूषणावर नियंत्रण राहते सदरचे कार्यक्रमामध्ये शेतकरी अमृतराव देशमुख ह्यांचे मार्गदर्शनाचा लाभ घेण्याकरिता अंजनगाव सुर्जी परिसरातील शेतकऱ्यांनी ह्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन कार्ड संस्थेचे विजय लाडोळे ह्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहेजाहिरात आहे.





## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | 14 | 9 | 4 | 0 | 1 | 19 | +0.372 |
| बेंगलुरु | 14 | 9 | 4 | 0 | 1 | 19 | +0.301 |
| गुजरात | 14 | 9 | 5 | 0 | 0 | 18 | +0.254 |
| मुंबई | 14 | 8 | 6 | 0 | 0 | 16 | +1.142 |
| दिल्ली | 14 | 7 | 6 | 0 | 1 | 15 | +0.011 |
| हैदराबाद | 14 | 6 | 7 | 0 | 1 | 13 | -0.241 |
| लखनौ | 14 | 6 | 8 | 0 | 0 | 12 | -0.376 |
| कोलकाता | 14 | 5 | 7 | 0 | 2 | 12 | -0.305 |
| राजस्थान | 14 | 4 | 10 | 0 | 0 | 8 | -0.549 |
| चेन्नई | 14 | 4 | 10 | 0 | 0 | 8 | -0.647 |

# धोनी, कोहलीला किरकोळ मग दिग्वेश राठीला कठोर शिक्षा का?

## वीरेंद्र सेहवागची टीका



**नवी दिल्ली, दि. ३० प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ स्पर्धेत दिग्वेश राठी हा गोलंदाज तुफान चर्चेत राहिला. ज्या ज्या फलंदाजांना त्याने बाद केलं, त्या फलंदाजांची नावं त्याने आपल्या कथित नोटबुकमध्ये लिहून ठेवली आहेत. त्याच्या नोटबुक सेलिब्रेशनमुळे त्याला दंड भरावा लागला, एक सामना बाहेर बसावं लागलं. पण, त्याने आपल्या सेलिब्रेशनची पद्धत बदलली नाही. फलंदाजाने शतक झळकावल्यानंतर तो हवं तसं सेलिब्रेशन करू शकतो. मग गोलंदाज का नाही? त्यामुळे दिग्वेश राठीने काही माघार घेतली नाही. अनेकांनी त्याच्यावर टीका केली. तर काही खेळाडूंनी त्याला समर्थन दिलं. ज्यात आता माजी भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागचंही नाव जोडलं गेलं आहे.

दिग्वेश राठीवर दोनदा दंड ठोठावण्यात आला. त्यानंतर तिसऱ्यांदा एका सामन्यांची बंदी घालण्यात आली. यावर वीरेंद्र सेहवागने आपली प्रतिक्रिया दिली आहे. क्रिकबझवर बोलताना तो म्हणाला, '' बंदी घालणं ही खूप कठोर शिक्षा होती. तो पहिल्यांदाच आयपीएल खेळत आहे. एमएम धोनी एकदा मैदानात आला होता, त्याच्यावर बंदी घातली गेली नव्हती. विराटने अनेकदा पंचांशी हुज्जत घातली आहे, त्याच्यावर बंदी घातली गेली नव्हती. दिग्वेशलाही माफ करता आलं असतं. वीरेंद्र सेहवागने हे वक्तव्य केल्यानंतर सोशल मीडियावर चर्चा रंगायला सुरुवात झाली आहे. काहींच्या मते, युवा खेळाडूंसाठी वेगळा न्याय आणि अनुभवी खेळाडूंना सूट दिली जाते. नेहमी आपल्या सेलिब्रेशनमुळे चर्चेत असणारा दिग्वेश राठी यावेळी वेगळ्या कारणामुळे चर्चेत आला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध झालेल्या सामन्यात दिग्वेश राठीने नॉन स्ट्राईकला असलेल्या जितेश शर्माला धावबाद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कर्णधार ऋषभ पंतने ही अपील मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे स्पिरीट ऑफ क्रिकेटची चर्चा रंगली आहे. पण, याच गोष्टीवरून प्रसिद्ध समालोचक हर्षा भोगले यांनी नाराजी व्यक्त केली आहे. हर्षा भोगले यांनी आपल्या ट्विटमध्ये लिहिले की, '' जर पंचांना वाटत असेल की, फलंदाज क्रीझच्या आत आहे तर अंपायरने आऊट देणं योग्य आहे. पण नेहमी स्पिरीट ऑफ क्रिकेटचा उल्लेख करणं चुकीचं आहे. खेळाचे काही नियम आहेत ना.'' या ट्विटर देखील नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# पंतप्रधान मोदींनी थोपटली स्टार क्रिकेटर वैभव सूर्यवंशीची पाठ

## पाटना विमानतळावर हृदयस्पर्शी भेट

**पाटणा, दि. ३० प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३० मे २०२५ रोजी पाटणा विमानतळावर युवा क्रिकेटर वैभव सूर्यवंशी आणि त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. वयाच्या १४व्या वर्षी आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळणारा वैभव हा सर्वात तरुण खेळाडू आहे. या भेटीत पंतप्रधानांनी वैभवच्या क्रिकेटमधील यशाचे कौतुक केले आणि त्याच्या इंग्लंड दौऱ्यासाठी शुभेच्छा दिल्या. मोदी यांनी  वर पोस्ट करत म्हटले, 'वैभव सूर्यवंशीच्या क्रिकेट कौशल्याची देशभरात प्रशंसा होत आहे. त्याच्या भविष्याच्या प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा.' या भेटीमुळे वैभव आणि त्याच्या



कुटुंबाचा उत्साह वाढला असून, त्याच्या प्रतिभेची देशभरात चर्चा होत आहे.

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीला आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्सकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली, तेव्हा त्याने त्याच्या फलंदाजीच्या प्रतिभेने सर्वांना नक्कीच प्रभावित केले. पंतप्रधान मोदी यांनाही वैभवच्या डावखु-या फलंदाजीची भुरळ पडली. ते बिहारी फलंदाजाचे चाहते बनले. बिहारच्या पाटना विमानतळावर त्यांनी वैभव सुर्यवंशी आणि त्याच्या आई-वडिलांची भेट घेतली. या भेटीचे फोटो पीएम मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले. यावेळी त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, पाटणा विमानतळावर युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी आणि त्याच्या कुटुंबियांची भेट घेतली. वैभवच्या क्रिकेट कौशल्याचे देशभर कौतुक होत आहे. विशेषतः त्याने आयपीएलमध्ये केलेली कामगिरी लक्षवेधी आहे. आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात राजस्थान रॉयल्स संघाने वैभव सूर्यवंशीला १ कोटी १० लाख रुपयांना विकते घेतले होते. त्याला लीग स्टेजमधील लखनौ सुपर जाएंट्स यांच्यातील सामन्यात पदार्पणाची संधी मिळाली. तो यासह आयपीएलमध्ये खेळणारा सर्वात युवा खेळाडू बनला. याशिवाय, गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात केवळ ३५ चेंडूत शतक करून वैभव आयपीएलच्या इतिहासात सर्वात कमी चेंडूत शतक करणारा भारतीय खेळाडू बनला. वैभवने एकूण ७ सामन्यांमध्ये ३६ च्या सरासरीने आणि २०६.५६ स्ट्राइक रेटने २५२ धावा फटकावल्या. या दरम्यान, त्याच्या बॅटमधून एक शतक आणि एक अर्धशतक झळकले. आयपीएल २०२५ चा हंगाम राजस्थान रॉयल्स संघासाठी काही खास नव्हता आणि त्यांचा प्रवास लीग स्टेजमध्येच संपुष्टात आला.

# आरसीबीचा ९ वर्षांनंतर फायनलमध्ये प्रवेश!

**नवी दिल्ली, दि. ३० प्रतिनिधी**





रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने करून दाखवलं आहे. जगातील सर्वात मोठा चाहतावर्ग असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.या स्पर्धेतील क्वालिफायर १ चा सामना पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी पंजाबला अवघ्या १०१ धावांवर ऑलआऊट केलं. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने एकतर्फी विजयाची नोंद केली. या विजयानंतर विराट कोहली आणि अनुष्का शर्माचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे.रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने साखळी फेरीतील सामन्यांमध्ये १४ पैकी ९ सामने जिंकून गुणतालिकेत दुसरं स्थान गाठलं.या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा रेकॉर्ड दमदार राहिला आहे. हा रेकॉर्ड पाहता,रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ विजयापासून केवळ १ पाऊल दूर आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयानंतर विराट कोहलीचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयात विराट कोहलीचाही मोलाचा वाटा आहे.

# 'अरे हा तर वॉटरबॉय आहे': विराटने मुशीर खानचा सर्वांसमोर केला अपमान?

**नवी दिल्ली, दि. ३० प्रतिनिधी**

पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीने पंजाब किंग्सचा दारूण पराभव करत आयपीएल २०२५ च्या अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे. आरसीबीने पंजाब किंग्सच्या फलंदाजीला सुरूंग लावत १४.१ षटकांत १०१ धावांवर संघाला सर्वबाद केलं. यानंतर फिल सॉल्टच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर अवघ्या १० षटकांत संघाने विजयाची नोंद केली. पण या सामन्यादरम्यानचा विराटचा एक व्हीडिओ व्हायरल होत आहे, ज्यावरून त्याला ट्रोल केलं जात आहे.

पहिल्या क्वालिफायर सामन्यात पंजाब किंग्सचे सर्व फलंदाज फेल ठरले, तिथे इम्पॅक्ट प्लेअर म्हणून नव्या खेळाडूला मैदानात पाठवलं. हा नवा खेळाडू होता मुंबईचा मुशीर खान. ज्याने आरसीबी विरूद्ध सामन्यात पदार्पण केलं. अचानक मुशीरला मैदानावर पाहून सगळेच थोडे चकित झाले. यानंतर विराटने मुशीरकडे पाहत जे हातवारे केले, त्याचा व्हीडिओ व्हायरल होतोय.

मुशीरने आयपीएलच्या चालू हंगामात यापूर्वी एकही सामना खेळलेला नाही. पंजाबने त्यांची फलंदाजी फळी कोसळल्यानंतर इम्पॅक्ट प्लेअर म्हणून ९व्या षटकात त्याला मैदानावर पाठवलं. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब संघाने फक्त ६० धावांत आपले सहा विकेट गमावले. मुशीरचं फक्त हे आयपीएल पदार्पण नव्हतं, तर तो पहिलाच टी-२० सामनादेखील खेळणार होता. शशांक सिंगला सुयश शर्माने बाद केल्यानंतर मुशीर फलंदाजीसाठी आला. या २० वर्षीय खेळाडूला क्रीजवर पाहून कोहली चकित झाला. मुशीर खान त्यानंतर स्ट्राईक घेत असताना विराट कोहली मागून हातवारे करताना दिसला. ज्यावर अनेकांनी असा दावा केला आहे की कोहली मुशीरला तो संघाचा वॉटरबॉय असल्याचे म्हणत आहे आणि विराटचे हावभावही अगदी सारखेच आहेत.

# रवींद्र जडेजाचा कसोटी कर्णधारपदावर डोळा! शुभमन गिलला दिले थेट आव्हान



**नवी दिल्ली, दि. ३० प्रतिनिधी**

भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा याने अलीकडेच कसोटी क्रिकेटमधील कर्णधारपदाबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. ३६ वर्षीय जडेजाने माजी सहकारी रविचंद्रन अश्विन याच्या यूट्यूब चॅनलवरील 'अॅश की बात' या कार्यक्रमात आपली कसोटी कर्णधार होण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्या या विधानानंतर भारतीय क्रिकेट विश्वात चर्चांना उधाण आले आहे.

इंग्लंड दौऱ्यासाठी युवा फलंदाज शुभमन गिलला भारतीय कसोटी संघाचा कर्णधार बनवण्यात आले आहे, तर ऋषभ पंत उपकर्णधार असेल. दरम्यान, अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा याने तो एक दिवस भारतीय कसोटी संघाचे नेतृत्व करू इच्छितो, अशी भावना व्यक्त केली आहे. खरं तर, जडू हा त्याच्या दीर्घ कारकिर्दीत वेगवेगळ्या कर्णधारांसोबत खेळला आहे आणि त्याने ही भूमिका चांगली समजून घेतली आहे.

अश्विनने त्याच्या यूट्यूब चॅनलवर जडेजाला विचारले की त्याने कधी भारतीय संघाचे नेतृत्व करण्याचा विचार केला आहे का? त्यावर जडेजा म्हणाला, 'हो, नक्कीच. गेल्या काही वर्षांत मी वेगवेगळ्या कर्णधारांसोबत खेळलो आहे. मला प्रत्येक कर्णधाराची शैली माहित आहे. खेळाडू काय विचार करतात आणि रणनिती अशी असावी हे देखील मला समजते.'

२०१२ मध्ये भारतासाठी पहिली कसोटी खेळणाऱ्या जडेजाने महेंद्रसिंग धोनीच्या कर्णधार पदाखाली तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पण केले. तसेच आयपीएलमध्येही धोनीच्याच नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्ज () कडूनही खेळला. जडेजाने आतापर्यंत ८० कसोटी सामने खेळले आहेत.जडेजा म्हणाला, 'प्रत्येक कर्णधाराची स्वतःची शैली असते. मी महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली प्रत्येक फॉरमॅटमध्ये खेळलो आहे. त्याची विचार करण्याची पद्धत सोपी आहे. जर त्याला वाटत असेल की एखादा फलंदाज एकाच ठिकाणी शॉट खेळू शकतो, तर तो नक्कीच तिथे एक क्षेत्ररक्षक ठेवेल.'

जडेजा असेही म्हणाला की, कसोटी क्रिकेटमधील कर्णधारपद हे टी-२० किंवा आयपीएलच्या तुलनेत कमी आव्हानात्मक आहे. तिथे जास्त विचार करण्याची गरज नसते. ते आयपीएल किंवा टी-२० इतके गुंतागुंतीचे नाही. कसोटी क्रिकेटमध्ये तुम्हाला फक्त दोन-तीन क्षेत्ररक्षक बदलावे लागतात आणि गोलंदाजाच्या गरजेनुसार रणनीती ठरवावी लागते. टी-२० मध्ये प्रत्येक चेंडूवर रणनीती बदलावी लागते.

रोहित शर्माच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीनंतर, अश्विनने जडेजाला कर्णधार बनवण्याचे समर्थन केले होते.

# गुगल न सोडण्याच्या बदल्यात नील मोहन यांना कंपनीने दिले होते ८५५ कोटी



**नवी दिल्ली:** एखादा चांगला कर्मचारी किंवा पदाधिकारी कंपनी सोडून जात असेल, तर त्याला कंपनीतच थांबवण्यासाठी व्यवस्थापन अधिक पगार किंवा पदाची ऑफर देण्याची शक्यता असते. पण एका पदाधिकाऱ्याला कंपनीतच थांबवण्यासाठी गुगलनं तब्बल ८५५ कोटी रुपये देऊ केल्याची बाब आता समोर आली आहे. खुद्द यूट्यूब सीईओ नील मोहन यांनीच एका पॉडकास्टवर या दाव्याला दुजोरा दिला आहे. विशेष म्हणजे २०११ साली म्हणजे जवळपास १५ वर्षांपूर्वी हे ८५५ कोटी नील मोहन यांना देण्यात आले होते! फायनान्शियल एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे.

झिरोधाचे सहसंस्थापक निखिल कामत यांनी  या पॉडकास्टवर नील मोहन यांची नुकतीच मुलाखत घेतली. या मुलाखतीत नील मोहन यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. त्यात सोशल मीडियाचा प्रभाव राजकीय क्षेत्रावरील प्रभावापासून यूट्यूबच्या धोरणांपर्यंत अनेक बाबींचा समावेश होता. त्यातच २०११ साली नील मोहन यांना गुगलनं ट्विटरमध्ये जॉईन होण्यापासून रोखण्यासाठी व कंपनीतच राहण्यासाठी तब्बल ८५५ कोटी रुपयांची ऑफर दिल्याची बाब स्पष्ट झाली आहे.

तत्कालीन ट्विटरमध्ये (सध्याचे एक्स) व्यवस्थापन त्यांच्या प्रोडक्ट शाखेसाठी अनुभवी नेतृत्वाच्या शोधात होतं. चीफ प्रोडक्ट ऑफिसर पदासाठी त्यांना नील मोहन अतिशय योग्य व्यक्ती वाटले.

# नोटा छपाई खर्चात २५ टक्के वाढ

## मागील वर्षात ६,३७२ कोटी रुपयांवर खर्च

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

सरलेल्या आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेच्या मानकानुसार चलनी नोटांच्या छपाईवर झालेला खर्च सुमारे २५ टक्क्यांनी वाढून, ६,३७२.८ कोटी रुपये झाला आहे, जो मागील वर्षी ५,१०१.४ कोटी रुपये होता, असे रिझर्व्ह बँकेने गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या वार्षिक अहवालाने नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये चलनात असलेल्या नोटांचे मूल्य आणि संख्या अनुक्रमे ६ टक्के आणि ५.६ टक्क्यांनी वाढली आहे. यामध्ये पाचशे रुपयांच्या



नोटांचा वाटा ८६ टक्के होता, जो मूल्याच्या बाबतीत किरकोळ घटला आहे. आकारमानाच्या बाबतीत, चलनात असलेल्या एकूण नोटांमध्ये पाचशे रुपये मूल्याच्या नोटांचा वाटा ४०.९ टक्के असा सर्वाधिक राहिला आहे. त्यानंतर १० रुपयांच्या नोटांचा वाटा १६.४ टक्के होता. कमी मूल्याच्या नोटा (१० रुपये, २० रुपये आणि ५० रुपये) एकूण चलनात असलेल्या एकूण नोटांच्या तुलनेत ३१.७ टक्के होत्या. मे २०२३ मध्ये सुरू झालेल्या दोन हजार रुपयांच्या नोटा चलनातून काढून घेण्यात आल्यांनतर ते काम वर्षभर सुरू होते. चलनात असलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटांपैकी ३.५६ लाख कोटी रुपये मूल्याच्या नोटा परत आल्या आहेत. अहवालानुसार, २०२४-२५ दरम्यान चलनात असलेल्या नाण्यांचे मूल्य आणि संख्या अनुक्रमे ९.६ टक्के आणि ३.६ टक्क्यांनी वाढली आहे.

**बनावट नोटांमध्ये वाढ**

सध्या चलनात असलेल्या नोटांमध्ये २, ५, १०, २०, ५०, १००, २००, ५०० आणि २००० रुपयांच्या नोटा आहेत. मात्र रिझर्व्ह बँकेने आता २, ५ आणि २००० रुपयांच्या नोटांची छपाई बंद केली आहे. तर चलनात असलेल्या नाण्यांमध्ये ५० पैसे आणि १, २, ५, १० आणि २० रुपयांच्या नाण्यांचा समावेश आहे.

### नोटांचे स्वदेशीकरण

परदेशी स्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी गेल्या काही वर्षांत नोट छपाई आणि उत्पादनाचे स्वदेशीकरण सक्रियपणे केले जात आहे.सतत प्रयत्नांमुळे, नोटांच्या उत्पादनासाठी वापरला जाणारा सर्व प्राथमिक कच्चा माल, म्हणजेच बँक नोट कागद, सर्व प्रकारची शाई (ऑफसेट, क्रमांकन, इंटॅग्लिओ आणि रंग बदलणारी इंटॅग्लिओ इंक) आणि इतर सर्व सुरक्षा वैशिष्ट्ये आता देशांतर्गत स्रोतांकडून खरेदी केली जात आहेत. 'शिवाय नोटांचे आयुष्य वाढवण्यासाठी संशोधन सुरू आहे. मध्यवर्ती बँकेच्या डिजिटल चलनाचे (सीबीडीसी) म्हणजेच 'ई–रुपया'चा चलनी वापर वाढून मार्च २०२५ अखेरीस ते १,०१६ कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. मध्यवर्ती बँकेने सध्या सीमापार 'ई–रुपया'चा वापर प्रायोगिक तत्वावर खुला केला आहे. वर्ष २०२२ मध्ये पहिल्यांदा चलनात आलेल्या ई–रुपयांपैकी ८५७ कोटी रुपयांचा मोठा भाग ५०० रुपयांच्या मूल्यात आहे, तर २०० रुपये (९१ कोटी रुपये चलनात) आणि १०० रुपये (३८ कोटी रुपये चलनात) मूल्यांची देखील लक्षणीय उपस्थिती आहे. आतापर्यंत ६० लाख वापरकर्त्यांकडून ई–रुपयाचा वापर झाला आहे.

बँकिंग क्षेत्रात आढळलेल्या एकूण बनावट भारतीय चलनी नोटांपैकी ४.७ टक्क्यांचा रिझर्व्ह बँकेकडून छडा लावण्यात आला. वर्ष २०२४-२५ मध्ये १०, २०, ५०, १०० आणि २००० रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या.

# अरशद वारसी व त्याच्या पत्नीवर सेबीची कारवाई



**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ अर्थात सेबीने  गुरुवारी बॉलिवूड अभिनेता अरशद वारसी, त्याची पत्नी मारिया गोरेट्टी व अन्य ५७ जणांवर सिक्योरिटीज मार्केटमध्ये व्यवहार करण्यास एक ते पाच वर्षांसाठी बंदी घातली आहे. यूट्यूबवरील दिशाभूल करणाऱ्या व्हिडीओंशी संबंधित एका प्रकरणात सेबीने या ५७ जणांवर कारवाई केली आहे. अरशद, त्याची पत्नी व अन्य ५७ जणांनी गुंतवणूकदारांना फसवल्याचा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे.

अरशद वारसी, मारिया व इतर ५७ जणांनी गुंतवणूकदारांना युट्यूब चॅनेलवर एक व्हिडीओ पोस्ट करून साधना ब्रॉडकास्टचे शेअर्स (समभाग) खरेदी करण्याची शिफारस केली होती. त्यांनी देखील यात गुंतवणूक केली होती. व्हिडीओ व इतर माध्यमातून हे सर्वजण शेअर्सच्या किंमती फुगवत होते. हे सर्वजण मनमानी पद्धतीने शेअर्स पंप व डंप (समभागाच्या किंमती वाढवणे आणि समभागांची विक्री करणे) करत होते. ही बाब उघड झाल्यानंतर सेबीने साधना ब्रॉडकास्टच्या (आता क्रिस्टल बिझनेस सिस्टिम लिमिटेड असं नाव बदलण्यात आलं आहे.) प्रवर्तकांसह ५७ जणांना/संस्थांना पाच लाख रुपये ते पाच कोटी रुपयांपर्यंतचा दंड ठोठावला आहे.

सेबीने या सगळ्यांवर बंदी घालण्याबरोबर त्यांना पाच लाख ते पाच कोटी रुपयांपर्यंतचा दंड ठोठावला आहे. तसेच सेबीने या सर्वांना १२ टक्के व्याजासह ५८.०१ टक्के रुपयांची बेकायदेशीर कमाई परत करण्याचे निर्देश दिले आहेत. सेबीला या फसवणूक प्रकरणाचा तपास करताना आढळलं आहे की अरशद वारसीने साधना ब्रॉडकास्टच्या शेअर्समधून ४१.७० लाख रुपये, तर त्याच्या पत्नीने ५०.३५ लाख रुपयांचा नफा कमावला होता.

अरशद वारसी व त्याची पत्नी या फसवणूक प्रकरणातील सहआरोपी आहेत. गौरव गुप्ता, राकेश कुमार गुप्ता व मनीष मिश्रा हे तिघे या प्रकरणाचे सूत्रधार व मुख्य आरोपी आहेत. तर, साधना ब्रॉडकास्ट लिमिटेडचे (एसबीएल) आरटीए संचालक सुभाष अग्रवाल व मनीष मिश्रा यांनी यात प्रमोटर्समधील मध्यस्थ म्हणून काम केलं होतं. या सर्वांनी मिळून हा फसवणुकीचा कट रचला आणि यशस्वी केला.

# रिझर्व्ह बँकेचा ताळेबंद वार्षिक ८.२० टक्क्यांनी वाढून ७६.२५ लाख कोटींवर

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

देशाची मध्यवर्ती बँक असलेल्या रिझर्व्ह बँकेने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर तिचा ताळेबंद ८.२० टक्क्यांच्या वाढीसह ७६.२५ लाख कोटी रुपयांवर पोहोचला, असे गुरुवारी जाहीर केले. वर्षापूर्वी ३१ मार्च २०२४ अखेर ताळेबंदाचा आकार ७०.४७ लाख कोटी रुपयांवर होता.

रिझर्व्ह बँकेचा ताळेबंद हा तिच्या चलन जारी करणे, पतविषयक धोरण आणि राखीव निधीच्या व्यवस्थापनाशी संबंधित कार्य आणि सक्षमतांना प्रतिबिंबित करतो. सरलेल्या २०२४-२५ आर्थिक वर्षात तिचे उत्पन्न आणि खर्च दोन्हीमध्ये वार्षिक तुलनेत वाढ दिसून आली आहे. परकीय चलन व्यवहारांद्वारे उत्पन्नांत सुमारे ३३ टक्के वाढ झाल्यामुळे केंद्र सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा भरभक्कम लाभांश हस्तांतरित करता आला, असे वार्षिक अहवालातील कामगिरी तपासल्यास स्पष्ट होते. एकंदर उत्पन्नात २२.७७ टक्क्यांनी वाढ झाली, तर खर्चात ७.७६ टक्क्यांनी वाढ झाली. वर्षाअखेरीस २,६८,५९०.०७ कोटी रुपयांचा एकूण अधिशेष राहिला, जो मागील वर्षी २,१०,८७३.९९ कोटी रुपयांचा होता. यंदा अधिशेषातील वाढ २७.३७ टक्क्यांची राहिली. मध्यवर्ती बँकेकडून आकस्मिक निधी म्हणून ४४,८६१.७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. तथापि मालमत्ता विकास निधी (एडीएफ) म्हणून कोणतीही तरतूद करण्यात आली नाही, असे अहवालात म्हटले आहे. एकंदर उत्पन्नात २२.७७ टक्क्यांनी वाढ झाली, तर खर्चात ७.७६ टक्क्यांनी वाढ झाली. वर्षाअखेरीस २,६८,५९०.०७ कोटी रुपयांचा एकूण अधिशेष राहिला, जो मागील वर्षी २,१०,८७३.९९ कोटी रुपयांचा होता. यंदा अधिशेषातील वाढ २७.३७ टक्क्यांची राहिली. मध्यवर्ती बँकेकडून आकस्मिक निधी म्हणून ४४,८६१.७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. तथापि मालमत्ता विकास निधी (एडीएफ) म्हणून कोणतीही तरतूद करण्यात आली नाही, असे अहवालात म्हटले आहे.

# सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये निवडणुका होऊ शकतात

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वर्तविला अंदाज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३०:** यंदा पावसाळा आटोपला की सप्टेंबर -ऑक्टोबरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकतात. निवडणूक घेण्याचे अधिकार हे आयोगाला आहेत. आयोगाकडून निवडणूक घेतली जाईल, त्यावेळी सरकार म्हणून यंत्रणा तयार आहे, असे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक चार महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. दरम्यान मंत्री बावनकुळे यांनी महानगरपालिका निवडणूक कधी होऊ शकते,यासंबंधी महत्त्वाची अपडेट दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि महायुतीवर भाष्य करताना बावनकुळे म्हणाले, की महायुतीमध्येच निवडणुका होतील. ज्या ठिकाणी जुळणार नाही त्याठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल. त्यानंतर आम्ही पुन्हा एकत्र येऊ. मात्र, त्याचा अर्थ महायुतीत काही अडचण नाही असा होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. आम्ही सक्षमपणे तयार आहोत. लोकसभा निवडणुकीतून काही गोष्टी शिकलो असून, चारच महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुद्धा आम्ही जिंकलो, असे त्यांनी सांगितले. राज्यात लोकसभेत महाविकास आघडीला यश मिळाले होते. तर विधानसभेत महायुतीने चमत्कार घडवला.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या दोन्ही गटांसाठी महत्त्वाच्या असून, आगामी निवडणुकीत भाजपाचे मुख्य लक्ष्य मुंबई महानगरपालिका आहे. राज्यातील श्रीमंत मुंबई महानगरपालिकेवर २५ वर्षे शिवसेना ठाकरे पक्षाची सत्ता होती. भाजपकडून गेल्या निवडणुकीत जबरदस्त टक्कर देण्यात आली होती. दुसरीकडे शिवसेना ठाकरे पक्षासाठीही निवडणूक अस्तित्वाची लढाई असणार आहे.

### राजकीय समीकरणे...

- भाजपाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बहुतांश निवडणुका युती म्हणून एकत्र लढवण्याचा विचार आहे. तर, महाविकास आघाडी एकत्र लढणार की नाही याबद्दल स्पष्टता बाकी आहे. काही दिवसांआधी राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र येणार अशा चर्चा होत्या. दोन्ही भाऊ एकत्र आल्यास चांगला प्रभाव टाकू शकतील. त्याच वेळी दोन्ही पवार गट एकत्र येऊ शकतात अशाही चर्चा उफाळून येतात.



## बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजना

**नागपूर, दि. ३० :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. चालू वर्षाकरीता पात्र ठरलेल्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टर वाटप करण्यात येणार आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे. अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत. स्वयंसहायता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेया रकमेच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर ९० टक्के शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. चालू आर्थिक वर्षातील बचत गटांची निवड केल्यानंतर लाभार्थी बचत गटाने किमान ९ ते १८अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करावी. जे लाभार्थी बचत गट मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अधिक अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करू इच्छित असतील, असे पात्र ठरलेल्या बचत गटांना ते खरेदी करता येतील.

## दानागंज परिसरातील नाल्याची संपूर्ण सफाई करा

### मनपा आयुक्तांकडून परिसरातील नाल्याची पाहणी



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० :** सतरंजीपुरा व लकडगंज झोन अंतर्गत दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या हद्दीत असलेल्या नाल्यामुळे दानागंज, हरिहर मंदिर आणि स्मॉल फॅक्टरी एरिया परिसरातील नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या नाल्याची लवकरात लवकर संपूर्ण सफाई करण्यात यावी, असे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. सतरंजीपुरा व लकडगंज झोन अंतर्गत येत असलेल्या रेल्वे लाईन लगतच्या दानागंज, हरिहर मंदिर आणि स्मॉल फॅक्टरी एरिया परिसरातील नाल्याच्या समस्यांच्या डॉ. अभिजीत चौधरी यांनी पाहणी केली. मुख्य अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता अश्विनी येलचटवार, संजय माटे, उपअभियंता निलेश बोबडे, देवेंद्र भोवते, माजी नगरसेवक नरेंद्र बोरकर आदी उपस्थित होते. माजी नगरसेवक बोरकर यांनी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांबाबत आयुक्तांना अवगत केले. दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या हद्दीत असलेल्या या नाल्यामध्ये अनेक झाड-झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा ओघ वाढला की प्रवाहाला अडथळा निर्माण होतो. परिणामी लगतच्या वस्त्यांना त्रास सहन करावा लागतो. दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे प्रशासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन तातडीने सफाई कार्य पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. परिसरातील इतर समस्यांच्या अनुषंगाने आयुक्तांनी संपूर्ण परिसराचे लेआउट तयार करण्याची सूचना केली. ले-आउटमध्ये परिसरातील कोणत्या भागात काय कामे करण्यात आली व कुठे कामे प्रस्तावित आहेत, याची सविस्तर नोंद घेण्यास निर्देशित केले. स्मॉल फॅक्टरी एरियामधील शाहू मोहल्ला या वस्तीपुढील सिव्हर लाईन खराब झाल्यामुळे ती प्राधान्याने दुरुस्त करण्यात यावी. याशिवाय शाहू मोहल्ला या वस्तीमध्ये नवीन सिवर लाईन जोडणीबाबत देखील कार्यवाही करण्याचे निर्देश मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

## ऑटोडीसीआर प्रणालीसंबंधी प्रशिक्षणवर्ग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ३०:** महानगरपालिकेच्या सहकार्याने पुणे येथील सॉफ्टटेक इंजिनीअर्स लिमिटेडतर्फे नागपुरातील वास्तुशिल्पकार, विकासक आणि बिल्डर्स यांच्यासाठी ऑटोडीसीआर प्रणालीच्या प्रशिक्षण पार पडले.

मनपाच्या नगररचना विभागाचे उपसंचालक रामचंद्र महाजन, सहायक संचालक ऋतुराज जाधव, सॉफ्टटेक कंपनीच्या उपाध्यक्ष शीतल जगताप, एनएआरईडीसीओचे अध्यक्ष कुणाल पडोळे, क्रेडाईचे अध्यक्ष राजमोहन शाहू, आर्किटेक्ट असोसिएशनचे अध्यक्ष पराग येळणे आणि लायसन्स इंजिनीयर्स अससोसिएशनचे सचिव रविंद्र नागपुरे प्रामुख्याने उपस्थित होते. उपसंचालक रामचंद्र महाजन यांनी सांगितले, की महाराष्ट्र राज्य शासनाने वर्तमान बीपीएमएस प्रणालीसोबत ऑटोडीसीआर प्रणाली आणली आहे. मुंबईतील नगरपालिका प्रशासन संचालकांनी आणि पुण्यातील नगररचना संचालकांसह राज्यभरातील इमारत योजना मंजुरीसाठी समांतर प्रणाली म्हणून ऑटोडीसीआर प्रणाली वापरण्याची मुभा वास्तुविशारद, अभियंता आणि विकासकांना दिली आहे. विकासकांना सुलभतेने परवानगी मिळण्याकरिता शासनाचा प्रयत्न आहे. हे वर्तमान प्रणाली आणि नवीन प्रणालीचा वापर करू शकतात.सॉफ्टटेक कंपनीच्या उपाध्यक्ष शीतल जगताप यांनी ऑटोडीसीआर प्रणालीबद्दल सादरीकरणात नमुद केले, की सदर सॉफ्टवेअर सध्या देशातील १८ राज्यांमधील १५०० शहरातील चार लाखांपेक्षा जास्त नागरिक वापरत आहेत. या प्रणालीमुळे विकासकांना मोठा फायदा होत आहे. यापूर्वी याप्रणालीचा प्रयोग पुणे आणि नागपूर येथे करण्यात आला होता. गणेश मस्के यांनी उपस्थितांना प्रणालीचे प्रशिक्षण दिले. तसेच, विकासकांच्या प्रश्नांचे निरसन केले. याप्रसंगी नगररचना विभागाचे मंगेश गेडाम, विद्युत ढेंगळे, आनंद मोखाडे, विवेक तेलरांधे आदी उपस्थित होते.

## कारमधून ६० लाख जप्त

**नागपूर, दि. ३० :** सावनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पाटणसावंगी महामार्गावर महामार्ग पोलिसांनी मोठी कारवाई करत ६० लाख रुपये रोख रक्कम जप्त केली. ही कारवाई गुरुवारी संध्याकाळी करण्यात आली. गुप्त माहितीवरून तपास पथकाने भोपाळ-नागपूर महामार्गावर पाळत ठेवण्यात आली. संध्याकाळी संशयास्पद गाडी पारडी (हेटी) परिसरात दिसताच पोलिसांनी पारडी (हेटी) जवळ थांबवत वाहनाची झडती घेतली असता चारचाकी वाहनातून ही रोकड सापडली. विशेष म्हणजे वाहनातील चारही तरुण दारूच्या नशेत होते. या कारवाईचे नेतृत्व महामार्ग पोलिसांच्या एपीआय सुहासिनी सहस्त्रबुद्धे आणि त्यांच्या पथकाने केले.

## रकमा स्वीकारण्याचे कोषागार प्रशिक्षण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ३० :** रिझर्व्ह बँक नागपूर तसेच वरिष्ठ कोषागार अधिकारी नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने जीआरएएस प्रणालीमार्फत शासकीय रकमा स्वीकारण्यासंबंधी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ अधिकारी श्रीमती लक्ष्मी आणि श्रीमती वंदना, वरिष्ठ कोषागार अधिकारी मोनाली भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. मुंबई येथील सहायक लेखा अधिकारी आभासी कोषागार कार्यालय सुषमा देशमुख यांनी जीआरएएस प्रणालीविषयक मार्गदर्शन केले. तसेच, श्रीमती वंदना यांनी सायबर सिक्युरिटीविषयी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणास नागपूर कोषागार व अधिनस्त उपकोषागार कार्यालयातील ३०० पेक्षा अधिक आहरण व संवितरण अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्य शासन व वित्त विभागाने संचालनालय लेखा व कोषागारे मुंबई यांचे नियंत्रणाखाली आभासी कोषागराची स्थापना केली आहे. शासनाच्या विविध विभागाचा महसूल व महसूलेत्तर रकमांचा भरणा इलेक्ट्रानिक माध्यमाचा वापर करून शासकीय जमा लेखांकन पद्धतीद्वारे (ग्रास) शासनखाती जमा करणेची सुविधा सर्व विभाग, आहरण व संवितरण अधिकारी यांच्या २ आक्टोबर २०२० पासून उपलब्ध करून दिलेली आहे. प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी रिझर्व्ह बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच कोषागार कार्यालयातील संगणक शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालय प्रथम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० :** शंभर दिवस कृती आराखडा अंतर्गत राज्यभर राबविण्यात आलेल्या शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात नागपूर क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम नुकतीच राबविण्यात आली. या मोहिमेत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील विभागीय स्तरावरील शासकीय कार्यालये- दुसरा टप्पा अंतर्गत नुकतीच नावे घोषित केली आहेत. यात नागपूर व अमरावती येथील क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालयाने साध्य केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. नागपूर येथील क्रीडा क्षेत्राला चालना मिळावी यादृष्टीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार विविध विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत.



क्रीडा क्षेत्राविषयीचे व्हिजन नागपूर व अमरावती विभागात प्रत्यक्षात आणण्यासाठी उपसंचालक क्रीडा व युवक सेवा कार्यालय कटिबद्ध असल्याचे उपसंचालक शेखर पाटील यांनी आवर्जून नमूद केले. ही जबाबदारी पूर्ण करताना अमरावती येथील उपसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार माझ्याकडे असून, दोन्ही कार्यालयांना तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहयोगातून उत्कृष्ट काम करता आले. टीमवर्कमुळे राज्यात अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक आम्हाला प्राप्त करता आला, याचा मनस्वी आनंद आहे.

## महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार

### अहिल्याबाई होळकरांच्या त्रिजन्मशताब्दीनिमित्त आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ३० :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या तिसऱ्या जन्मशताब्दीनिमित्त अनुसूचित जाती मोर्चा नागपूर महानगरच्या वतीने नागपूर महानगरपालिकेत कार्यरत महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात भाजपाचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना साडी, साल, पुष्पगुच्छ प्रदान करत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दयाशंकर तिवारी यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान दिले. केंद्रीय अनुसूचित जाती आयोगाचे माजी सदस्य सुभाष पारधी, राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक मेंढे, सतीश सिरसवान, अर्चना डेहनकर, अश्विनी जिचकर, रामभाऊ आंबुलकर, शंकर मेश्राम, अनंत जगनीत, मोहिनी रामटेके, महेंद्र प्रधान, हिमांशू पारधी, इंद्रजीत वासनिक, नूतन शेंदूर्णीकर, प्रवीण पाटिल प्रमुख उपस्थित होते. याशिवाय विनोद अरजापूर, रोहन चंदेकर, शरद पारधी, दिलीप गोईकर, सुनील तुर्कल, अजय करोसिया, संजय भगत, बंटी पैसाडेली, नितीन बकसरिया, राजेश नंदेश्वर, किशोर बीहाडे, ईश्वर नहर, अंतकला मनोहरे,अमर लोहकरे, रामकृष्ण भीलकर, प्रीती बहादुरे, सीमा सहारे, साधना वाघमारे, ज्योती रामटेके, संदीप पाटील, कुणाल चौकीकर, हीरालाल रंगारी, शीला चौहान, अमित गाजरे यांची उपस्थिती होती. संचालन मोहिनी रामटेके यांनी केले.

## जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ३० :** जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त 'ममता हेल्थ इन्स्टिट्यूट फॉर मदर अँड चाईल्ड'संस्थेच्या वतीने बनवाडी गावात जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. किशोरवयीन मुली व नवविवाहित महिला यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला, हे विशेष. मासिक पाळीबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे, गैरसमज दूर करण, महिलांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे, अशा उद्देशाने 'ममता हेल्थ इन्स्टिट्यूट फॉर मदर अँड चाईल्ड'संस्थेने कार्यक्रमाचे आयोजन केले. संस्थेच्या राज्य समन्वयक पल्लवी भांडारकर, बनवाडीचे पोलिस पाटील संदीप फुलझेले, अंगणवाडी सेविका प्रमिला मानकर, आशा सेविका यांची प्रमुख उपस्थिती होती. पल्लवी भांडारकर, मंजूषा नासरे यांनी मासिक पाळी स्वच्छतेचे महत्व आणि योग्य सवयीबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी माहितीपर पोस्टर प्रदर्शनी, प्रश्नमंजूषा व संवादसत्र घेण्यात आले. किशोरवयीन मुली व नवविवाहित महिलांना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे तालुका पर्यवेक्षक योगेश राठोड, मंजूषा नासरे यांचे मोलाचे योगदान लाभले.

# घनकचरा प्रदूषणावर 'एमआयए' ची बैठक

## जागतिक प्लास्टिक प्रदूषणावर मात' संकल्पनेतून स्वच्छता मोहीम; कडक कारवाईचा निर्धार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**नागपूर, दि. ३० :** हिंगणा एमआयडीसीतील घनकचरा व प्लास्टिक प्रदूषणावर नियंत्रणासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ व 'एमआयए'ने संयुक्त बैठक घेतली. 'जागतिक प्लास्टिक प्रदूषणावर मात' या संकल्पनेतून, ५ जूनच्या पर्यावरण दिनानिमित्त, स्वच्छता मोहीम सुरू करत अनेक ठराव मंजूर केले. (अचूक ४० शब्द) पर्यावरणाच्या शाश्वततेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) आणि एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन (एमआयए) हिंगणा यांनी संयुक्तपणे २९ मे रोजी एमआयए सभागृह, हिंगणा येथे एका बैठकीचे आयोजन केले. एमआयडीसी हिंगणा परिसर आणि त्याच्या आसपासच्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या बेकायदेशीर घनकचरा आणि प्लास्टिक कचरा टाकण्याच्या गंभीर समस्येवर या बैठकीत सखोल विचारमंथन करण्यात आले. युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम (यूएनईपी) द्वारे घोषित 'जागतिक प्लास्टिक प्रदूषणावर नियंत्रण' या जागतिक संकल्पनेनुसार ५ जून २०२५ रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या बैठकीत एमपीसीबीच्या प्रादेशिक अधिकारी हेमा देशपांडे, एमआयएचे अध्यक्ष पी. मोहन, उपाध्यक्ष अजय अग्रवाल, के. के. डागा, सचिव अरुण लांजेवार, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल उंदीरवाडे यांच्यासह एमआयडीसी, वाडी, निलडोह व डिगडोह नगरपरिषदांचे अधिकारी, नागपूर ग्रामीण पोलीस आणि स्थानिक माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. एमआयडीसीच्या मोकळ्या जागांवर स्थानिक स्वराज्य संस्था आणि काही उद्योगांकडून कचरा टाकण्याच्या वाढत्या तक्रारी, जवळच्या नगरपालिकांकडे समर्पित कचरा टाकण्याच्या जागांचा अभाव आणि घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ चे पालन न होणे या प्रमुख समस्यांवर बैठकीत प्रकाश टाकण्यात आला. प्रादेशिक अधिकारी हेमा देशपांडे यांनी उद्योग, सरकारी संस्था आणि स्थानिक प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांनीच या पर्यावरणीय आव्हानाचा सामना करता येईल, असे सांगितले. मंजूर ठरावांनुसार, कचरा टाकण्याच्या ठिकाणांचा नकाशा तयार करणे, एमआयडीसीच्या भूखंडांवर कचरा टाकणे नगरपालिकांनी थांबवणे, उद्योगांनी परिसर स्वच्छता राखणे आणि कचरा विल्हेवाटीसाठी जागा निश्चित करणे यावर भर देण्यात आला. बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी कचरा टाकण्याच्या ठिकाणांना भेट देऊन स्वच्छता अभियान तात्काळ सुरू केले.

> "सर्वांच्या सक्रिय सहभागाने एमआयडीसी हिंगणाला स्वच्छ, हरित आणि जागतिक स्तरावर आदर्श औद्योगिक क्लस्टर बनवण्याचे आमचे ध्येय आहे.
> पी. मोहन
> अध्यक्ष,एमआयए

## थोडक्यात

### घातक शस्त्र बाळगणाऱ्यास अटक

**नागपूर :** कळमना पोलिसांनी गस्तीदरम्यान घातक शस्त्र बाळगणाऱ्यास आरोपीस अटक केली चंद्रेश बळीराम वर्मा असे त्याचे नाव आहे. माहितीनुसार, कळमना पोलिसांचे तपास पथक बुधवारी सायंकाळी आपल्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना विजय नगर, जुना शीतला माता मंदिराजवळ, सार्वजनिक रोडवर एक इसम शस्त्रासह धुमाकूळ घालत असल्याची माहिती मिळाली. तपास पथक नमूद ठिकाणी पोहोचल्यानंतर एक इसम हातात तलवार घेऊन शिवीगाळ करताना दिसून आला. कारवाईत त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. यावेळी त्याच्या हातातील एक लोखंडी जुनी तलवार काढून घेतली. आरोपी चंद्रेश बळीराम वर्मा हा कोणताही दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने चाकू बाळगून धुमाकूळ घालताना समक्ष मिळून आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे.

### सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून हद्दपार

**नागपूर :** लष्करीबाग येथील रहिवासी असलेला सराईत गुन्हेगार तुषार उर्फ भेंडी अनुप खोटे याला एक वर्षाच्या कालावधीसाठी नागपूर शहर आणि नागपूर ग्रामीण भागातून हद्दपार करण्यात आले आहे. माहितीनुसार, आरोपीविरुद्ध पाचपावली पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्हे दाखल असून, कायदेशीर कारवाई करूनही त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नाही. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांच्या मालमत्तेला आणि जीविताला धोका निर्माण झाला होता. यावर उपाय म्हणून पोलिसांनी हद्दपारीचा प्रस्ताव तयार करून पोलिस उपायुक्त (परिमंडळ तीन) यांच्याकडे सादर केला होता त्यावरून २१ मे २०२५ रोजी हद्दपारीचा आदेश जारी करून आरोपीला एक वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले.

### महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

**नागपूर :** महानगरपालिकेच्या वतीने शौर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या हस्ते मनपा मुख्यालयातील दालनात स्थित महाराणा प्रतापसिंह यांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. सहायक आयुक्त श्याम कापसे, अधीक्षक राजकुमार मेश्राम, प्रमोद हिवसे, अमोल तपासे, गजभिये, रुपेश कठाळे, शैलेश जांभूळकर यांच्यासह इतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## निधन

### रमेशराव मोरणकर यांचे निधन



**नागपूर :** लालगंज बाहुली विहारजवळ गुजरी रोड येथील रहिवासी रमेशराव मोरणकर यांचे २९ मे रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्यावर शांतीनगर घाट इतवारी येथे अन्त्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली आणि मोठा आप्त परिवार आहे.

### घातक शस्त्राने धाक दाखविऱ्याला अटक

**नागपूर, दि. ३० :** बेलतरोडी पोलिसांनी बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घातक शस्त्राने धमकावणाऱ्या एकाला अटक केली आहे. माहितीनुसार, फिर्यादी श्रीकांत रंगनाथ बोडखे (रा. दिवाण ले-आउट, मानेवाडा, नागपूर)मित्र गजानन कडू यांच्यासह ठाणे हद्दीत एका ठिकाणी उभे असताना त्यांचा परिचित आरोपी गौरव विजय शेंदुर्णीकर (डी-मार्ट मागे) तेथे आला आणि फिर्यादीसोबत बोलून बारमध्ये दारू पिण्यासाठी गेला. आरोपीने फिर्यादीसह त्याच्या मित्राला बारमध्ये दारू पिण्यासाठी बोलावले आणि जुन्या भांडणाच्या कारणावरून अश्लील शिवीगाळ केली. यावेळी लोखंडी चाकू काढून दोघांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली.






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. ३१ मे २०२५







# दारूने घेतला जीव! अकोल्यात काकाकडून पुतण्याचा निर्घृण खून

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३० :** दारूच्या नशेत झालेल्या वादाचे परिणाम एका भयंकर हत्येत झाले असून, काकाकडून पुतण्याची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची घटना अकोला शहरातील पेन्शनपुरा परिसरात उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.

हत्येतील मृत युवकाचे नाव कुणाल किशोर कमलाकर (३०) असे आहे. तर आरोपी काकाचे नाव सुनील किशोर कमलाकर (५५) असून, खदान पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

ही घटना खदान पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पेन्शनपुरा भागात घडली. २९ मे २०२५ रोजी संध्याकाळी परिसरात दुर्गंधी पसरल्यानंतर स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी पोलीस पोहोचले असता, काकाच्याच घरात कुणालचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.

पोलीस पंचनामा व शवविच्छेदनात स्पष्ट झाले की, कुणालची हत्या दगडाने अथवा कठीण वस्तूने डोक्यावर वार करून करण्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, हत्या पाच ते सहा दिवसांपूर्वी घडली असावी.

ही घटना केवळ कौटुंबिक वादाचा नाही, तर दारूच्या व्यसनाने बिघडलेल्या नात्यांचं विदारक चित्र दाखविणारी आहे. अकोल्यात अशा प्रकारच्या गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### काका सुनील कमलाकरची कबुली

पोलीस तपासात सुनील कमलाकरला ताब्यात घेतल्यावर त्याने हत्या केल्याची कबुली दिली. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### * दारूच्या नशेतून काढला काटा

मृत कुणाल आणि त्याचा काका सुनील हे दोघेही दारूच्या नशेत एकत्र बसत असत. कुणाल हा दररोज अति प्रमाणात दारू पित असल्याने काकाचा त्याच्याशी वाद व्हायचा. अशाच एका वादात, काकाने त्याचा काटा काढल्याची माहिती खदान पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आली आहे.

### * चार दिवसांपूर्वी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल

कुणालच्या बेपत्ता झाल्याबाबत चार दिवसांपूर्वीच खदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती; मात्र मृतदेह घरातच असून, त्याची दुर्गंधी आल्यानंतरच हे भयावह सत्य समोर आले.

## नळातून नाल्यांचे पाणी; मनपा अधिकारी कुंभकर्णी झोपेत!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाची कुंभकर्णी झोप अजूनही भंगलेली नाही. जुन्या शहरातील अनेक भाग आजही गंभीर पाणीटंचाईचा सामना करीत असून, काही भागांत पाइपलाइनमधून नाल्याचे मिक्स झालेले पाणी येत असल्याने नागरिकांची तब्येत धोक्यात आली आहे.

कुठे पाइपलाइन लिकेज, कुठे नळांना पाणी नाही, तर काही भागांत गल्लीत पाणी असून, शेजारील गल्लीत थेंबही नाही. हे सगळे बघता पाइपलाइन टाकताना प्रचंड गलथान कारभार झाल्याचे दिसते. चढ-उतार, न जोडलेली पाइपलाइन, कोणतेही नियोजन नसलेली रचना आणि त्यावर ठेकेदारांची बिनधास्त बिलं! कामाची साधी पाहणीसुद्धा न करता पैसे अदा करण्यात आलेत. या सगळ्यावरून ठेकेदार आणि पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये साटेलोटे असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना मुद्दाम त्रास देण्यात येतोय का, अशीही चर्चा रंगली आहे. नागरिकांनी आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्याकडे तक्रारी केल्या, पाणीपुरवठा विभागालाही निवेदने दिलीत; मात्र कोणतीही कारवाई झालेली नाही.

### नागरिकांचा संताप उफाळला!

जुन्या शहरातील अनेक भागांना अजूनही स्वच्छ पाण्याचा नियमित पुरवठा होत नाही. कुठे पाइपलाइन लिकेजमुळे नाल्याचे पाणी नळातून येतेय, तर कुठे थेंबभरही पाणी नाही. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने संतप्त नागरिकांनी आता पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे धाव घेण्याची तयारी दर्शवली आहे. महापालिकेच्या कुंभकर्णी झोपेतील प्रशासनाविरुद्ध रोष वाढत आहे. महापालिकेच्या कुंभकर्णी प्रशासनाने तातडीने जागे व्हावे, अन्यथा जनतेचा उद्रेक अटळ असल्याची चर्चा आहे!

## दोन युवकांवर प्राणघातक हल्ला!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ३० :** देशात लोकशाही असल्याचा दावा केला जातो; पण आता लोकशाहीवर हल्ला होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. मूर्तिजापुरात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी दोन निष्पाप युवकांवर थेट प्राणघातक हल्ला केला आहे. या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी दिलेली माहिती अनुसार या प्रकरणात फिर्यादी सय्यद वाहब सय्यद मोहम्मद अली वय २६ वर्ष राहणार जुनी वस्ती यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे २९ मे रोजी सकाळी चार वाजता दरम्यान मी आणि माझे मित्र मोहम्मद अरबाज मोहम्मद नासिर राहणार खडकपुरा आम्ही दोघं अकोला येथील सलीमभाई यांची बोलेरो गाडीत खरेदी केलेले जनावरे कोल्हापूर येथून अकोला येथे नॅशनल हायवे क्रमांक ५३ वरून जात होतो, त्यावेळी आमच्या गाडीला आसरा फाटा येथे बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पाठलाग केला. आम्ही आमची गाडी थांबवली असताना फोर्ट एम एच११ सिटी ७७७७ या गाडीतून खाली उतरलेले बजरंग दलाचे कार्यकर्त्यांनी हातात तलवार घेऊन अश्लील शिवीगाळ करून आमच्यावर लोखंडी पाइप व तलवारीने आदित्य महाजन आणि पवन गुंजाळ इतरांनी आमच्यावर हल्ला केला, अशी माहिती प्रसार माध्यमांशी बोलताना मोहम्मद अरबाज यांनी दिली. गंभीर जखमी अवस्थेत असलेले दोघांना लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात भरती करण्यात आले ;परंतु अरबाज त्यांची प्रकृती चांगली नसल्यामुळे त्यांना अकोला येथे उपचारासाठी हलविण्यात आले.

## 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मोठी कारवाई!

### २३ किलो गांजासह तस्कर अटकेत; ४.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३० :** जिल्ह्यात अमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी ''ऑपरेशन प्रहार'' अंतर्गत अंमलबजावणी सुरू असताना, अकोला शहर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या विशेष पथकाने मोठी कारवाई करीत २३ किलो गांजा आणि मोबाइलसह एकूण ४ लक्ष ९० हजार ६५४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी मुख्य आरोपीसह दोन विधी संघर्षग्रस्त बालकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२९ मे २०२५ रोजी, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकोला शहर यांच्या विशेष पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, रामदासपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मनपा शाळा क्र. ७ जवळील पाण्याच्या टाकीसमोरील रस्त्यावरून एक इसम आपल्या साथीदारांसह गांजाची तस्करी करण्याच्या उद्देशाने जात आहे.

मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, पोनि. मनोज बहुरे यांच्या उपस्थितीत नाकाबंदी कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान, आसीफ अली फारुख अली (वय ३४, रा. इस्लामपुरा, अकोला) आणि दोन विधी संघर्षग्रस्त बालकांच्या ताब्यातून २३.२२ किलो गांजा (किंमत ४ लक्ष ८० हजार ६५४) आणि एक स्मार्टफोन किंमत १० हजार असा एकूण ४ लक्ष ९० हजार ६५४ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

























अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलढाणा, शनिवार ३१ मे २०२५ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### २ जूनला लोकशाही दिन

**खामगाव :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्याानुसार मे महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. २ जून २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांनी कळविले आहे.

### मोताळा शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था येथे प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलडाणा :** सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा जि.बुलढाणा येथे प्रवेश सत्र २०२५-२६ करीता वायरमन फिटर, आयसीटीएसएम, प्लंबर, वेल्डर, कोपा, शिवणकाम (ड्रेसमेकिंग), ब्युटी पार्लर (कॉस्मोटोलॉजी) या एक व दोन वर्षीय २४० जागेच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झालेले आहे. प्रवेश अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. संपुर्ण प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन सत्र संस्थेत रोज सुरू आहे. तरी सर्व पात्र उमेदवारांनी मोठ्या संख्येने ऑनलाईन अर्ज करून प्रवेश प्रक्रियेत भाग घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस.डी. गंगावणे यांनी केलेले आहे.

### शिव राज्यभिषेक दिवसाचे आयोजन

**खामगाव :** सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा येथे शुक्रवार दि. ६ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शिवराज्यभिषेक दिवस साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात संस्थेतील माजी प्रशिक्षणार्थी मेळावा व स्थानिक उदयोजक सहभागी होणार आहेत. विभागाचे मंत्री ना.मंगलप्रभात लोढा यांचे संकल्पनेतुन सदर कार्यक्रम साजरी करण्यात येत असुन नागरिकत्व आणि शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी विचारांचा प्रसार, सामाजिक समरसता आणि पर्यावरण संरक्षण या विविध विषयावर मान्यवर वक्ते यावेळी प्रबोधन करणार आहेत. सदर कार्यक्रमात मोताळा व परीसरातील सर्व नागरीक, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस.डी. गंगावणे यांनी केलेले आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १४०० –१९७५ |
| गहू | २२००– २५०० |
| मक्का | १७९५ – १९५० |
| उडीद | ५५०० – ६७०० |
| मूंग | ६५०० – ६७५० |
| तुर | ६०००– ६८५० |
| हरभरा | ४५५० – ५४७५ |
| भुईमुग | ४५०० – ५६०० |
| सोयाबीन | ३१७५ – ४३७५ |
| तीळ | ७८००–४८०० |
| बाजरी | १४५०–१४५० |
| मलाईचना | ५४००–७६०० |

# जिल्ह्यात ३८ मंडळात अतिवृष्टी

## १४३.३ मिलिमीटर पावसाची नोंद

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा , दि.३०**



मे महिना म्हटले की मे हिट असा मानला जातो. मात्र यंदाचा मे महिना हा पावसाळा किंवा उन्हाळ्याचा असा प्रश्न सगळ्यांनाच पडला . आणि त्यातच दमदार पाऊस पडल्याने जिल्ह्यात विक्रम नोंदविला, बुलढाणा जिल्ह्यात २८ मे रोजी झालेल्या पावसामुळे ३८ मंडळात अतिवृष्टी झाली. तर १४३.३ मिलिमीटर पावसाची नोंद पावसाळा सुरू होण्याआधीच झाली आहे.

बुलढाणा जिल्ह्यात २ मेपासून पावसाने हजेरी लावली. २८ मेपर्यंत जिल्ह्यात सरासरी १४३.३ मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद झाली आहे. यात देऊळगाव राजा २०६ मिमी आणि सिंदखेड राजा २३८ मिमी या तालुक्यात पावसाने द्विशतक गाठले आहे. जळगाव तालुक्यात १५६ मिमी, चिखली १४३, बुलढाणा १२८, मेहकर १८९, लोणार १९३ मिमी, खामगाव १४६, शेगाव १५५, नांदुरा १११ मिमी या तालुक्यात पावसाने नाबाद शतक केले आहे. (दि.२८) मे रोजी सकाळी ८.३० वाजता संपलेल्या चोवीस तासात जिल्ह्यातील तब्बल ३८ महसूल मंडळांत अतिवृष्टीची अर्थात ६५ मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. जळगाव तालुक्यातील जळगाव, जामोद, पिंपळगाव, आसलगाव, वडशिंगी मंडळात, चिखली तालुक्यातील चिखली, अमडापूर, उदयनगर, पेठ, धोडप, बुलढाणा तालुक्यातील साखळी, देऊळगाव राजा मधील देऊळगाव शहर, देऊळगाव राजा ग्रामीण, तुळजापूर, मेहुणा, अंढेरा मंडळात, मेहकर तालुक्यातील जानेफळ, हिवरा, वरवंड, नायगाव, कल्याना या मंडळात अतिवृष्टी झाली आहे.

यातील उदयनगर मंडळात तब्बल ११२ मिमी पावसाने थैमान घातले. सिंदखेड राजा तालुक्यातील सिंदखेड, किनगाव, मलकापूर पांग्रा, दुसरबीड, सोनोशी, शेंदुर्जन, लोणार तालुक्यातील बीबी, सुलतानपूर, हिरडव, अंजनी, खामगाव तालुक्यातील लाखनवाडा, हिवरखेड, अंटाळी, पळशी, आडगाव आणि वझर महसूल मंडळंठी अतिवृष्टीने थैमान केले.

# जिल्हा कारागृहात मार्गदर्शक शिबीर संपन्न

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.३०**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणामार्फत गुरुवार दि. २९ मे २०२५ रोजी सकाळी बुलढाणा जिल्हा कारागृहात येथे मार्गदर्शक शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बंद्याना नशामुळे होणारे दुष्परीणाम संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली यांचे ड्रग्ज मुक्त भारतासाठी ड्रग्ज जागरूकता आणि निरोगीपणा २०२५ मधील निर्देशानुसार मार्गदर्शक शिबीर घेण्यात आले होते. शिबीराच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा सहदिवाणी न्यायाधीश सचिव नितीन पाटील उपस्थित होते. तसेच मानसोपचार तज्ञ डॉ. विश्वास खर्चे, अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त गजानन घिरके, संदीप पांचाळ, ॲड. संदीप टेकाळे हे मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते. शिबीरामध्ये डॉ विश्वास खर्चे यांनी कारागृहातील बंद्यांना नशा करण्याचे आरोग्यावर दुष्परीणाम, तसेच नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींनी परावृात होण्याकरीता काय करावे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्ष नितीन पाटील, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा यांनी सुध्दा बंद्यांना नशामुक्ती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर शिबीराच्या प्रसंगी कारागृह अधीक्षक संदीप भुतेकर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी मोहन पाटील वैद्यकीय अधिकारी डॉ.निलेश टेकाळे, डॉ. मयुर पडोळ इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मलकापूर न.प.विरुद्ध गाढव मोर्चा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मलकापूर दि.३०**




पक्ष नेते सर्वश्री मा आ राजेशजी एकडे, डॉ अरविंदजी कोलते, ॲड साहेबरावजी मोरे यांनी दिलेल्या सुचने नुसार, जेष्ठनेते तथा माजी नगराध्यक्ष सर्वश्री हाजी रशीदखा जमादार, श्यामभाऊ राठी, हरीशभाऊ रावळ तथा शहराध्यक्ष राजूभाऊ पाटील यांचे नेतृत्वात न.प. प्रशासनाच्या कामचुकार, बेलगाम, भ्रष्ट कारभारामुळे मलकापूर शहरातील नाल्या अनेक दिवसांपासून स्वच्छ होत नाहीत, दररोज रस्त्यांची स्वच्छता होत नाही, नित्य कचरा संकलन होत नाही, पूर्णा मायला मुबलक पाणी असून सुद्धा १५ दिवसांत पाणीपुरवठा होत नाही, पाणी पुरवठा लिकेज दुरुस्त होत नाही, रस्त्याावरील पथदिवे बंद असतात, हायमास्ट लाईट्स बंद असतात अश्या मलकापूर नगर पालिकेच्या या सर्व विभागांच्या अनागोदी, कामचुकार व भ्रष्ट कारभारामुळे सर्वसामान्य जनतेला समस्या आणि अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. येत्या काही दिवसांत पावसाळ्या मुळे सामान्य जनतेला मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे या सर्व समस्यां बाबत न प प्रशासनाला विस दिवसां पूर्वी (दिनांक ६ में रोजी) निवेदन देऊन सुद्धा प्रशासनाची कुंभकर्णी झोप उडाली नसल्याने गुरुवार दिनांक २९ मे रोजी दुपारी १२ वाजता श्री हुतात्मा स्मारक ते नगर परिषद कार्यलया पर्यंत गाढव मोर्च काढून न प येथे कचरा फेका व मडके फोडा आंदोलन करण्यात आले.

सदर मोर्च्यांत भारतीय राष्ट्रीय कांग्रेस चे कार्यकर्ता तथा नगर वासीयांनी मोठ्या संख्येत सहभागी झाले होते तथा कचरा फेकण्यात आले.

येत्या काळात पाणी प्रखठा व्यवस्था, लिकेज दुरुस्ती, कचरा संकलन, नाली साफ सफाई, रस्ते परिसर साफ सफाई, पथ दिवा इत्यादि व्यवस्था व्यवस्थित न केल्यास मुख्याधिकारी, प्रशासक यांचे तोंडाला काले फांसुन त्यांची गाढवा वरून धिंड काढण्यात येईल अशी तंबी दिली.

# नुकसानग्रस्त कांदा पिकाची महसूल विभागाकडून पाहणी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपूर दि.३०**

उन्हाळी कांदा पिकाचे अवकाळी पावसाने अतोनात नुकसान झाले असून सततच्या पावसाने कांदे जमितीन सडत असल्याने नुकसान भरपाई मिळावी या मागणीचे निवेदन तालुक्यातील निरोड बाजार येथील नुकसानग्रस्त कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना केले होते. अजिंक्य भारत वृत्तपत्रात बातमीची दखल घेवून महसून विभागाने या नुकसानीचा प्रत्यक्ष बांधावर जाऊन सर्व्हे केला आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून अवकाळी पावसाने अक्षरशः थैमान घातले आहे.या मध्ये ज्वारी, तीळ आणि कांदा ह्या पिकाचे नुकसान झाले.या मध्ये कांदा पिक अतिशय नाजूक असल्याने ते वाफ्यात सडले आहे.गेली दोन चार महिने या कांदा पिकावर शेतकऱ्यांचे पदरचे पैसे खर्च झाले आहेत. पण नुकसान एवढे भयावह आहे की पिक खर्च निघणे पण दुरापास्त झाले.हाती आलेला घास निसर्गाने हिरावला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले.

समोर पेरणीचे दिवस तोंडावर असल्याने शेतकरी पुरता आर्थिक संकटात सापडल्याने



अजिंक्य भारत इम्पॅक्ट

पेरणीची सोय आणि शेतीची मशागत कशी करावी या विवंचनेत सापडला आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नियम व अटी बाजूला करून भरघोस आर्थिक मदत व्हावी या मागणीचे निवेदन निरोड येथील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी २८ मे रोजी तहसीलदार यांना सादर केले होते. या निवेदनाची महसूल विभागाने तातडीने दखल घेत निरोड येथील कर्तव्य दक्ष ग्राम महसूल अधिकारी विनोद भिसे,कृषी सहाय्यक असंबे सरपंच सचिन सौदागर, आदींनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानाची पाहणी केली आणि खरोखर झालेले नुकसान किती भयावह आहे हे त्यांच्या लक्षात आले. या वेळी राजू पाटील,पांडुरंग भारसाकडे,शंकर सोनोने,निर्मलाबाई कवरे, सुधीर मानकर,विजय शेंडे,आदी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# वर्ल्ड एशियन मिंक्स बॉक्सिंग गेम्समध्ये गणेश पेरे रेफ्रि म्हणून नेपाळमध्ये

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**चिखली दि.३०**

नेपाल येथे वर्ल्ड एशियन मिंक्स बॉक्सिंग चैंपियनशिप स्पर्धा ३०/३१ में ला होणार आहें. त्याा महाराष्ट्र राज्यातुन गणेश प्रल्हाद पेरेव मिंक्स बॉक्सिंग असोसिएशन बुलढाणा जिल्हा सचिव गणेश पेरे हे रिफ्री म्हणून काम पाहणार आहे.

जानेवारी महिण्यात दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धाला पंच म्हणून त्यांची निवड झाली होती. त्यांची उत्कृष्ट कामगिरी बघुन पुन्हा अंतराष्ट्रीयला पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवड बदल क्रिडा शिक्षकांनमध्ये व खेळाडुंमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



पुढील वाटचालीस मिंक्स बॉक्सिंग संस्थापक राकेश म्हसकर, महाराष्ट्र मिंक्स बॉक्सिंग असोसिएशन चे अध्यक्ष प्रशांत मोहिते , जेयवंत दादा, मोहम्मद सुफियान,क्रिडा संयोजक चिखली दिलीप लांडकर , प्रशिक्षक देवानंद नेमाने , बॉक्सिंग प्रशिक्षक असलम हिरीवाले,कैलास करवंदे , संजय सावंत ,एल एस घुबे, राम काछवाल, कार्तिक पोटे , वैभव सोळंकी व शुभम सोळंकी , विष्णु पाटील घुबे आणि समस्त गावकरी मंडळी दे घुबे यांनी अभिनंदन केले आहे.

# बनावट कागदपत्रांच्या आधारावर साकारला सौरऊर्जा प्रकल्प

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मोताळा दि.३०**

मोताळा नगर पंचायत हद्दीत काही महिन्यांपूर्वी मोताळा नांदुरा मार्गावर सबस्टेशनजवळ सुरू केलेला मोठा सौरऊर्जा प्रकल्प बेकायदा असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. नगरपंचायत प्रशासनाची परवानगी न घेताच नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करून खोटे दस्तऐवज सादर करण्यात आले. ही कागदपत्रे (दि.२२) मे रोजी नगर पंचायतीच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात आली. केलेल्या निरीक्षणात कंपनीचा खोटारडेपणा उघड झाला. पितळ उघडे पडल्याने या कंपनीविरोधात लिपिक संतोष इंगळे यांनी बोराखेडी पोलिसांत तक्रार दाखल केली.

मोताळा शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर नांदुरा मोताळा रोडवर सबस्टेशनजवळ नगर पंचायत हद्दीत २ पॉवर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या वतीने काही महिन्यांपूर्वी सायक्लीक एनर्जी पॉवर लिमिटेड मोताळा या कंपनीने सौरऊर्जा प्रकल्प सुरू केला. व्यवसाय सुरू करतेवेळी नगर पंचायत प्रशासनाची कोणत्याच प्रकारची पूर्व परवानगी घेतली नाही. कागदपत्रे सादर करण्याबाबत मोताळा नगर पंचायत प्रशासनाने (दि.८) ऑक्टोबर २०२४ व (दि.२२) मे २०२५ रोजी कंपनीला लेखीपत्र देण्यात आले. यावर मे रोजी संबंधित कंपनीने नगर पंचायत प्रशासनाला ई-मेलद्वारे माहिती सादर केली. सादर केलेले ना हरकत प्रमाणपत्र बनावट असून, सदर दस्तऐवजावर मुख्याधिकाऱ्यांची खोटी स्वाक्षरी व शिक्क्याचा वापर केला आहे. मोताळा नगर पंचायत कार्यालयाने (दि.११) एप्रिल २०२३ रोजी ठराव घेतल्याचे दर्शविण्यासाठी ठरावही बनावट तयार करण्यात आला.

या प्रस्तावावर नगराध्यक्ष माधुरी देशमुख यांची स्वाक्षरीही बनावट आहे. ही बाब गंभीर असल्याने सदर सौरऊर्जा कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी बोराखेडी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केली आहे. आता पोलीस प्रशासन काय कारवाई करते, याकडे तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे.

# महाराणा प्रतापसिंहजी यांच्या जयंतीनिमित्त भव्य-दिव्य तिरंगा रॅली

## हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह स्वाभिमान आणि शौर्याचे प्रेरणास्त्रोत- सानंदा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.३०**



हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी हे सिसोदिया कुळातील पराक्रमी हिंदु राजे होते त्यााचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज हे देखील सिसोदिया कुळातले राजे होते. हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी यांनी देश धर्माच्या रक्षणासाठी प्रतिकुल परिस्थितीमध्ये कठीन संघर्ष केला.कितीही कठीण प्रसंग आला तरी महाराणाजींनी कधीही आपल्या तत्वाशी तडजोड केली नाही. मोडेल पण वाकणार नाही हा स्वाभिमानी बाणा अंगीकार करुन महाराणाजींनी मोठया शौर्याने इतिहास घडविला.हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह स्वाभिमान आणि शौर्याचे प्रेरणास्त्रोत आहे असे प्रतिपादन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले.गुरुवार दि.२९ मे २०२५ रोजी ज्येष्ठ शुक्ल तृतीयेच्या दिवशी तीथीनुसार विर शिरोमणी,हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ वी जयंती टॉवर चौक येथील भारतरत स्व.राजीव गांधी उद्यान येथे राजपुत समाजभुषण, शक्तीउपासक राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली व राजपुत समाजातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत खामगाव शहरात विविध विधायक कार्यक्रमांनी हर्षोल्हासात साजरी करण्यात आली त्यप्रसंगी त्यांनी उपरोक्त प्रतिपादन केले.

यावेळी श्री राष्ट्रीय राजपुत करणी सेनेचे राष्ट्रीय सचिव डॉ.भगतसिंग राजपुत, करणी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संदिपसिंग राजपुत,राजपुत समाजाचे अध्यक्ष प्रमोदसिंह पाटील,राजपुत समाजाचे ज्येष्ठ नेते दर्शनसिंह ठाकुर,विश्वपालसिंह जाधव,माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा,माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा,सहकारमित्र राणा राजेंद्रसिंह सानंदा,उद्योजक राणा मुकेशसिंह सानंदा,माजी जि.प.सदस्य सुरेशसिंह तोमर,रविंद्रसिंग इंगळे, प्रा.प्रमोदसिंग चव्हाण,खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे,लायसन सभापती विलाससिंग इंगळे,खामगाव तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मनोज वानखडे,शेगाव तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष विजय काटोले,खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी मुख्य प्रशासक पंजाबरावदादा देशमुख, माजी नगरसेवक किशोरआप्पा भोसले, खामगाव विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष रोहित राजपुत, पंकजसिंह राजपुत,प्रतापसिग पवार,मनोहरराव बोराडे,पवन पवार,अशोकबाप्पु देशमुख यांच्यासह राजपुत समाजातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. जयंतीनिमित्त माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते लाडु वाटप करुन उपस्थितांचे तोंड गोड करण्यात आले. तद्रंतर सकाळी ११ वाजता भारतरत स्व.राजीव गांधी उद्यान येथुन भव्य तिरंगा मोटर सायकल रॅलीला शुभारंभ करण्यात आला. या मोटर सायकल रॅलीमध्ये अग्रभागी आकर्षक रथामध्ये हिंदुसुर्य महाराणाजींचा अश्वारुढ पुतळा ठेवण्यात आला होता. रॅलीमध्ये हजारो राजपुत समाज बांधव-भगिणी व राणा प्रेमी जनतेने सहभाग घेतला. दुचाकी स्वारांनी वाहनांवर केसरीयाँ झेंडे व हातामध्ये तिरंगी झेंडे घेवुन डोक्याला केसरी फेटा परिधान केला होता. अत्यांत शिस्तीत आणि उत्साहात निघालेल्या या भव्य दिव्य तिरंगा मोटर सायकल रॅलीने शहरवासीयांचे लक्ष वेधुन घेतले.




## थोडक्यात

### कोंडोली ते आमगव्हाण रस्त्याच्या कडेचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे



**कोंडोली :** कोंडोली ते आमगव्हाण रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेव्हर ब्लॉक बसव्याचे काम चालू आहे. सदर काम अतिशय निकृष्ट दर्जाचे चालू असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला थातुर माथूर खोदकाम करून त्यामध्ये भर पावसात सिमेंट गिट्ठी टाकण्यात आली आहे . सदर काम कोणाच्या निधीतून आहे किती लक्ष रुपयाचे आहे याबाबत मोठी गोपनीयता आहे. त्यामुळे सदर काम अतिशय दर्जाहिन होत आहे. त्यामुळे वरिष्ठांनी सादर काम ाकडे लक्ष देऊन आरखड्या नुसार काम करण्याची मागणी होत आहे.

### बियाणे अर्जास किमान पाच दिवसांची मुदतवाढ द्या!

**शेलुबाजार:** कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोफत बियाणे वाटप योजनेच्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेस मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सावता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी २८ मे रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शहा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. अर्जाची अंतिम तारीख २९ मे होती, ऑनलाइन प्रक्रियेत गुंतागुंत व ग्रामीण भागातील इंटरनेट समस्यांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी पाहता किमान पाच दिवसांनी मुदत वाढवावी, म्हणजे अधिक शेतकरी योजनेचा लाभ घेऊ शकतील. अशी मागणी पांडुरंग कोठाळे यांनी यांनी केली आहे.

### समृद्धी महामार्गावरील मालेगाव टर्मिनलजवळ अपघात; एक जखमी

**मालेगाव :** समृद्धी महामार्गाच्या मालेगाव टर्मिनलजवळ गुरुवारी सकाळी ट्रक आणि आयशर वाहनामध्ये भीषण अपघात झाला. यात आयशर चालक सचिन हतांगरे (वय ३०) जखमी झाला. नागपूरहून जालनाकडे जात असलेल्या आयशरला ट्रकने मागून धडक दिली. ट्रकचालक रविशंकर कुमार (वय २६) झोपेत असल्यामुळे हा अपघात घडला.

### नागपूर-संभाजीनगर द्रुतगती मार्गावर अपघात

**कारंजा :** नागपूर-संभाजीनगर द्रुतगती मार्गावरील धानोरा ताथोड गावानजिक संत गजानन महाराज मंदिराजवळ २८ मे रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास दुचाकी अपघातात २६ वर्षीय युवक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. स्वप्निल निळकंठ गावंडे (२६, रा. वरुड बु., ता. मंगरूळपीर) असे जखमीचे नाव असून तो अमरावतीहून कारंजामार्गे आपल्या गावी जात असताना ही घटना घडली. जय गजानन रुग्णवाहिकेचे चालक दीपक सोनवणे यांनी प्रसंगावधान राखून जखमी युवकास तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.जय गजानन रुग्णवाहिकेचे चालक दीपक सोनवणे यांनी प्रसंगावधान राखून जखमी युवकास तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

### अल्पवयीन मुलगी नातेवाइकांकडे सुपूर्द

**कारंजा :** कारंजा-धनज मार्गावर रस्ता चुकलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला २९ मे रोजी सामाजिक कार्यकर्ते व पोलिसांच्या तत्परतेमुळे सुखरूप नातेवाइकांकडे सुपुर्द करण्यात आले. कारंजा-धनज मार्गावर एकटीच १५ वर्षीय माया नामक अल्पवयीन मुलगी पायदळ जाताना बंडूभाऊ इंगोले यांच्या निदर्शनात आली. त्यांनी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता ती बोलण्यास तयार नव्हती. विचारपूस केल्यानंतर माया ही काजळेश्वर येथील असून तिची बहीण ग्रामीण पोलिस ठाण्याजवळ झोपडपट्टीत राहते, हे स्पष्ट झाले.

### इसम बेपत्ता

मंगरुळपीर : चांदई येथील मंगल किसन चव्हाण (वय ३५) हे २८ मे रोजी दुपारी दाढी करण्यासाठी मंगरुळपीर येथे जातो असे सांगून घरातून निघाले. परंतु अद्यापपर्यंत परतले नाहीत. त्यांच्या भावाने, बाबाराव चव्हाण (वय ३८) यांनी मंगरुळपीर पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार ही माहिती समोर आली आहे. पोलिसांनी हरविल्याची नोंद घेत शोध सुरु केला आहे.

# केंद्राची 'एमएसपी' अन्यायकारकच

## किमान आधारभूत दरानुसार राज्यात भावांतर योजना राबवा!





> मुख्यमंत्री व कृषीमंत्री यांना मी विनंती केली आहे की, या एम एस पी या गंभीर विषयावर तातडीने लक्ष घालून, शेतकर्‍यांच्या हितासाठी खरीप हंगाम २०२५-२६ साठी राज्यात भावांतर योजना त्वरित लागू करावी. महाराष्ट्र शासनाने शिफारस केलेल्या दरांनुसार शेतकर्‍यांना योग्य मोबदला मिळाला तरच राज्यातील शेतकरी खर्‍या अर्थाने समृद्ध होईल. यामुळे शेतकर्‍यांचा आत्मविश्वास वाढेल आणि कृषी क्षेत्राला मोठा आधार मिळेल.
>
> **- भावना गवळी**
> आमदार, विधान परिषद, मुंबई

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३० :** महाराष्ट्र शासनाने सोयाबीनसाठी रु. ७,०७७ प्रति क्विंटल तर कापसासाठी रु. १०,५७९ प्रति क्विंटल किमान आधारभूत दराची शिफारस केली होती. मात्र, केंद्र सरकारने सोयाबीनसाठी रु. ५,३२८ प्रति क्विंटल आणि कापसासाठी रु. ७,७१० प्रति क्विंटल असे दर जाहीर केले आहेत. ही तफावत शेतकर्‍यांसाठी अन्यायकारक असल्याची बाब आमदार भावनाताई गवळी यांनी महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

खरीप हंगाम २०२५-२६ साठी केंद्र सरकारने नुकत्याच घोषित केलेल्या किमान आधारभूत दरांमध्ये (एमएसपी) आणि महाराष्ट्र शासनाने शिफारस केलेल्या दरांमध्ये तफावत दिसुन येत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाची भरपाई देखील होत नाहीये, असे शेतकर्‍यांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर, आ. भावना गवळी पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्याकडे राज्यातील शेतकर्‍यांसाठी तातडीने 'भावांतर योजना' लागू करण्याची आग्रही मागणी केली आहे.

भावना गवळी पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकर्‍यांनी मोठ्या कष्टाने पिकवलेल्या शेतमालाला योग्य मोबदला मिळणे अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या किमान आधारभूत दरांमुळे शेतकर्‍यांचा उत्पादन खर्चही भागत नाही आणि त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे कठीण झाले आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, शेतकर्‍यांच्या कष्टाचे मूल्य करण्यासाठी आणि त्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी 'भावांतर योजना' हा एकमेव प्रभावी उपाय आहे. या योजनेमुळे महाराष्ट्र शासनाने शिफारस केलेल्या दरांनुसार शेतकर्‍यांना योग्य मोबदला मिळेल आणि राज्यातील शेतकरी खर्‍या अर्थाने समृद्ध होतील.

## शासकीय कार्यालयात राजमाता अहिल्याबाईच्या प्रतिमांची भेट



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. ३० :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षा. निमित्त भारतीय जनता पार्टी वाशिम शहर मंडळातर्फे प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. शासकीय कार्यालयांमध्ये अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा वाटप करण्यात आले.

हा उपक्रम वाशिम-मंगरूळनाथ विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांच्या प्रेरणेतून व भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चीतलांगे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार, २९ मे २०२५ रोजी विठ्ठलवाडी येथील आमदार खोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत वाशिम शहरातील महसूल, पोलीस, आरोग्य, शिक्षण, नगर पालिका व इतर महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांना राजमाता अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा सन्मानपूर्वक भेट देण्यात आली.

या कार्यक्रमात भाजपा शहर मंडळाचे पदाधिकारी, ओबीसी मोर्चा, महिला व युवा मोर्च्याचे कार्यकर्ते, मंडल सदस्य आणि इतर भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

## विस्थापन केल्याने अनेक समस्या; आदिवासी बांधव त्रस्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ३० :** राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदे कडून सरकारच्या विरोधामध्ये पाच टप्प्यातील चरणबद्ध आंदोलन पुकारले आहे.

या आंदोलनाचा दुसरा टप्पा दिनांक ३० मे रोजी महाराष्ट्रातील ३६ जिल्हे आणि ३५८ तालुक्यात एकाच दिवशी तहसीलदार यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती यांना निवेदन देन्यात आले.

राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद तथा राष्ट्रीय आदिवासी छात्र संघाच्या वतीने अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालुक्यातील ८ आदिवासी गावातील हजारो आदिवासी बांधवांचे विस्थापन करून अनेक प्रकारच्या समस्या सरकारने निर्माण केल्या आहे. त्यांच्यावर कित्येक वर्षापासून अन्याय होत आहे. या वेळी राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद चे वाशिम जिल्हा संयोजक गजानन गंडाळे यांच्या नेतृत्वा मधे मानोरा तहसील येथे निवेदन देन्यात आले. या वेळी गजानन डोलारकर अफ्रोट संघटना तालुका अध्यक्ष,क्रांतिवीर बिरसा मुंडा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गोलु वाळले, सामाजिक कार्यकर्ते निखिल अंबोरे,क्रांतिवीर बिरसा मुंडा संघटनेचे वाशिम जिल्हा अध्यक्ष रवी पखमोडे,सामाजिक कार्यकर्ते महादेव बुचके, गजानन गिरे इत्यादि कार्यकर्ते उपस्थित होते.

## अवकाळी पावसाने शेतमालाचे नुकसान: नुकसान भरपाई द्या!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ३० :** मानोरा शहरासह संपूर्ण ग्रामीण भागात गेल्या दहा दिवसा पासून अवकाळी पाऊसाने हाहाकार केला आहे. सतत सुरु असलेल्या अतिवृष्टी ने तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान केले आहे. नुकसान झालेल्या शेतमालाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दयावी. असे निवेदन शेतकऱ्यांसह पदाधिकारी यांनी तहसीलदार यांना २८ मे रोजी दिले आहे.

मानोरा तालुक्यात नुकत्याच आलेल्या अवकाळी पावसाने शेतामधील ज्वारी, बाजरी, तीळ, भुईमूग, केळी, संत्रा तसेच इतर पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. ही अतिवृष्टी अचानक आणि अपेक्षेच्या बाहेर झाल्यामुळे शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वतयारी करता आली नाही. परिणामी संपूर्ण शेतीचे आर्थिक नुकसान झाले आहे. ही पिके शेतकऱ्यांसाठी मुख्य आर्थिक आधार होता. सध्याच्या परिस्थितीत शेतकरी वर्गावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे, म्हणून, महसूल विभागामार्फत पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ योग्य ती आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी.

या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात . अशी विनंती तहसीलदार डॉ. संतोष येवलेकर यांना निवेदनातून करण्यात आली आहे.निवेदन देतेवेळी बाजार समितीचे सभापती डॉ.संजय रोठे, प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस राजु गुल्हाने,वरीष्ठ उपाध्यक्ष काँग्रेस इफ्तेखार पटेल, गट नेते प स मानोरा गोपाल भोयर, प्रा. हेमंत देशमुख, अध्यक्ष सरपंच संघटना आशीष पाटील, विक्रांत देशमुख, दिपक ठाकरे, गजानन पवार आदी शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

## महाराणा प्रताप जयंतीचा शासकीय कार्यालयाला विसर

**वाशिम:** आपल्या देशासाठी अनेक थोर महापुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, सर्वस्व अर्पण करून आपल्याला स्वतंत्र भारत दिला. मात्र, आज काही शासकीय अधिकारी हे विसरत चालले आहेत की त्या महान व्यक्तींमुळेच आपण स्वतंत्र आहोत.



सरकारने सर्व महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करण्याचे परिपत्रक सर्वच शासकीय कार्यालयांना दिले आहे. तरीदेखील आज हिंदूसूर्य महाराणा प्रताप सिंह यांची ४८५ वी जयंती बऱ्याच शासकीय कार्यालयांमध्ये साजरीच करण्यात आलेली नाही, ही अतिशय खेदजनक व लज्जास्पद बाब आहे. यास राजपूत समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, राजपूत संगठनाचे वाशिम जिल्हाध्यक्ष आशिष ठाकूर यांनी यावर आक्षेप घेतला आहे. त्यांनी सांगितले की, ङ्गहा अपमान आम्ही सहन करणार नाही. संबंधित शासकीय अधिकाऱ्यांविरोधात जिल्हाधिकारी यांच्याकडे लवकरच औपचारिक तक्रार दाखल करण्यात येणार आहे. राजपूत संगठनाच्या या कृतीने आता प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विकासात्मक कामांच्या पाहणीसाठी सीईओ वाघमारे यांच्या भेटी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशीम, दि. ३० :** तालुक्यातील शेलु गावातील प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट तसेच १५ वा वित्त आयोगाअंतर्गत झालेले स्मशानभूमी व वीहिर बांधकाम इत्यादी कामांची पाहणी याशिवाय तालुक्यातील बुद्रुक, अनसिंग आणि झाकलवाडी या गावाला भेट देऊन गावातील पाणी पुरवठा व स्वच्छतेबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी २८ मे रोजी भेट दिली.

यावेळीं त्यानी शेलु येथील स्मशानभूमी व विहिर बांधकाम इत्यादी कामांची पाहणी केली. गावातील आरो प्लांट, सार्वजनिक शौचालयाची पाहणी केली. ग्रामपंचायत कार्यालयला भेट देऊन उपलब्ध माहिती व दस्तावेजांची पाहणी केली. गावातील स्वच्छतेची कामे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

शेलु गावातील कोंडवाड्यात शेतकऱ्यांच्या शेतात घुसून शेतीची नासधूस करणाऱ्या मोकाट गुरे व इतर जनावरांना कोंडण्यासाठी वापर करण्यात येत असल्याचे सरपंचांनी सांगितले. पशुपालक शेतकऱ्यांकडून पाचशे रुपये डिपॉझिट तसेच प्रति दिवसाला तीनशे रुपये हा करण्यात येतात. गुरे पुन्हा शेतात आले नाही तर पाचशे रुपये डिपॉझिट परत केले जाते व गुरे वासरे पुन्हा शेतात आल्यास पाचशे रुपये डिपॉझिट जप्त केले जात असल्याबाबत सांगितले. याबाबत कोणताही वादविवाद न होता सामंजस्याने प्रश्न निकाली काढण्यात येत असल्याची माहिती सेलू बुद्रुकचे सरपंच देवानंद गुट्टे यांनी दिली. यानंतर सीईओ वाघमारे यांनी तीनही गावातील अंगणवाडीला भेट दिली. अंगणवाडी मधील पोषण आहाराची पाहणी केली तसेच गावात शोषखड्डे व इतर विकास कामाची माहिती घेतली. गावातील सर्व घटकात चांगली कामे झाली असल्याचा शेरा मारुन सीईओ यांनी सरपंच देवानंद गुट्टे आणि ग्रामसेवक संजय नवघरे यांचे कौतुक केले.

## चार वर्षांपासून मंजुरी न मिळाल्याने महिला घरकुलापासून वंचित

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ३० : :** तालुक्यातील खडी येथील गंगा देविदास भगत या महिलेने मागील चार वर्षापासून घरकुल साठी अर्ज केला. त्यांना मंजुरी न मिळाल्याने, जिल्हा परिषद समोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

गंगा भगत यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना दिलेल्या लिखित निवेदनात म्हटले आहे की, तिचे घर काड्या-कुडाचे असून ती मोलमजुरी करून दोन मुलांचा उदरनिर्वाह करते. एका महिन्यात निर्णय न झाल्यास जिल्हा परिषदच्या प्रवेशद्वारावर उपोषण करणार असल्याचा इशारा भगत यांनी दिला.

# 'त्या' सिंचन प्रकल्पांच्या भिंतीची अधिकाऱ्यांकडून पाहणी

## जलसंधारण विभागाने घेतले झोपेचे सोंग

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी


अजिंक्य भारत

28 May 2025 - Page 10

सिंचन प्रकल्पाच्या भिंतीला मोठे भगदाड

धरण फुटण्याची भिती: जलसंधारण विभागाचे दूर्लक्ष



**अजिंक्य भारत इम्पॅक्ट**

**वाशीम, दि. ३० :** उमरा शम सिंचन प्रकल्पांच्या भिंतीला भगदाड, धरण फुटण्याची शक्यता या मथळ्याखाली दैनिक अजिंक्य भारत ने २८ मे रोजी वृत्त प्रकाशित केले होते . तहसिलदार निलेश पळसकर यांनी या वृत्ताची दखल घेऊन सदर धरणांची पाहणी करण्यासाठी मंडळाधिकारी छोटूलाल बरेटीया व ग्राम महसूल अधिकारी दिपाली देशमुख यांना स्थळ पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. या सूचनेनुसार महसूल अधिकाऱ्यांनी स्थळ पंचनामा करून सदर भिंत धोकादायक असल्याची अहवाल पाठवला.

उमरा शम सिंचन प्रकल्पांच्या बाधित झाडे वाढली असून भिंतीवर भगदाड पडल्याने उमरा शम धरण फूटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तात्काळ उपाययोजना करावीं अशी मागणी लक्ष्मण इंगळे व बालाजी कराळे यांनी केली होती, या संदर्भातील वृत्त दैनिक अजिंक्य भारत ने २८ मे रोजी प्रकाशित करून उजागर केले होते. या वृत्ताची दखल घेऊन सदर धरणाच्या भिंतीवर वाढलेल्या झाडांचा व भिंतीवर पडलेल्या भगदाडाचा पंचनामा करण्यात आला. या झाडामूळे व पडलेल्या भगदाडा मूळे सदर धरणांची भिंत. तुटण्याची शक्यता नाकारता येत नाही . त्यामुळे तात्काळ उपाययोजना करावीं लागणार आहे. असा पंचनामा करून मंडळाधिकारी छोटूलाल बरेटीया व ग्राम महसूल अधिकारी दिपाली देशमुख यांनी तहसिलदार वाशीम यांच्याकडे पाठवला आहे. या सर्व घडामोडी होऊन सुद्धा जिल्हा जलसंधारण अधिकारी , उपविभागीय अभियंता जल जलसंधारण विभाग वाशीम यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांनी या गंभीर प्रकाराकडे फिरकूनही पाहीले नाही. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त रांगोळी स्पर्धा उत्साहात



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. ३० :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त बुधवार, २८ मे रोजी वाशिम येथे भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील मुलींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत रांगोळीतून सामाजिक संदेश व प्रेरणादायी विचार प्रभावीपणे सादर केले.

ही स्पर्धा आ. श्याम खोडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांच्या नेतृत्वात, ओबीसी जिल्हाध्यक्ष बाळू मरकुटे , महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस हेमलता विसपुते, जिल्हा उपाध्यक्ष रूपाली देशमुख यांनी आयोजन केले होते.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. नम्रता इंगळे, द्वितीय क्रमांक भक्ती बंडाळे, तर तृतीय क्रमांक पायल काळे हिने प्राप्त केला. याशिवाय उत्तेजनार्थ अवंती देशमुख व श्रावणी हरणे यांना मिळाला. प्रोत्साहनपर बक्षीस विराज शिंदे याला मिळाला. परीक्षक म्हणून राधिका मंत्री व प्रतीक्षा वानखेडे यांनी काम पाहिले. उपक्रमाचे आयोजन भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष मायाताई वाघमारे, शहराध्यक्ष छायाताई पवार, जयश्रीताई सारडा, करुणाताई कल्ले, डॉ. जयश्री गुट्टे, अनिता ईटेकर, विमल जाधव, सविता मोहोळ, छाया मडके, नंदा गोटे, सोनल डुकरे यांनी केले होते.

# ‘येथे थुंकू नका’ ची पाटी केव्हा दिसेनाशी होईल?

। रूबेन वाळके ।

○ मुखकर्करोग तज्ज्ञ डॉ. राजेश रांदड यांचा परखड सवाल

○ तंबाखूमुक्ती : शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणांचा समन्वय महत्त्वाचा

**अकोला, दि. ३०** :आजकालची तरूण पिढी व्यसनांच्या अधिन गेली असून, त्यामुळे अलिकडच्या काळात कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. त्यातही ९५ टक्के मुखकर्करोग हा तंबाखू, गुटखा सेवनाने आणि सिगारेटच्या धुम्रपानानेच होत असल्याचे सांगून युवकांनी तंबाखूला नाही म्हणायला शिकावे, असा मोलाचा सल्ला विदर्भातील प्रख्यात मुखकर्करोग तज्ज्ञ डॉ. राजेश रांदड यांनी दिला आहे. आज ३१ मे रोजी जगभर साजरा केल्या जात असलेल्या जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिनाच्या पूर्वसंध्येला दैनिक अजिंक्य भारतसोबत संवाद साधताना ते बोलत होते. त्यांनी वाढत्या व्यसनाधिनतेवर तीव्र चिंता व्यक्त करीत, विदर्भ ही सध्या गुटख्याची राजधानी बनली असून, तंबाखूमुक्तीसाठी शासन, जिल्हा प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांचा समन्वय तसेच नागरिकांची साथ या बाबी महत्त्वाच्या असल्याचे आवर्जून सांगितले.



तंबाखू सहजपणे उपलब्ध होत असून, विविध सोहळ्याप्रसंगी एकत्र आलेले सर्वसामान्य नागरिकच नव्हेत तर अनेक वेळा अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक हेदेखील तंबाखू, गुटखा यांची सार्वजनिकरित्या देवाण-घेवाण करीत असल्याचे निदर्शनास येते. अर्थात तंबाखू देणे-घेणे हा जणू परस्परांना अभिवादन करण्याचा आणि सोपस्काराचाच भाग बनला आहे, इतका हा प्रकार समाजात खोलवर रुजला आहे, असे सांगून डॉ. रांदड म्हणाले, की एखाद्या दारुड्या व्यक्तीकडे पाहण्याचा जो समाजाचा दृष्टिकोण असतो तो तंबाखू सेवन करणाऱ्याच्या बाबतीत आढळत नाही, त्यामुळे तंबाखू सेवन करणाऱ्यांमध्येही सामाजिक जाणिवेचा अभाव आढळून येतो, हे जरी खरे असले तरी तंबाखूमुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम विचारात घेऊन त्याने आपले आरोग्य जपणे आवश्यक ठरते; परंतु त्यासाठी दुष्परिणामांची जाणीव करून देणारी जनजागृती होणेही आवश्यक आहे. यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेने या दिनानिमित्त तंबाखू आणि निकोटिन उत्पादनावर उद्योग धोरण उघड करणे हे घोषवाक्य ठेवले आहे. अर्थात तंबाखू आणि निकोटिन उत्पादनाला, त्यांच्या निर्मितीलाच जर आळा घातला तर त्यामुळे होणारे सर्व दुष्परिणामदेखील होण्याचा धोका टळेल आणि शासकीय कार्यालय असो की खासगी कार्यालय असो, त्याठिकाणी ‘येथे थुंकू नका’, अशी पाटी लावण्याची वेळही येणार नाही. शासनाच्या महसूलप्राप्तीच्या धोरणामुळे तो ‘सोनियाचा दिन’ आपल्या देशात कधी येईल, हे सांगणे सध्या तरी अवघडच आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. शासनाकडून तंबाखूवर कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्षात बंदी, जिल्हा प्रशासनाकडून कडक आणि ठोस स्वरूपाची दंडात्मक कारवाई आणि प्रत्येक जिल्हा पातळीवर आरोग्य उपसंचालक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन आणि रेडक्रॉस या सर्व आरोग्य विषयक यंत्रणा एकमेकांच्या हातात हात घालून तंबाखूच्या दुष्परिणामांना उजागर करणार नाहीत तोपर्यंत तंबाखू सेवनाबाबत सामाजिक परिवर्तनाची लाट येणे अशक्य आहे, त्यामुळे या सर्व घटकांनी तसेच सर्वच राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते यांनी आपसी हेवेदावे विसरुन शासन, प्रशासनाला या कामी मदत केली तर तंबाखूमुक्तीचा दिवस फार दूर नाही, असेही डॉ. रांदड यांनी यावेळी आवर्जून सांगितले. शासनाने बंदी घातली असली तरी चोरट्या मार्गाने येणारे तंबाखू आणि तत्सम पदार्थ यांच्यावर अन्न आणि औषध विभागाने वेळीच पायबंद घालण्याचीही विशेष गरज आहे, असे सांगून डॉ. रांदड म्हणाले, की धूम्रपान आणि तंबाखूजन्य पदार्थांचे अतिसेवन यामुळे मुखकर्करोगाला आयतेच आमंत्रण मिळते.

धूम्रपान आणि तंबाखू वा तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणारा बहुतांशी वर्ग गरीब असल्याने त्यांना या आजाराची प्राथमिक लक्षणे माहिती होत नाहीत. त्यामुळे त्यांनी वेळीच दंतरोगतज्ज्ञाचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण तोच त्यांच्या आजाराचे योग्य निदान करू शकतो. तंबाखुमुळे होणाऱ्या या आजारावर प्राथमिक स्वरूपात असतानाच होणारा खर्च परवडणारा असतो आणि रुग्ण बरा होण्याची शक्यता बळावते; परंतु या आजाराने रौद्र रूप धारण केल्यावर रुग्ण मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या पुरता खचून जातो आणि त्यातच त्याचा अंत होतो. म्हणून शाळकरी मुले असोत की युवक, कोणीही फॅशनच्या नावाखाली तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्याची सवय लावून घेऊ नये, असा मोलाचा सल्लाही डॉ. रांदड यांनी याप्रसंगी दिला.

### विदेशात सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान केल्यास जबरदस्त दंड



विदेशात सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान केल्यास जबरदस्त दंड आकारला जातो. भारतात मात्र जिकडेतिकडे खुलेआम धूम्रपान करणारे पाहावयास मिळतात. शासनाने केलेली गुटखाबंदी केवळ कागदावरच आहे. कोरोना काळात तर गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारे मालामाल झाले आहेत, यातूनच शासनाच्या योजनेचे कसे तीनतेरा वाजले आहेत, याची प्रचिती येते. हा विषय केवळ घोषणा करून संपणारा नाही, याची गंभीर दखल शासनाने घेण्याची वेळ आली असल्याचेही डॉ. रांदड म्हणाले.

# सर्वोदय व महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे तंबाखूविरोधी जनजागृती अभियान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** :तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करण्यापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी महाराष्ट्र नशाबंदी मंडळ व जिल्हा सर्वोदय मंडळाच्या विद्यमाने जिल्ह्यात ३१ मे २०२५ पासून तंबाखू विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक व अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बबनराव कानकिरड यांनी दिली.

तंबाखूचे सेवन आरोग्यासाठी घातक ठरू शकते. तंबाखू किंवा धूम्रपानामुळे व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर तसेच शारीरिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. तथापि हे माहीत असूनही मोठ्या संख्येने लोक फसव्या जाहिरातीला बळी पडून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखूचे सेवन करतात. लोकांमध्ये गुटखा, विडी, सिगारेट इत्यादींच्या सेवनाने अनेक आजारांचा धोका सतत वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते तंबाखूच्या सेवनाने अनेक गंभीर आणि जीवघेण्या आजारांचे धोके वाढत आहेत. फुप्फुसाचा कर्करोग, यकृताचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग आतड्याचा




कर्करोग आणि गर्भाशयाचा कर्करोग यांचा धोका असतो. याशिवाय हृदयविकार आणि इरेक्टाइल डिस्फंक्शनसारखे गंभीर आजार होऊ शकतात. किशोरवयीन मुलांमध्ये असे घातक व्यसन लागू नये, यासाठी या अभियानातून शाळा, महाविद्यालयांमधून जनजागृती करणे, व्यसनविरोधी कार्यशाळा घेणे, व्यसनमुक्ती चित्र प्रदर्शन आयोजित करणे. जागतिक तंबाखू विरोधी दिन केवळ एका दिवसापुरता साजरा न करता तंबाखूच्या वापराच्या विनाशकारी परिणामांशी संघर्षासाठी एक व्यसनमुक्त विचारांची तरुण पिढी संघटित करणे हा या मागचा उद्देश आहे.

या वर्षीची थीम ही तंबाखू उद्योगाकडून त्यांची उत्पादने आकर्षक बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हेराफेरीच्या युक्त्यांचा पर्दाफाश करते. विशेषतः तरुणांना आणि असुरक्षित लोकसंख्येला रंगीबेरंगी पॅकेजिंग आणि आकर्षक जाहिराती ते चवदार प्रकार आणि डिजिटल मार्केटिंगपर्यंत तंबाखू उत्पादने जाणून-बुजून चमकदार आणि आकर्षक दिसण्यासाठी तयार केली जातात. त्यांच्या मागील घातक परिणाम लपवतात. या उज्ज्वल उत्पादनाच्या नावाने करण्यात येणारे काळे हेतू त्यांचे अपीलविषयी लोकांमध्ये त्यांच्याविरुद्ध जनजागृती करणे. तंबाखू वापराच्या परिणामाबद्दल जागरूकता निर्माण करून लोकांना धूम्रपान सोडण्यास प्रोत्साहित करण्यासाठी ३१ मे पासून महाराष्ट्र नशाबंदी मंडळ व सर्वोदय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाच्या प्रेरणेने जिल्ह्यात तंबाखू विरोधी जनजागरण अभियान गावागावात राबविणार आहेत.

# व्यसनापासून दूर राहा, निरोगी आयुष्य जगा!

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** : जागतिक तंबाखू विरोधी दिन दरवर्षी ३१ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश तंबाखूच्या धोक्याबद्दल जनजागृती करणे हा आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, जागतिक तंबाखू विरोधी दिन २०२५ ची थीम आहे ‘‘अपवादात्मक आकर्षण: तंबाखू आणि निकोटीन उत्पादनांच्या उद्योगांच्या धोरणांचा पर्दाफाश.’’ जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या आजारांमुळे दरवर्षी सुमारे ८ लाख लोकांचा मृत्यू होतो. तंबाखूच्या सेवनामुळे हृदयाला त्रास होतो. रोग, पक्षाघात, कर्करोग आणि मधुमेह यामुळे टाइप २ मधुमेह होतो. मधुमेहाचा धोकादेखील वाढतो.

जागतिक तंबाखू विरोधी दिनाचा इतिहास - तंबाखू सेवनामुळे होणारे आजार आणि मृत्यूच्या वाढत्या आकडेवारीमुळे जागतिक आरोग्य संघटनेने १९८७ मध्ये जागतिक तंबाखू विरोधी दिन सुरू केला. हा दिवस ७ एप्रिल १९८८ रोजी पहिल्यांदा साजरा करण्यात आला. यानंतर, ३१ मे १९८८ रोजी ४२.१९ ठराव पारित झाल्यानंतर, दरवर्षी ३१ मे रोजी हा दिवस साजरा केला जाऊ लागला.

तंबाखूच्या सेवनामुळे तोंडाचा, घशाचा, फुप्फुसाचा, पोटाचा, किडनीचा, किंवा मूत्राशयाचा इत्यादी कॅंसर (कर्करोग) होऊ शकतात. तंबाखूमुळे हृदय आणि रक्त वाहिन्यांचे विकार, हृदयरोग, छातीत दुखणे, हदयविकाराच्या झटक्यामुळे अचानक मरण येणे, स्ट्रोक (मेंदूचा विकार), परिधीय संवहनी रोग (पायाचा गँगरीन) हे रोग होतात. तंबाखू हे क्षयरोग होण्याचे अप्रत्यक्ष कारण आहे. सिगारेट किंवा विडीचे धूम्रपान, जितके अधिक, तितके अधिक टीबीचे प्रचलन वाढू शकते. धूम्रपान/ तंबाखूचे सेवन अचानक रक्तदाब वाढविते आणि हदयाकडे जाणारा रक्तपुरवठा कमी करते. यामुळे पायाकडे होणाऱ्या रक्तप्रवाहातदेखील कमतरता येते आणि पायात गँगरीन होऊ शकते.तंबाखू किंवा धूम्रपानामुळे मधुमेह होण्याकची शक्यता जास्त बळावते.तंबाखूमुळे रक्तातील चांगले कोलॅस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते.धूम्रपान / तंबाखूचे स्त्री व पुरुषांवर दुष्परिणाम होतात.याचे सेवन पुरुषांमध्ये नपुंसकतेचे कारण आहे.धूम्रपान / तंबाखूचे सेवन स्त्रियांमध्ये इस्ट्रोजनची पातळी कमी करते व रजोनिवृत्ती लवकर होते.

### धूम्रपान, तंबाखू सोडण्यासाठी युक्त्या



जेव्हा तलफ येईल तेव्हा, तुमच्या मुलांबद्दल आणि त्यांच्या भवितव्याबद्दल विचार करा व तुमच्यावर तंबाखूमुळे होणाऱ्या भयंकर रोगांचा विचार करा..जेव्हा तुम्हाला धूम्रपान/तंबाखूची तलफ लागेल तेव्हा ४ गोष्टी लक्षात ठेवा १. काहीतरी वेगळे करायचा प्रयत्न करा २. दोन सिगारेट पिण्यामध्ये विलंब करा ३. दीर्घ श्वास घ्या. ४. पाणी प्या. स्वतःसाठी सकारात्मक बोला. दररोज आरामाच्या तंत्रांचा वापर करा जसे (व्यायाम,योग, चालणे, ध्यानधारणा, नृत्य, संगीत इत्यादी). पोषक आहार घ्या, व्यसनापासून दूर राहा, निरोगी आयुष्य जगा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.

# तंबाखूविरहित जीवनाकडे वाटचाल: तज्ज्ञांचे मोलाचे मत

। शरद शेगोकार ।

**अकोला, दि. ३१ : तंबाखूच्या सेवनामुळे दरवर्षी जगभरात लाखो जण मृत्युमुखी पडतात. शरीरातील प्रत्येक अवयवावर घातक परिणाम करणारा हा मूक हत्यारा आजही आपल्या समाजात सहजपणे उपलब्ध आहे. आज, ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिनाच्या पार्श्वभूमीवर अकोल्यातील विविध वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांनी तंबाखू विरहित आरोग्य या विषयावर मोलाचे विचार मांडले, सर्व तज्ज्ञांनी एकमताने सांगितले की, तंबाखूचे सर्व प्रकार मग ते धूम्रपान स्वरूपातील असोत वा चघळायचे, आरोग्यास अत्यंत घातक आहेत. ‘‘स्वतःसाठी आणि आपल्या कुटुंबासाठी तंबाखूपासून कायमची सुटका करा,’’ असा संदेश त्यांनी दिला. आजकाल वयाच्या १५-१६ व्या वर्षीच तरुण सिगारेट किंवा गुटखा सुरू करतात. हे व्यसन वयाबरोबर शरीरात खोलवर मुरते आणि त्याचे दुष्परिणाम ३०-३५ व्या वर्षी दिसायला लागतात. हे थांबवायचे असेल, तर कुटुंब, शिक्षक आणि समाज यांनी एकत्रित पुढे येणे गरजेचे आहे.**

**शासनाने प्रत्येक सरकारी कार्यालय व स्थानिक स्वराज्य संस्थांतील विभागप्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रात तंबाखू सेवन करणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचे अधिकार दिले आहेत. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू/ गुटखा सेवन रोखण्यासाठी ही जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. जर प्रत्येक विभागप्रमुखाने ही जबाबदारी मनापासून पार पाडली, तर अकोला जिल्हा तंबाखूमुक्त होऊ शकतो. नागरिकांनीही सहकार्य करावे, कारण आरोग्यदायी समाजासाठी तंबाखूमुक्त परिसर हे पहिले पाऊल आहे.**

### तोंडाचे आरोग्य टिकवायचे असेल, तर तंबाखूचा त्याग अपरिहार्य!



तंबाखूचे सेवन हे दातांच्या आरोग्यास गंभीर हानी पोचवते. अनेक रुग्ण दात सडणे, मुळांमध्ये सूज येणे, पस तयार होणे अशा तक्रारी घेऊन येतात. रूट कॅनल उपचारांद्वारे दात वाचवणे शक्य असले तरी तंबाखू सेवन सुरूच राहिल्यास संसर्ग पुन्हा होतो. त्यामुळे तोंडाच्या आरोग्यासाठी केवळ उपचार नव्हे, तर तंबाखूचे संपूर्णतः त्याग करणेही अत्यावश्यक आहे.

**डॉ.अमित हेडा** , रूट कॅनल तज्ज्ञ.

जागतिक तंबाखू विरोधी दिन विशेष



### तंबाखूमुळे आवाज बसतो, घसा बिघडतो!



तंबाखूचे सेवन घसा आणि श्वसनमार्गासाठी अत्यंत धोकादायक आहे. तंबाखूमुळे घशात जळजळ, आवाजी बदल, गिळण्यात अडचण आणि कधी कधी आवाज पूर्णपणे बसतो. अनेक रुग्ण माझ्याकडे घशातील गाठी किंवा जखमा घेऊन येतात, ज्यांचे मूळ तंबाखूच्या सततच्या सेवनात असते. याकडे वेळेवर लक्ष दिले नाही तर ते कर्करोगाचे रूप घेऊ शकते. तंबाखू टाळा आणि घसा व श्वसन आरोग्य सुरक्षित ठेवा.

- **डॉ. प्रियांका दंदी,** घसा,एन्डोस्कोपिक तज्ज्ञ

### तंबाखूचे आरोग्यावर गंभीर परिणाम



तंबाखू सेवनामुळे मुख कर्करोग, घशाचे विकार, हृदयविकार आणि फुप्फुसांचे आजार वाढत आहेत. दरवर्षी अनेक रुग्ण जिल्हा रुग्णालयात दाखल होतात. यामुळे जनजागृती, नियमित तपासणी आणि व्यसनमुक्ती मोहिमा अत्यंत आवश्यक आहेत. कोटपा विभागाद्वारे या उपाययोजना राबविल्या जात आहेत, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.तरंगातुषार वारे यांनी जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त सांगितले. तंबाखूच्या धोक्यांविषयी सर्वांनी जागरूक राहावे.

**-डॉ.तरंगातुषार वारे,** जिल्हा शल्य चिकित्सक.

### तंबाखूचे विष मुलांपासून दूर ठेवा!



मी गेली ४५ वर्षं दंतवैद्यक क्षेत्रात कार्यरत असून, रोज सुमारे ५० रुग्णांची तपासणी करतो, त्यापैकी सुमारे ५ रुग्ण तंबाखूजन्य तोंडाच्या आजारांनी त्रस्त असतात. तंबाखू ही सवय नव्हे, ती एक धीमा विषप्रयोग आहे. विशेषतः पालकांनी लहान मुलांसमोर तंबाखू खाऊ नये, त्यांना तंबाखू आणायला पाठवू नये किंवा त्यांच्यासमोर तंबाखू खाऊन समाधान व्यक्त करू नये. मुले मोठ्यांचं अनुकरण करतात. आपल्या चुकीच्या सवयी त्यांनाही लागतात. त्यामुळे तंबाखूचं सेवन टाळा आणि पुढील पिढीचं आरोग्य सुरक्षित ठेवा. आजचा दिवस बदलासाठी उत्तम संधी आहे.

- **डॉ. आर. बी. हेडा,** दंतरोग तज्ज्ञ.

### तोंडातील डागांची दखल घ्या कर्करोगाचा इशारा असू शकतो!



तंबाखूमुळे होणाऱ्या कर्करोगांमध्ये मुख कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक आहे. याची सुरुवात तोंडात सामान्य वाटणाऱ्या जखमा, पांढरे डाग किंवा लालसर चट्ट्यांपासून होते. दुर्लक्ष केल्यास हे कर्करोगात रूपांतर होते. त्यामुळे तंबाखूचा त्याग आणि लवकर निदान हीच बचावाची प्रभावी साधनं आहेत. कर्करोग रोखण्यासाठी समाजात जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे,

- **डॉ.अक्लेश गुल्हाने,** कॅन्सर तज्ज्ञ, एआयएमएस ,टाटा मुंबई एमसीएच.

### १००% तंबाखूमुक्त शाळा-महाविद्यालयासाठी एकत्र या!



कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी तंबाखू सेवन, विक्री, जाहिरात यावर बंदी आहे. आपण नियमितपणे शाळा, कॉलेज, बसस्थानक, हॉस्पिटल परिसरात कारवाई करत आहोत. यावर्षीचा आमचा उद्देश म्हणजे ‘शाळा व महाविद्यालय १००% तंबाखूमुक्त’ बनवणे. पालक, शिक्षक, व्यापारी आणि तरुणांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग द्यावा.

**डॉ. प्रीती कोगदे,** जिल्हा समन्वयक.

### तंबाखूचा त्याग म्हणजे हृदय-फुप्फुसांचे रक्षण!



तंबाखू हे हृदय व फुप्फुसांचे सर्वात मोठे शत्रू आहे. सिगारेट, विडी किंवा गुटखा सेवनामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, हृदयावर ताण येतो आणि हृदयरोगाचा धोका वाढतो. तसेच फुप्फुसांचे कार्यही मंदावत जाते. अनेक रुग्ण माझ्याकडे श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणं आणि थकवा यांसारख्या तक्रारी घेऊन येतात, ज्यांचे मूळ तंबाखूच्या सवयींमध्ये असते. तंबाखूचा त्याग म्हणजेच निरोगी आयुष्याची खरी सुरुवात.

- **डॉ. अरविंद चव्हाण,** हृदयरोग,छातीरोग तज्ज्ञ

### कोटपा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी हवी



तंबाखूजन्य पदार्थांपासून युवकांना वाचविण्यासाठी कोटपा कायदा प्रभावीपणे राबवणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने कायदा केला असला तरी अंमलबजावणीत गंभीर उणिवा आहेत. सुगंधी सुपारीच्या नावाखाली गुटख्याची खुलेआम विक्री सुरु आहे. किशोरवयीन मुलांना व्यसनापासून रोखण्यासाठी शाळा, पालक आणि प्रशासनाने एकत्र येणे गरजेचे आहे. आमच्या संस्थेमार्फत शेकडो विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे समुपदेशन करण्यात आले आहे.

**अमरदीप सदांशिव,** अध्यक्ष,
युवा व्यसनमुक्ती जन आंदोलन समिती, महाराष्ट्र राज्य.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

शनिवार, दि. ३१ मे २०२५


## थोडक्यात



### विद्यापीठात महाराणा प्रताप जयंती

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, ननसा संचालक डॉ. अजय लाड तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालन व महाराणा प्रताप यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### प्रदीप अंधारे कार्यकारी अभियंता पदावर नियुक्त



**पूर्णानगर :** अचलपूर येथील महावितरण विभागीय कार्यालयात नवनियुक्त कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांनी पदभार स्वीकारला. त्यांच्या स्वागतासाठी विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते आणि त्यांचे उत्साहपूर्वक स्वागत करण्यात आले. या प्रसंगी अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय कुटे, संजय पुरी, उप कार्यकारी अभियंता मनोज टवळारकर, तुषार गांजरे, संजय दातीर, सहायक अभियंता हर्षपाल सावतकर, रोहित मस्के, ठाकरे मॅडम, राजेश मिसूरकर, नीलेश शिंदे, मनोज सरदार, राजेश गावळी, गौरव निस्ताणे तसेच उपव्यवस्थापक राजेश तिवारी, नीलेश मानकर, सचिन नलकांडे हे उपस्थित होते. कर्मचारी वर्गातर्फे सतीश चोपडेकर, सुशील साव, गौरव खाओले, पंकज माहूलकर, बिस्मिल्लाह शाह, सचिन ठाकरे, शेख साजिद आदींनी नव्या कार्यकारी अभियंत्याचे स्वागत केले. पदभार स्वीकारल्यानंतर श्री. अंधारे यांनी सर्व उपविभागांचे दौरे केले आणि अधिकाऱ्यांना योग्य दिशा-निर्देश दिले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या कार्यकाळातील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे सर्व वीज ग्राहकांना अखंड व दर्जेदार वीज सेवा पुरविणे आहे. फीडरवरील विद्युत हानी (लॉस) कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला आणि विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना संघभावनेने कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच, अवैधरित्या वीज चोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले. वीज ग्राहकांनी वेळेवर बिल भरण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, यामुळे विभागाची आर्थिक स्थिती सक्षम होईल आणि सेवा सुधारण्यात मदत होईल. प्रदीप अंधारे यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे अचलपूर परिसरातील वीज सेवा नव्या दिशेने प्रगत होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिक व ग्राहकांनीही त्यांच्या आगमनाबद्दल समाधान व्यक्त केले असून, यापुढे वीज संबंधित समस्या वेळीच सुटतील अशी आशा व्यक्त केली आहे.

### मोर्शी येथे ज्वारी खरेदीचा शुभारंभ



**मोर्शी :** महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड अमरावती तथा मोर्शी तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था मोर्शीच्या वतीने आज दि.२७ मे रोजी शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत शासकीय गोडाऊन येथे ज्वारी खरेदीचा शुभारंभ खरेदी विक्री संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.दिलीप मालपे व तहसीलदार विनोद वानखडे यांचे हस्ते करण्यात आला. सर्वप्रथम सदन शेतकरी ओंकार वानरे रा. अंबाडा या शेतकऱ्याची ज्वारी शासनाच्या प्रतिक्विंटल ३१७१ रुपये भावाप्रमाणे खरेदी करण्यात येऊन त्यांचा दुपट्टा नारळ देऊन खवीसचे उपाध्यक्ष प्रा. दिलीप मालपे, तहसीलदार विनोद वानखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गेल्या दोन वर्षापासून ज्वारीच्या पेऱ्यात वाढ झालेली दिसत असून ज्वारीचे उत्पादन बाहेर येताच मार्केटमध्ये व्यापारी वर्गाकडून ज्वारीचे भाव पाडल्या जातात. दोन ते अडीच हजार रुपये क्विंटल ज्वारीची किंमत पाहायला मिळते. हा शेतकऱ्यांवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी काही शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन सुद्धा दिले होते. मोर्शी तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था ही शेतकरी हिताची संस्था म्हणून ओळखली जाते.त्या अनुषंगाने तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री व योग्य भाव मिळवून देण्यासाठी तत्पर राहते.ज्वारीचे पीक आता शेतकऱ्यांच्या घरी येणे सुरू झाले असून हमीभाव योजनेअंतर्गत शासकीय दराने शेतकऱ्यांची नोंदणी करण्याचे आदेश ३१ मे पर्यंत देण्यात आले असून ३० जून पर्यंत शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी केली जाणार आहे.त्यासाठी पीक पेरा असलेला ऑनलाईन सातबारा,आधार कार्ड, आधार लिंक असलेले बँक खाते असणे गरजेचे आहे.या ज्वारी खरेदी शुभारंभाला खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष प्रा.दिलीप मालपे,खवीसचे संचालक प्रमोद घारड, नरेंद्र रामटेके,प्रवीण काळमेंघ,गजानन ठवळी,तहसीलदार विनोद वानखडे,खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक रामेश्वर राऊत,खरेदी प्रमुख महेश पाचवे,गोदाम रक्षक राजेंद्र वानखडे, पत्रकार अजय पाटील यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### गोडावून समोरून दुचाकी चोरली

**अमरावती :** राजापेठ पोलिस ठाण्यांतर्गत येत असलेल्या एसबी ऑटो मोटूव समोर लावून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली ही घटना २८ मे रोजी घडली. फिर्यादी संदीप गोविंदराव व्यास ५२, जवाहररोड अमरावती यांची दुचाकी गोडावून समोर उभी ठेवले होती. व गोडाऊनमध्ये गेले परत आल्यावर त्यांची दुचाकी दिसून आले नाही. फियादी यांनी याबाबत राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# वनविभाग बदलीचे कनेक्शन मंत्रालयापर्यंत

## पदस्थापनेची लिंग पोहचते राजकारणात, व्हायरल ऑडिओ क्लिपने खळबळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** बहुतांश बदलींच्या प्रक्रियेत अर्थकारण दडले असते, असे नेहमी बोलल्या जाते. बदली चांगल्या व क्रीम जागी करण्यासाठी चढाओढ आणि बोली सुध्दा लागत असावी. हा प्रकार उघडपणे होत नसत्य तरी, छुप्या पद्धतीने अर्थकारणातून बदलीचे सत्र सुरु राहते. अशातच वनविभागातील एका वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांच्या कायरल ऑडिओ क्लिपने बदलीच्या अर्थकारणाचे पितळ उभडे पडले आहे. पाचावत तौर संस्थेची तक्रार वनमंत्र्यांपर्यंत करण्यात आली आहे विशेष म्हणजे वनविभागातील बदलीच्या जर्थकारणाचे कनेक्शन मंत्रालय स्तरापर्यंत पोहोचत असल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे गंभीर प्रकाराकडे वनमंत्रालय स्तरावरून मारवाई केली जाते. याकडे लक्ष लागले आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्याचे संभाषण असणाऱ्या एका ऑडिओ क्लिपने अमरावती शहरासह राज्यभरात उडविली आहे पत्र परीक्षेत्र बदलीच्या अनुषंगाने लागी बोली २५ कर असावामुळे वनविभागाच्या या बटने साराचे अर्थकारण कुटून सुरु होते आणि कुठे संपते, भाची उत्सुकता निर्माण झालेली आहे पाविषय पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुले यांनीही आता दखल घेतली असून या ऑडियो किल्पच्या माध्यमातून चौकशीला सुरुवात होण्याची शक्यता आहे. विभागाच्या बदलीमागील छुपे चेहरे हे मंत्रालय स्तरापर्यंत असल्याची चर्चा यास अमरावती शहरात सुरु आली अधिकारीपरंतु मंशालय स्तरावर बदलीच्या प्रक्रियेत टाइट करणारे कोण एक संशोधनाचा विषय आहे परंतु वनविभागाच्या बदलीसंदर्भात मोठ्या प्रमाणात रक्कम पेन्या हा प्रकार वनविभागाच्या पारदर्शक कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्हे निर्माण करणारा ठरत आहे



### कधी थांबणार हा घोडेबाजार?

निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वनाचे व वन्यप्राण्यांचे संवर्धन आवश्यक असून जी सर्वस्वी जबाबदारी वनविभागाची आहे. यामध्ये आता बरचसे एनजीओ वनसंवर्धनासाठी पुढे येत वनविभागाची मदत करीत आहे. परंतु अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यामध्ये जर अर्थकारण दडले असेल तर वनसंवर्धनाकडे लक्ष्य कोण देणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे बदल्यांचा घोडेबाजार कधी थांबणार असा प्रश्न वार संस्थेचे अध्यक्ष निलेश कंचनपुरे यांनी उपस्थित केला आहे.

ससेहोलपट बदलीसाठी वे रुपये द्यावत्स तयार होतात, त्यांची क्रीम ठिकाणी सदाली केली जाते. परंतु बदलीसाठी जितके पैसे दिले, तितकेय पैसे भरण्याचे प्रधान देखील के अधिकारी करीत असल्याची शक्यता आहे. परंतु ने बटनीसाठी पैसे देऊ शकत नाहीत

> “ याबद्दल आमच्याकडे कोणतीही माहिती नाही. वन विभागातील उच्च पदांवर बदल्या येथून होत नाहीत, तर मंत्रालयातून होतात.
>
> **ज्योती बॅनर्जी,** मुख्य वनसंरक्षक, अमरावती.

> “ सध्या एक ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झालेली आक्षेप नोंदवून वनमंत्री व वन सचिव यांच्याकडे लेखी तक्रार ईमेलद्वारे दाखल केली आहे. त्या क्लिपमध्ये बदलीसाठी ३५ लाख ते ५० लाखापर्यंत पैशाची मागणी होत असल्याचे सांगितले जात आहे. ही बाब खूप गंभीर आहे, सदर बाबीचे खात्री करून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्न साखळीत महत्वाची भूमिका जंगल व वन्यप्राण्यांची आहे. परंतु वनविभागातील अधिकाऱ्यांना बदलीसाठी पैसे मागितले जात असेल, तर ते वनाचे संवर्धनाकडे लक्ष देणार का?, वनविभागाचे कामकाज पारदर्शक चालेल का? असा प्रश्न उपस्थित आहे. बदल्यांची ही लिंक मंत्रालयापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे.
>
> **निलेश कंचनपुरे,** अध्यक्ष, वॉर संस्था

त्यांची मात्र ससेहोलपट होते. अनेक जण विनंती अर्ज करून बदली मानतात परंतु पैसे दिले नाही, म्हणून, त्यांना योग्य का दामनही त्यामुळे जे प्रामाणिकपणे काम कराडात निर्माण होते.

कसे होणार वनाचे संवर्धन? बनविभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी, सहायक वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी व उपवनसंरक्षक दर्जाच्य अधिकाऱ्यांच्या पदस्थापन जास्त होते परंतु जर बदा करण? असा प्रश्न उपस्थितज्ञता आहे. जर पैसे घेऊन क्रिय डिकाणी अधिकारी फादर्शकरणे काम कोत का? असाही एक प्रश्न यानिमित्ताने पुढे होत आहे.

# रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते?

## खड्डे बुजविण्याची आशिष गावंडेंची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** संपूर्ण अमरावती व बडनेरा शहरामध्ये विविध रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे झालेले आहेत. ज्यामुळे शहरात राहणाऱ्या नागरिकांना जणू काही आपण खेडेगावात राहतो, अशी जाणीव व्हायला लागली आहे. या खड्ड्यांमुळे अनेक लोकांना पाठीच्या हाडांचे आजार उद्भवले आहेत. अनेकांच्या वाहनांचे नुकसान होत आहे, दर दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी या गड्ड्यांमुळे वाहनांचे अपघात होत आहेत. नागरिकांच्या जीविताची हानि सुद्धा नाकारणे चुकीचे ठरते. नुकतेच पावसाने लावलेल्या आपल्या जोरदार हजेरीमुळे रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी भरल्याने वाहन चालवणाऱ्यांना खड्डा माहिती पडत नाही. ज्यामुळे दर दिवशी



मोठमोठाले अपघात होत आहेत. खरंतर रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता बांधलेला आहे, हेही ओळखणे कठीण झाले आहे. ज्यामुळे शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, महिला वर्ग, पुरुष वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिकांची मोठी ओरड सुरू आहे. प्रभाग क्रमांक ९ एसआरपीएफ-वडाळी मध्ये *वडाळी ते विद्यापीठ जाणारा डेंटल कॉलेज समोरील रोड*, *वडाळी बस स्टॉप ते ऑक्सिजन पार्क*, *महादेव खोरी उडानपुल ते महादेव मंदिराला जाणारा रस्ता, मंगलधाम कॉलनीचा विठ्ठल रुक्मिणी मंदिर ते गणेशा हिल्स पर्यंतचा मुख्य रस्ता तसेच अंतर्गत रस्ते तर खूपच जास्त खराब झालेले आहेत. ज्यामुळे नागरिकांमध्ये अमरावती महानगरपालिके प्रति मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे.

नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता रस्त्यांवर चे खड्डे बुजवणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. ही गंभीर बाब युवा स्वाभिमान पार्टीचे माजी शिक्षण सभापती व माजी नगरसेवक आशिषकुमार गावंडे यांनी नागरिकांसह अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त श्री सचिन कलंत्रे यांना लक्षात आणून दिले. आणि शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांना जेट पॅचर ने डांबरी पॅचेस बसवून तसेच आवश्यक तिथे मुरूम टाकून बुजविण्या संदर्भाची निवेदन देऊन आशिष गावंडे यांनी मागणी केली.

यावर मनपा आयुक्तांनी सकारात्मक भूमीका घेत रस्ते बांधकाम विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांना रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे आदेशित केले. याप्रसंगी अमोल पवार, सुधीर फेंडर, संजय दाबणे, तुकाराम चव्हाण, अमोल टेकाळे, महेंद्र शेळके, शीतल पवार, प्रफुल बोरेकर, अक्षय झोड, अनुप थोरात, सुरेंद्र तायडे, पंकज चोपडे, विजय जाधव, रणजीत मेश्राम, राजू बैस, भुवन म्हैसकर, स्वानंद पहुरकर, अरूणा कुकडे, अरूणा अलोने, छाया धंदर, उपस्थित होते.

# ग्रामीण रुग्णालय राम भरोसे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. ३० :** येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णाची प्रचंड गैरसोय होत आहे.वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णालय वाऱ्यावर सोडले असून रुग्णालय भरोसे असल्याचे दिसून येत आहे. चार प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रथमोपचारानंतर पुढील उपचारार्थ तालुक्यातील गोरगरीब शहरातील ग्रामीण रुग्णालयात धाव घेतात. रुग्णालयात रुग्ण येतात मात्र त्यांना पुरेसा उपचार मिळत नाही. शुगरच्या रुग्णाच्या रक्त तपासण्या ग्लुकोमीटर स्ट्रिप नसल्याचे कारण देऊन थांबविल्या जातात.विविध लसीकरणासाठी औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णाची टाळाटाळ केली जातेजनरेटर ची व्यवस्था असूनही भरती रुग्णांना अंधारात रात्र काढावी लागते या शिवाय स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जात आहे.प्रसूत महिलांना पूर्णतः मोफत उपचार मिळावा हे शासनाकडून बांधनकार असतांना अनेकदा महिलांना संदर्भसेवा देऊन जिल्हा रुग्णालयात



### प्रसूत महिला व रुग्णाचे हाल

उपचार घ्यावा लागत आहे.एका रुग्णालयातून जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णवाहिका मोफत असतांनाही प्रसूत महिलांना मोफत रुग्णवाहिका उपल्बध होत नाही असेही निदर्शनास आले असून रुग्ण कल्याण समितीचे सुद्धा या विविध समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे.याठिकाणी वैद्यकीय सेवा पूर्णतः कोलमडली आहे.तरी सुद्धा येथील वैद्यकीय अधीक्षक रुग्णालयात फिरकूनही पहात नसल्याची वास्तविकता समोर आली आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस आजन्म कारावास

## नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणातील एका आरोपीला अमरावती जिल्हा सत्र न्यायालय (क्रमांक १) ने आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ही घटना १२ डिसेंबर २०२१ रोजी नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घडली होती. प्रवीण ऊर्फ पंडू शंकरराव अंभोरे (३८) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. १२ डिसेंबर २०२१ रोजी सहा वर्षीय मुलगी घराच्या परिसरात खेळत होती. त्यावेळी आरोपी प्रवीणने तिला परिसरातील विहाराच्या मागे नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला, या घटनेनंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी नांदगावपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदविला,

पोलिसांनी घटनेची चौकशी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे अॅड. सोनाली क्षीरसागर यांनी न्यायालयात साक्षीदार तपासले. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर पुरावे आणि साक्षीवरून आरोपीवर दोष सिद्ध झाला. त्यानंतर अमरावती जिल्हा सत्र न्यायालय (क्रमांक १) ने आरोपीला पोक्सो कायद्यान्वये १० वर्षांचा सश्रम कारावास, २० हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त कारावास,

आजन्म कारावास व ५० हजाराचा दंड व दंड न भरल्यास २ वर्ष अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली. या प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून एएसआय बाबाराव मेश्राम, ईश्वर राठोड आणि विजय आहे यांनी कामकाज पाहिले.

# सौर ऊर्जा व ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे दिशादर्शक कार्य : कुलगुरु

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत वर्ष २०१८ मध्ये ५७६ किलो वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन केलेला असून सौर उर्जा व उर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे कार्य दिशादर्शक असल्याचे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठाच्या एकूण वीज वापराच्या ५५ ते ६० टक्के वीज ही या प्रकल्पातून निर्मित होत असूने ३.६२ रूपये प्रति युनिट वीज दर विद्यापीठासाठी निश्चित केला आहे. वीज वितरण कंपनीचा दर ११.५२ रूपये प्रति युनिट असून सौर प्रकल्पातून निर्मित होणारी वीज अतिशय स्वस्त दरात विद्यापीठाला मिळत आहे. मागील सहा वर्षात जवळपास तीन कोटी रुपयांची मोठी आर्थिक बचत झालेली आहे. याशिवाय निसर्ग संवर्धनासाठी सुद्धा विद्यापीठाने हातभार लावलेला असून सौर ऊर्जा प्रकल्पामुळे ४०८१ टन एवढ्या कार्बन-डाय-ऑक्साइडचे उत्सर्जन नियंत्रित झाले आहे. वीज बचतीचे यंत्र व उपकरणांचा वापर मागील सहा वर्षात वीज बचत करणारे बीएलडीसी सिलिंग पंखे, एलईडी ट्यूबलाइट आणि पथदिवे, पंचतारांकित यंत्रे व उपकरणे यांचा वापर विद्यापीठाने वाढविलेला असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीज बचत झाली आहे. विद्यापीठाचा एकुण वीज वापर १४.६४ लक्ष युनिट वरुन २०२४-२५ मध्ये तो १३. ५७ लक्ष युनिट झाला आहे. मागील



सहा वर्षात इमारतींच्या, यंत्रे व उपकरणांच्या तसेच सभा व कार्यक्रमांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असतांना सुध्दा विद्यापीठाची वीज वापरात झालेली घट उल्लेखनीय आहे. विद्यापीठातील एकूण लाईट पैकी ८१ टक्के एलईडी लाईट असून ५० टक्के बीएलडीसी सिलिंग पंखे बसविण्यात आलेले आहे. शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याकरिता वित्तीय संस्थांकडे विद्यापीठाने प्रस्ताव सादर केला असून सी.एस.आर. फंडासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठाला महाऊर्जाकडून वीज बचत करणारे एलईडी लाईट, बीएलडीसी सिलींग पंखे, पंचतारांकित वातानुकूलन यंत्रे लावण्यासाठी आतापर्यंत दोन टप्प्यांत ४४ लाख रुपयांचे वित्तीय साहाय्य प्राप्त झालेले आहे. सौर ऊर्जेचा वापर जास्तीत जास्त करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्नशील असून विद्यापीठ परिसरातील निवासी इमारतींवर जवळपास २०००० लीटर क्षमतेचे सौर बंब बसविण्यात आलेले आहे. ऊर्जा अंकेक्षणाच्या अभ्यासात्मक अहवालानुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची क्षमता वाढविणे, ऊर्जा बचत तसेच ऊर्जा संवर्धन क्षेत्रात अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. वीज बचत करण्यासाठी आणि विजेचा गैरवापर टाळण्यासाठी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विभागांतर्गत विजेची बचत करण्यासाठी आणि विजेचा गैरवापर टाळण्यासाठी सर्वांना आवाहन केले आहे. विद्यापीठाचा सौर ऊर्जा प्रकल्प आणि विद्युत उपकेंद्र हे आदर्श प्रकल्प असून या ठिकाणी वीज वितरण कंपनीचे प्रशिक्षणार्थी अभियंता यांची चमू तसेच इतर विद्यापीठातील मंडळी आणि इतर मान्यवर नेहमीच भेट देऊन या प्रकल्पाची माहिती जाणून घेतात व विद्यापीठाच्या कार्याची प्रशंसा करतात. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वाखाली आणि प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विविध प्राधिकारीणीच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, विद्युत कक्षाचे उपअभियंता श्री राजेश एडले, कनिष्ठ अभियंता आकाश सोळंके व अभियांत्रिकी विभागातील सर्वच कर्मचा-यांचे प्रयत्न फलदायी ठरले आहेत.

## थोडक्यात

### स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. आर.डी. सिकची, प्राचार्य डॉ. व्ही.एच. नागरे, प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, ननसा संचालक डॉ. अजय लाड, सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकुर तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालन व स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### निपुण महाराष्ट्र अभियानतर्फे उन्हाळी शिबिर



**अमरावती :** विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वृद्धिगत करण्याकरिता निपुण महाराष्ट्र अभियान व त्या अंतर्गत प्रस्तुत कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने शालेय वेळेमध्ये कृती कार्यक्रम सर्व शाळेमध्ये सुरू आहे. या उपक्रम अंतर्गत शालेय व्यतिरिक्त वेळ वापरणे आणि सुट्टीच्या कालावधीचा सदुपयोग करता येईल त्याकरिता विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्यस्तरावर आणण्यासाठी गाव व शाळा पातळीवर उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात चा मानस ठरला आहे. अशा शैक्षणिक शिबिराद्वारे विद्यार्थ्यांमधील संभाव्य शैक्षणिक तफावत भरून काढण्यास मदत होईल आणि त्या शैक्षणिक प्रगतीत सातत्य राखणे जाऊ शकेल या शिबिरामुळे विद्यार्थ्यांची पायाभूत शैक्षणिक कौशल्य अधिक सक्षम होऊन पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक तयारी होऊ शकेल या उपक्रमांतर्गत इयत्ता दुसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांचा वाचन लेखन अंक ज्ञान व गणितीय क्रिया सोडता यावी यासाठी प्रयत्न करण्यात येईल दररोज किमान आपल्या वेळेनुसार लीडर माता किंवा सदस्य माता किंवा स्वयंसेवक यांच्यामार्फत शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन केले आहे.

### समज-अपसमज विषयावर व्याख्यान

अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि मानस प्रबोधनी, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ''स्किझोफ्रेनिया : समज-अपसमज'' या विषयावर नुकतेच अतिथी व्याख्यान संपन्न झाले. अमरावती शहरातील मानस हॉस्पिटलचे मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक डॉ. पंकज वसाडकर यांचे विद्याथ्र्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. आज आपण विज्ञान, तंत्रज्ञान, आणि वैद्यकीय प्रगतीच्या अनेक टप्प्यांवर पोहोचलो आहोत. पण मानसिक आरोग्याविषयी आपल्या समाजात अजूनही अज्ञान, भीती आणि गैरसमज आहे. स्किझोफ्रेनिया हा याच अज्ञानाचा बळी ठरलेला आजार आहे. हा आजार म्हणजे व्यक्तीच्या विचार प्रक्रियेचा, वास्तव जाणिवेचा आणि सामाजिक वागणुकीचा विस्कळीतपणा होय, मात्र समाजात त्याला कलंक लावला जातो, त्यामुळे अशा रुग्णांसाठी तो अधिक त्रासदायक ठरतो. रोग बरा होत नाही, धोकादायक आहे, अशा प्रकारच्या प्रवृत्तीमुळे अनेक रुग्णांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. स्किझोफ्रेनियाच्या रुग्णांकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. परिणामी रुग्ण लपवले जातात व योग्य ते उपचार त्यांना मिळत नाहीत. अध्यक्षीय भाषणात विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्किझोफ्रेनिया म्हणजे तुटलेली ओळख नव्हे, ती नव्याने जोडण्याची संधी आहे. आपण त्यांचा आरसा होऊ. समाजातील प्रत्येकाने मानसिक रुग्णांकडे सहानुभूतीने पाहण्याची गरज आहे. कलंक, टीका किंवा उपेक्षा करू नये. त्याऐवजी समजूतदारपणाचं वातावरण निर्माण करावे आणि अशा रुग्णांना आधार द्यावा, असे आवाहन केले. व्याख्यानाच्या माध्यमातून विद्यार्थी तसेच समुपदेशक यांना आजाराची लक्षणे, कारणे, उपचारपध्दती व समज-अपसमज यांची सखोल माहिती देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल वानखडे, तर आभार प्रा. जुबेर खान यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मंजुषा बारबुध्दे, प्रा. शिवाणी अग्रवाल, प्रा. अर्चना ढोरे, प्रा. सुरेश राहेटे, प्रा. प्रियंका तायडे यांनी परीश्रम घेतले.

### लालबहादुर शास्त्री विद्यालयाचे माजी विद्यार्थी व शिक्षकांचा मेळावा

**धामक :** २२ वर्षांनंतर, शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी आज शाळेची घंटा वाजवून एक अनोखी आठवण जागवली. शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांनी शाळेला भेट दिली. शिवनी रसुलापूर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयातील इयत्ता अकरावी बारावी वर्गातील सन २००२ च्या दिवसभर चाललेल्या या स्नेह मेळाव्यात राष्ट्रगीत, प्रार्थना, परिचय, सत्कार भोजन, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमाने स्नेह मेळावा साजरा झाला. यावेळी प्राचार्य प्रा. काळे, प्रा.पाथरे, प्रा.थोरात, प्रा. कुऱ्हाडे, तूरनकर, सर आत्राम सर प्रामुख्याने उपस्थित होते. संचालन जयश्री काकडे, वैभव गोपाळ, मनोगत प्रशांत काळे, मनोज जांगडा, नरेश वैघ, शितल दांडगे, नितीन जैन तर आभारप्रदर्शन प्रज्ञा सावदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन बांधते, विनोद मलवार, सुषमा वैघ, प्रीती शिरभाते, विक्रम सुफलकर, चंद्रशेखर दुधमोचन, अभिजीत देशमुख, विनोद रघूते, धिरज वंजारी, जितू लोहकरे, लक्ष्मण कावरे, निलेश झोपाटे, मगेश गुड, संरला कळबे, निता देशमुख, सारिका सोनोने, हर्षी खराबे, सुनिता भस्मे, अंजली वंजारी, गायत्री ईरतकर, ज्योती दाणी, फारूक नसिम बेग, शेख अखिल, सुनील वाघाडे, संजय वानखेडे, श्रीकांत अंलोने, प्रविण सिनपूरे, राजेश उके, कविश्वर धांदे, पंकज सोनोने, कोकिळा सुफलकर, गोपाल ईखार, राहूल परळीकर, मनोज जुमळे, नितीन ईझळकर, नितेश ईझळकर, गोपाल राऊत, संदीप गायकवाड, नितीन खापरी, बडू मुंन यांनी अथक परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांनी कृषि संकल्प अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा-डॉ.के.पी. सिंह

## कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूरतर्फे जिल्ह्यात १२ जून पर्यंत विकसित कृषि संकल्प अभियान राबविणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि. ३० :** देशातील शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने एक यशस्वी पाऊल म्हणून दि. २९ मे पासून देशभरात एकाच वेळी विकसित कृषी संकल्प अभियान केंद्र शासनातर्फे, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री मा. शिवराज सिंह चव्हाण यांच्या नेतृत्वात राबविण्यात येत असून, या अभियानाच्या अमरावती जिल्ह्यातील यशस्वीतेची जबाबदारी कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापुर यांच्याकडे देण्यात आली आहे. यादरम्यान दि. २९ मे ते १२ जून या कालावधीत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे शास्त्रज्ञ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे प्राध्यापक, शास्त्रज्ञ, संशोधक, कृषी विभाग, आत्माचे विविध अधिकारी तसेच कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूरचे विविध कृषी शास्त्रज्ञ, विषय विशेषज्ञ, इफको कंपनी, कोरोमंडल इंडिया लिमिटेड, शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी व प्रगतिशील शेतकरी वर्तमानातील शेतीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन जिल्ह्यातील विविध गावातील शेतकऱ्यांना करणार आहेत. या शेती आणि शेती विकासाशी संबंधित विकसित कृषी संकल्प अभियानात शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापुर (बडनेरा) जिल्हा अमरावतीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. के. पी. सिंह यांनी जिल्हा मराठी पत्रकार संघ येथील पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषदेस कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूरचे विषय विशेषज्ञ डॉ. प्रतापराव जायले, कार्यालय अधीक्षक संतोष देशमुख, साधना रेडिओ ९०.४ चे स्टेशन मास्टर



संजय घरडे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सिंह म्हणाले की कृषी विज्ञान केंद्र दुर्गापुरने या अभियानासाठी आपला चमू तयार केला असून अमरावती जिल्ह्यातील ९० गावात हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानादरम्यान प्रत्येक गावातील शेतकऱ्यांना जैविक शेतीचे महत्व, बीज प्रक्रिया, जैविक खते व कीडनाशकाचा संतुलित वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, उत्पन्न वाढीसाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन, कृषी तंत्रज्ञान, ड्रोन प्रात्यक्षिके, बियाणे उगवण क्षमता प्रात्यक्षिके आदि अनेक बाबींवर सखोल आणि महत्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या अभियाना ची माहिती प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने गावागावातून कृषी चित्ररथ परिभ्रमण करणार आहेत असेही ते म्हणाले. भारत सरकारतर्फे अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येतात, मात्र काही योजनांची व्यवस्थित माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास अवधी लागतो. ही अडचण या अभियानाच्या माध्यमातून दूर होणार असून या दरम्यान भारत सरकारच्या संपूर्ण योजनांची माहिती शेतकऱ्यांना त्याच्या गावात जाऊन देण्यात येणार असल्याने हे अभियान शेतकऱ्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. शेती करताना शेताचा पोत, पाण्याची घनता आणि वातावरण याचा मोठा परिणाम उत्पन्नावर होतो. शेतकऱ्यांनी त्यासाठी माती, पाणी परीक्षण कसे व कोठे करावे त्याचे नियोजन आणि कालावधी नमुने घेण्याची पद्धती शेतकऱ्यांनी पीक घेताना नवनवीन वाणाचा वापर कसा करावा, ती कोणती आहेत व आपल्या भागातील वातावरण पर्जन्यमान आणि हवामानात त्या कशा पद्धतीने फायदेशीर ठरू शकतात या सर्व आदि अनेक बाबींवर विकसित कृषी संकल्प अभियानात शेतकऱ्यांना सांगण्यात येतील असेही ते म्हणाले. तसेच डॉ. जायले म्हणाले की, आपल्या भागात संत्रा हे मुख्य हे महत्त्वपूर्ण नगदी पीक असून संत्रा पिकावरील विविध रोग, किडी त्याचे व्यवस्थापन, संत्र्यावरील प्रक्रिया उद्योग उभारणीला आपल्या भागात असलेला वाव, विक्री व्यवस्थापन आदी विषयी मार्गदर्शन या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत यशस्वीरित्या पोहोचविणे सहज शक्य आहे असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत उपस्थित सर्व मान्यवरांनी पत्रकाराच्या प्रश्नांना यथोचित उत्तरे दिली. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे तो ताठ राहिला तरच देश ताठ राहू शकतो असा सूर या पत्रकार परिषदेतून उभारला. सूत्रसंचालन कृषि विज्ञान केंद्र दुर्गापुरचे कार्यालय अधीक्षक संतोष देशमुख यांनी केले तर साधना रेडिओ ९०.४ चे स्टेशन मास्टर संजय घरडे यांनी उपस्थित पत्रकाराचे आभार मानले.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची संधी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे राज्यातील नवयुवक व नवयुवतीसाठी दि. १६ जून ते २९ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६५ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क व्यवस्था करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाच्या संधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे ५ जून मुलाखतीस हजर रहावेत. मुलाखतीस येते वेळी या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील सीडीएस-६५ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावे. केंद्रामध्ये सी.डी. एस. कोर्समध्ये प्रवेश खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येताना सोबत घेऊन यावेत. अ) उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत उच्चस्तरीय बैठक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आज पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालयात एक महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संयुक्त कृती समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत २०१६ नंतर लागू झालेल्या सातव्या वेतन आयोगानुसार १०, २०, ३० वर्षांच्या पदोन्नती योजनेची अंमलबजावणी,



प्रलंबित अनुकंपा प्रकरणे, ३५७ विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक कार्यालय स्थापन करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजा रोखीकरण, २००५ पूव नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना आणि रिक्त पदे भरण्याच्या कार्यवाहीसह इतर विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. डॉ. देवळणकर यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेतल्या व सकारात्मक भूमिका घेत आश्वासन दिले की, लवकरच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि वित्त विभाग यांच्यासमवेत संयुक्त कृती समितीची बैठक घेण्यात येईल. या बैठकीत प्रत्येक विषयावर ठोस निर्णय घेण्यासाठी कार्यवाहीला गती दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष अजय देशमुख, प्रमुख संघटक रावसाहेब त्रिभुवन, मिलिंद भोसले, तसेच प्रकाश म्हसे, संदीप हिवरकर, सतीश वाघमारे, शिवराम लुटे, विजय घरत, श्री. धोत्रे, श्री. चिमूरकर, विकास मोहिते, अशोक कदम, अशोक रानवडे, दिनेश उथळे, शशिभूषण हुसे, चंद्रशेखर कदम, गोपाल सोनवणे, आनंदा अंकुश, संतोष मदने व इतर विद्यापीठ, महाविद्यालय व महासंघांचे पदाधिकारी उपस्थित होते. संयुक्त कृती समितीच्या वतीने बैठक सकारात्मक झाल्याचे सांगण्यात आले असून, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर लवकरच निर्णय अपेक्षित आहे.

# उत्तमसरा ग्रामपंचायतला ५ लाखाचे बक्षिस

## महिला बाल स्नेही ग्रामपंचायत म्हणून जिल्ह्यातून निवड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**भातकुली दि. ३० :** ग्रामपंचायत उत्तमसरा ता. भातकुली जिल्हा अमरावती येथे ऍनिमिया मुक्त गाव प्रशिक्षण घेण्यात आले सदर प्रशिक्षणास विस्तार अधिकारी आरोग्य उमेद तालुका व्यवस्थापक सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य व बचत गट प्रेरिका अंगणवाडी सेविका सर्व गावातील कर्मचारी उपस्थित होते प्रशिक्षक म्हणून प्रमोद शिंदे,प्रशिक्षक यशदा पुणे यांनी मार्गदर्शन केले सोबत सरपंच हनवतखेडा तायडे मॅडम व गुल्हाने सर अतिश सर उपस्थित होते.

या ग्रामपंचायतला शासनाचे ५लाखाचे बक्षिस घोषित झाले आहे. या प्रशिक्षणास धर्मेंद्र मधुकरराव मेहरे, सरपंच ग्रामपंचायत उत्तमसरा, संगिता गणेशराव मानकर, उपसरपंच



ग्रामपंचायत उत्तमसरा,ग्रामसेवक आशिष अंबाडकर,ज्ञानेश्वर रामदास मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य,श्रीमती किर्ती देवानंद मेश्राम, ग्रामपंचायत सदस्या, सौ. अपर्णा शरदराव झाडे, ग्रामपंचायत सदस्या,सौ. मनिषा दिपकराव शेवतकर, ग्रामपंचायत सदस्या, वनिता भाष्कर शेवतकर, ग्रामपंचायत सदस्या, नितीन यशवंतराव राऊत, ग्रामपंचायत सदस्य, दिलीप हरीभाऊ व-हेकर, ग्रामपंचायत सदस्य, सुधीर मंडवे, विस्तार अधिकारी (आरोग्य) पंचायत समिती भातकुली, भुषण देशमुख, तालुका समन्वयक, उमेद पंचायत समिती भातकुली, सोनाली देशमुख, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र,उत्तमसरा, अमित नससिंगकर, आरोग्यसेवक, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उत्तमसरा श्रीमती हिरेकर, आरोग्यसेविका, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उत्तमसरा श्रीमती मंगला वानखडे, आरोग्यसेविका, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उत्तमसरा, श्रीमती मिनाक्षी इंगळे, मुख्याध्यापक, जि.प.शाळा (प्राथमिक) उत्तमसरा, लोमेश खैरकर, मुख्याध्यापक, जि.प.शाळा (माध्यमिक) उत्तमसरा, सौ. मुक्ता कांबे, बचत गट प्रर्वतिका, उत्तमसरा, सौ. दिपाली मेहरे, बचत गट प्रर्वतिका, उत्तमसरा, सौ. प्रणोती मेहरे, अध्यक्षा, एकता ग्रामसंघ,उत्तमसरा, सौ. विना दहीकर, सचिव, एकता ग्रामसंघ,उत्तमसरा, सौ.योगिता सवाई, अध्यक्षा संघर्ष ग्रामसंघ, उत्तमसरा, आरती सवाई, सचिव संघर्ष ग्रामसंघ, श्रीमती भिंगारे, अंगणवाडी सेविका, उत्तमसरा, अंगणवाडी मदतनिस, श्रीमती सुरेखा सवाई, आशा स्वयंसेविका, श्रीमती संगिता निंभोरकर, आशा स्वयंसेविकासह अमित पेढेकर शिपाई,शुभम अवचार पाणी पुरवठा कर्मचारी,अरविंद मावंदे सफाई कामगार,पल्लवी राऊत संगणक परिचालक उपस्थित होते.

## सेवा गौरव पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांचा सत्कार



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देवून सन्मानित केलेले कर्मचारी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक उमेश लांडगे, विकास विभागाच्या अधीक्षक उमा चांभारे, परीक्षा विभागातील वरिष्ठ लघुलेखक प्रवीण अलटकर, वित्त विभागातील वरिष्ठ सहायक प्रज्ञा बोंडे, प्रयोगशाळा परिचर गजानन देशमुख यांचा विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. पतसंस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे यांचे हस्ते सर्व सत्कारमूर्तींचे पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, योग्य अधिकारी व कर्मचारी यांची उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारासाठी निवड झाली. सर्व पुरस्कारप्राप्तकर्त्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे. विद्यापीठाला व पर्यायाने त्यांनी विद्यार्थी व अभ्यागतांना तत्पर सेवा देवून विद्यापीठाच्या नावलौकीकात भर घातली आहे. अध्यक्ष मंगेश वरखेडे म्हणाले, सत्कारमूर्तीना मिळालेला पुरस्कार सर्वोच्च असून त्यांनी सेवाकाळात केलेल्या कार्याची दखल कार्यालयाने घेतली. विद्यापीठाच्या या मानाच्या पुरस्कारासाठी नि:ष्पक्षपणे निवड केल्या जाते.

# डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांशी साधला संवाद

## विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच संवाद उपक्रमाचे आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची धुरा ज्यांच्या यशस्वी नेतृत्वाखाली गतिमान आहे आणि त्यांनी अल्प कर्मचारी संख्या असूनही कर्मचाऱ्यांमध्ये संस्थेविषयी आपुलकी निर्माण करून विद्यापीठाची प्रशासकीय यंत्रणा इतर विद्यापीठांच्या तुलनेत अधिक गतिशील करून दाखविली मिलींद असे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नुकताच विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात विद्यापीठ कर्मचाऱ्यांशी एका विशेष संवाद साधला. याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी कुलगुरू आणि कर्मचायांमध्ये संवाद सभा संपन्न झाली. संवाद सभेचा मुख्य उद्देश कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संवाद वाढवणे, कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेणे आणि विद्यापीठाच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याच्या संधींवर चर्चा करणे होता. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठाने लागू केले आहे,

त्यामुळे ते समजून घेऊन त्याची परिपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी परिश्रम



घेण्याची गरज आहे. याप्रसंगी त्यांनी विद्यापीठाची सद्यस्थिती व आगामी योजनांबद्दल तसेच शैक्षणिक आणि प्रशासकीय उदिष्टांबद्दल विस्तृत माहिती दिली. विद्यापीठाला ४२ वर्ष पूर्ण झाली आहेत. या विद्यापीठाचे वटवृक्षात रूपांतर करण्यासाठी येथील कर्मचाऱ्यांनी आजवर अथक परिश्रम घेऊन विद्यापीठाचा नावलौकिक जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी बहुमूल्य योगदान दिले आहे, याबद्दल कुलगुरूंनी सर्वांचे कौतुक करून सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या विकासात आणखी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. कर्मचाऱ्यांनीही आपली मते, सूचना आणि काही समस्या कुलगुरूंसमोर मांडल्या. कुलगुरूंनी कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले आणि त्यावर योग्य विचार करून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना त्यांनी थेट उत्तरे दिलीत आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.

या संवाद सभेमुळे कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली.

दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या भूमिका समजून घेण्यास आणि भविष्यात अधिक चांगल्या प्रकारे समन्वय साधण्यास या संवाद सभेमुळे व्यासपीठ मिळाल्याची भावना कर्मचायांनी मांडून आनंद व्यक्त केला. संवाद सभेचे संचालन कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक श्री रमेश जाधव यांनी केले. यावेळी वर्ग २ ते ४ पर्यंतचे सर्व कर्मचारी सभेला मोठा संख्येने उपस्थित होते.

## घटना-घडामोडी



### आर्णी येथे शांतता बैठक संपन्न

**आर्णी :** येथे ईद व आगामी सर्व सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नुकतीच एक महत्वाची बैठक संपन्न झाली. आर्णी शहर शांत असून, एखादा अपवाद वगळता नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी पोलीस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले. नागरिकांनी कोणतीही संशयास्पद माहिती पोलिसांना द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस बाबा कंबलपोष दर्गा ट्रस्टचे रियाज बेग, व्यापारी कांतीलाल कोठारी, पत्रकार संघाचे अध्यक्ष आबीद फानन, ज्येष्ठ समाजसेवक प्रल्हाद इंगळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रशांत देशमुख, सुरज तेलगोटे, पोलिस उपनिरीक्षक कपिल मस्के व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



### नागरिकांनी वाचला तक्रारींचा पाढा, प्रलंबित समस्यांवर पालकमंत्र्यांचा संवाद

**यवतमाळ :** दिग्रस तालुक्यातील प्रलंबित तक्रारींचा पालकमंत्री संजय राठोड यांनी गुरुवारी यवतमाळ येथे आढावा घेतला. त्यांनी तक्रारदार-अर्जदारांशी थेट संवाद साधून समस्या जाणून घेत अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाहीच्या सक्त सूचना दिल्या. यावेळी नागरिकांनी समस्यांचा पाढाच वाचून दाखविला. पालकमंत्र्यांच्या कार्यालयाकडे ऑनलाइन आलेल्या व विविध विभागांकडून वेळेवर कार्यवाही न झालेल्या तक्रारींवर त्यांनी तक्रारदारांसमक्ष सविस्तर चर्चा केली. ५०हून अधिक तक्रारदारांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या घरकुल, पाणीपुरवठा, नाले, स्मशानभूमी, रस्ते, अतिक्रमण, वीज, विकासकामे यांसारख्या अनेक गंभीर समस्यांवर कालमर्यादेत योग्य तोडगा काढण्याचे सक्त निर्देश दिले. या महत्त्वपूर्ण बैठकीस उपवनसंरक्षक डॉ.बी.एन. स्वामी, उपविभागीय अधिकारी आशीष बिजवल, बांधकाम कार्यकारी अभियंता महेश माथुलकर, तहसीलदार मयूर राऊत, गटविकास अधिकारी खरोडे, मुख्याधिकारी अतुल पंत, उपविभागीय कृषी अधिकारी एस.एच.गोसावी, तालुका कृषी अधिकारी एस.एस.राजपूत, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आशीष पवार, अरुणावती प्रकल्पाचे सहायक अभियंता अखिल चव्हाण, जलसंधारण अधिकारी प्र.ह.सैनी यांच्यासह सर्व उपविभाग व तालुकास्तरीय संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### युवासेनेचा अन्नदान उपक्रम समाप्त

**यवतमाळ :** यवतमाळ शहरात युवासेनेने गरीब, हतबल तसेच



मुलांनी सोडून दिलेल्या वृद्धांना आधार देण्यासाठी सुरू केलेला 'अडॉप्ट वन सिनीयर सिटीझन फॉर मिल' हा महत्त्वपूर्ण अन्नदान उपक्रम तब्बल १११ दिवसांनंतर नुकताच समाप्त झाला. या उपक्रमाचे समाजातील सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रेरणेतून, शिवसेना नेते पराग पिंगळे, बाळा दौलतकार यांच्या मार्गदर्शनात युवासेना राज्य सदस्य, लोकसभा अध्यक्ष ॲड. विशाल सुषमा राजेश गणात्रा यांनी उपक्रम राबवला. गरजू वृद्धांचे सर्वेक्षण करून, नेहरू चौकातील किचनमधून व घरोघरी दररोज ७०-८० वृद्धांना जेवण दिले. अनेक दात्यांनीही यासाठी मदत केली. यशस्वीतेकरिता विपुल कारीया, पवन राठोड, संकल्प तासारे, देव अघेरा, निकुंज दत्ताणी, अमिश वाघेला, विपुल देशमुख, सारंग औदार्य, आकाश चव्हाण, सागर तिवारी, जीत पवार, दिग्वीजय शिंदे, पारस अराठे, अपुर्व शर्मा, रोहीत राय, संकेत सांगाणी, अभिषेक सोमय्या, जय गंडेचा, शुभम कोथुरकर, बंटी शेंडे, अभिषेक सावले, जय कारीया, शुभंकर भट, यश गावंडे, विकास कोल्हे, विनीत हातगावकर, हिमांशु ठाकुर, प्रफुल बाजोरीया, हर्षल वसाद, प्रसाद कडू, सुयोग पवार, अक्षय मानकर, प्रज्वल थुल, पुष्पक गुजर, जीवन ठाकरे, अर्जुन खरतडे, अंशुल खडसे, निपून राजा, अभिषेक भट्टी यांनी परिश्रम घेतले. 'लवकरच पुन्हा असाच उपक्रम सुरू करण्याचा मानस आहे,' असे विशाल गणात्रा म्हणाले.

# 'ऑपरेशन प्रस्थान' कॅबिनेटपुढे मांडणार

## पालकमंत्री संजय राठोड यांचे प्रतिपादन, पथदर्शी उपक्रम राज्यभर राबविणार!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



> **'ऑपरेशन प्रस्थान' राज्यव्यापी होणार?**
>
> पालकमंत्री संजय राठोड यांनी 'ऑपरेशन प्रस्थान'च्या यशाचे कौतुक करत, हा उपक्रम राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करणार असल्याचे सांगितले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मितीसाठी हे अभियान राबवण्याची विनंती ते इतर मंत्र्यांना करणार आहेत. यवतमाळमधील २० हजार मुलींना प्रशिक्षण देण्याचेही त्यांनी सुचवले.

**यवतमाळ. दि. ३० मे:** पालकमंत्री संजय राठोड 'ऑपरेशन प्रस्थान'चे यश राज्याच्या कॅबिनेटमध्ये मांडणार असून, हा पथदर्शी उपक्रम राज्यभर राबवण्याची विनंती करणार आहेत. एसपी कुमार चिंता यांच्या संकल्पनेतील या अभियानाचे त्यांनी मुलींच्या कराटे प्रशिक्षण शिबिर समारोपात कौतुक केले.

यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या वतीने, पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेले 'ऑपरेशन प्रस्थान' हे अभियान मुली व महिलांचा आत्मविश्वास वाढविण्यासोबतच बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणारे एक अत्यंत उपयुक्त आणि पथदर्शी अभियान आहे. या अभियानाची दखल राज्य पातळीवर घेतली जाईल आणि राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याचे सादरीकरण करून, राज्यातील सर्व मंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यात हे अभियान प्रभावीपणे राबविण्याची विनंती आपण करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. ते गुरुवारी, २९ मे रोजी 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत मुलींसाठी आयोजित कराटे प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी पोलीस कवायत मैदानावर बोलत होते. यावेळी पालकमंत्री राठोड पुढे म्हणाले की, समाजात अजूनही काही अप्रिय घटना घडत आहेत, ज्या मन सुन्न करतात. महिला आणि मुलींना आत्मसंरक्षणाचे धडे दिल्यास त्या स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम होतील. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सामाजिक जाणिवेतून हे अभियान सुरू केले असून, यामुळे महिला व मुलींचा आत्मविश्वास निश्चितच वाढणार आहे. जिल्ह्यात या उपक्रमांतर्गत सुरुवातीला १,७०० मुलींना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन होते, परंतु आता जिल्ह्यातील सर्वच विद्यार्थिनींना यात सामावून घेत, किमान २० हजार मुलींना हे प्रशिक्षण द्यावे, यासाठी लागणाऱ्या निधीची कमतरता भासू देणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले. 'ऑपरेशन प्रस्थान' भविष्यात एक मोठी सामाजिक चळवळ बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी पोलीस अधीक्षक कुमार चिंता, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्यासह पोलीस विभागाचे अनेक अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी, प्रशिक्षणार्थी मुलींनी कराटेची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. काही मुलींनी आपले अनुभव कथन केले, तर प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रेही वितरित करण्यात आली. प्रशिक्षणासाठी सहकार्य केल्याबद्दल डॉ. वृषाली माने, कराटेचे राष्ट्रीय पंच डॉ. आनंद भुसारी व त्यांचे सहकारी, निलेश रोकडे, डॉ. धर्मेश चव्हाण, परिचारिका वैशाली गभणे, शारदा उईके, ॲड. प्राची निलावार, दुर्गा तुमराम, आशिष इंगळे यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## बाजारपेठेतील रस्त्याची अखेर मलमपट्टी

### 'दै. अजिंक्य भारत'चा दणका, स्थानिक प्रशासनाला जाग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



अजिंक्य भारत बातमीचा दणका

**पोफाळी, दि. ३० :** उमरखेड तालुक्यातील मुळावा या मुख्य बाजारपेठेच्या गावात पहिल्याच पावसानंतर रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत 'दैनिक अजिंक्य भारत'ने प्रकाशित केलेल्या वृत्ताची स्थानिक प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. प्रशासनाने मुख्य बाजारपेठेतील रस्त्यांवरील साचलेला चिखल हटवून त्यावर चुरी टाकून रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती केली आहे.

मुळावा गावात पावसाच्या पहिल्याच सरीने रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य पसरले होते आणि बाजारपेठेला अक्षरशः तळ्याचे स्वरूप आले होते. यामुळे प्रवासी, नागरिक, रुग्ण, महिला आणि मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. 'दैनिक अजिंक्य भारत'ने 'मुळाव्यात बाजारपेठेला तळ्याचे स्वरूप; विकासकामांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष' या मथळ्याखाली सर्वप्रथम वृत्त प्रकाशित करून या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या वृत्तानंतर खडबडून जागे झालेल्या स्थानिक प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करत मुख्य बाजारपेठेतील मार्गावर साचलेला चिखल जेसीबी आणि मजुरांच्या साहाय्याने साफ केला. त्यानंतर या संपूर्ण रस्त्यावर चुरी टाकून तो वाहतुकीसाठी सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या कार्यवाहीमुळे रस्त्याने प्रवास करणाऱ्या महिला, मुले, नागरिक तसेच व्यापारी वर्गाने काहीसा मोकळा श्वास घेतला असून, त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. 'दैनिक अजिंक्य भारत'ने त्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडल्याबद्दल नागरिक व व्यापारी वर्गाकडून वृत्तपत्राचे सर्वत्र कौतुक होत आहे. तथापि, रस्त्यांची कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती व्हावी, अशी मागणी कायम आहे.

## दाभडी येथून काँग्रेसची ३ जूनपासून 'शेतकरी आत्मसन्मान पदयात्रा'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**सावळी सदोबा, दि. ३० :** शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या आत्मसन्मानासाठी काँग्रेस पक्षाने 'शेतकरी आत्मसन्मान पदयात्रा' आयोजित केली असून, या भव्य मोहिमेचा प्रारंभ ३ जून रोजी आर्णी तालुक्यातील दाभडी गावातून होणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ या पदयात्रेचे नेतृत्व करतील. या पार्श्वभूमीवर, शुक्रवारी (दि. ३०) सावळी सदोबा येथे माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत मोघे यांनी सांगितले की, ही पदयात्रा केवळ आंदोलन नसून, विदर्भाच्या जनतेचा नवीन आवाज आहे. दाभडी हे तेच गाव आहे, जिथून २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना शेतमालाला दुप्पट भाव, महागाई नियंत्रण, शेतीसाठी भरघोस मदत आणि बेरोजगारीवर तोडगा अशी आश्वासने दिली होती. या पदयात्रेत शेतकरी, युवक, महिला व हजारो नागरिक सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीस जितेंद्र मोघे, सुनील भारती, बाळासाहेब शिंदे, विजय पाटील, रामचरण चव्हाण, किशोर भगत, बक्षूसेट सर्वे, उत्तम भेंडे, नामदेव चव्हाण, राजू चव्हाण, साहेबराव पुणटकर, राहूल देवतळे, संदीप कांबळे, सिद्धार्थ मुजमुले, बाबूसिंग चव्हाण, गौतम देवतळे, नितिन खोडे, अविनाश जाधव, प्रदीप जाधव, मनोहर बहादे, संतोष ढाले, मारु आडे, निळकंठ वाघमारे, विशाल भगत, नितेश राठोड, नितेश आडे व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अडाण नदीवरील पुलाचे काम रखडले

### पावसाळ्यात बोरी अरब परिसराचा संपर्क तुटण्याचा गंभीर धोका, कंत्राटदारांची हलगर्जी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

> **लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, जनता संतप्त**
>
> पालकमंत्री संजय राठोड आणि आमदार बाळासाहेब मांगुळकर हे या मार्गाचा वापर करत असूनही पुलाच्या समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. तात्पुरता पूल दरवर्षी पाण्याखाली जातो, २०२३ मध्ये तो खचलाही होता. यंदाही गैरसोय झाल्यास लोकप्रतिनिधी जबाबदार राहतील, अशी संतप्त भावना आहे.

**बोरी अरब, दि. ३० :** यवतमाळ जिल्ह्यातील बोरी अरब येथे अडाण नदीवरील पूल चार वर्षांपासून अपूर्ण असल्याने पावसाळ्यात संपर्क तुटण्याचा धोका आहे. कंत्राटदारांची हलगर्जी व लोकप्रतिनिधींच्या कथित दुर्लक्षामुळे शेतकरी, विद्यार्थी त्रस्त असून, नागरिक संतप्त झाले आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील अडाण नदीपात्रावरील जुना पूल २०२१ च्या अखेरीस तोडण्यात आल्यानंतर, तब्बल चार वर्षे उलटून गेली तरी नवीन पुलाचे बांधकाम अद्याप अपूर्णच आहे. यामुळे बोरी अरब आणि परिसरातील अनेक गावांचा संपर्क पावसाळ्यात उर्वरित भागाशी तुटण्याचा गंभीर धोका निर्माण झाला असून, स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे. कंत्राटदारांच्या कथित हलगर्जीपणामुळे या पुलाच्या शुभारंभाचा मुहूर्त कधी उजाडणार, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील अबरार नामक कंत्राटदाराने पुलाचे सुमारे ६५ टक्के काम केल्यानंतर ते अर्धवट सोडून दिले. त्यानंतर यवतमाळ येथील बाजोरिया नामक दुसऱ्या कंत्राटदाराने हे काम हाती घेतल्याचे समजते, मात्र अद्यापही ते पूर्णत्वास गेलेले नाही. गेल्या चार वर्षांपासून पावसाळ्याच्या दिवसांत तात्पुरता पूल अनेकदा आठ-आठ दिवस पाण्याखाली जात असल्याने बोरी अरब शहराला आणि परिसरातील गावांना मोठा फटका बसतो. २०२३ साली तर वारंवार आलेल्या पुरामुळे हा तात्पुरता पूल खचूनही गेला होता, ज्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. यंदाही तशीच परिस्थिती उद्भवल्यास खासगी वाहने, एसटी बस (लालपरी) सेवा पूर्णपणे बंद होऊन शेतकरी, शालेय विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवाशांचे अतोनात हाल होण्याची भीती व्यक्त होत आहे. दररोज याच मार्गावरून आपल्या मतदारसंघात ये-जा करणारे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कॅबिनेट मंत्री संजय राठोड आणि यवतमाळचे नवनिर्वाचित आमदार बाळासाहेब मांगुळकर (ज्यांच्या मतदारसंघाची ही शेवटची हद्द आहे) हे या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संतप्त नागरिक करत आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनेकदा पाहणी दौरे करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा होत नसल्याने, या दिरंगाईला आणि संभाव्य धोक्याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## 'त्या' दोन तलाठ्यांची तत्काळ बदली करा!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ३० :** तहसील कार्यालयातील तलाठी राजेश चौधरी व अमोल पुरी हे तालुक्यातील नदी-नाल्यांमधून होणाऱ्या प्रचंड अवैध रेती तस्करीला पाठबळ देत असल्याचा गंभीर आरोप करत, त्यांच्या तात्काळ बदलीच्या मागणीचे निवेदन आबिद फानन (रा. आर्णी) यांनी २६ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे आर्णी तहसीलदारांमार्फत सादर केले.

निवेदनानुसार, कवठा बाजार, राणी धानोरा, साकुर, मुकुंदपूर येथील घाटांवरून दिवसाकाठी शेकडो ब्रास रेतीचे सर्रास अवैध उत्खनन व वाहतूक होत असून, नदीपात्रात मोठे खड्डे पडले आहेत. अनेक वर्षांपासून येथे कार्यरत असलेल्या या दोन तलाठ्यांचे रेती माफियाशी मधुर संबंध असल्यामुळेच हा अवैध धंदा फोफावला असल्याचा स्पष्ट दावा करण्यात आला आहे. यामुळे सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना गंभीरपणे पसरली आहे. गतवर्षी साकुर घाटावर रेती माफियांमध्ये झालेल्या गोळीबारासारख्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि रेती तस्करीला आळा घालण्यासाठी या दोन्ही तलाठ्यांची तातडीने अन्यत्र बदली करावी, अशी मागणी फानन यांनी केली आहे. या बदलीमुळेच रेती तस्करांना निश्चितपणे चाप बसेल, असेही म्हटले आहे.

# घोटी येथील बुद्धविहारात मूर्ती प्रतिष्ठापना

## पूज्य भिक्खू संघाकडून धम्मदेसना, स्तुत्य उपक्रमामुळे अनाथपिंडक विहारात आनंदाचे वातावरण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**घाटंजी, दि. ३० :** तालुक्यातील घोटी येथील अनाथपिंडक बुद्धविहारात २५ मे रोजी बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना झाली. पूज्य भिक्खू संघाने धम्मदेसना देत, विहारात नियमित धम्मकार्य सुरू ठेवण्याचे आवाहन केले. शांतिदूत मुळे यांनी मूर्ती दान दिली. या समाजकार्यामुळे अनाथपिंडक विहारात मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील घोटी येथील अनाथपिंडक बुद्धविहारात रविवार, २५ मे रोजी बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना आणि धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहात आणि मांगल्यापूर्ण वातावरणात संपन्न झाले. याप्रसंगी अमरावती येथील पूज्य भिक्खू सारीपुत्त, यवतमाळ येथील पूज्य भिक्खू राहुल आणि पूज्य भिक्खू अश्वजीत यांच्या पवित्र उपस्थितीत बुद्धधम्माच्या संस्कार विधीनुसार बुद्ध प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. यानंतर उपस्थित पूज्य भिक्खू संघाने उपस्थितांना धम्मदेसना दिली. आपल्या धम्मदेसनेत पूज्य भिक्खू सारीपुत्त यांनी मैत्री आणि दानाचे महत्व विशद केले, तर पूज्य भिक्खू राहुल यांनी विहाराचे सामाजिक महत्व आणि बुद्ध धम्माची शिकवण यावर प्रकाश टाकला. पूज्य भिक्खू अश्वजीत यांनी आपल्या विवेचनात सांगितले की, केवळ मूर्ती बसविल्याने धम्मकार्य संपत नाही, तर या विहारांमध्ये वेळोवेळी बुद्ध वंदना, उपोसथ व्रत, बुद्ध पौर्णिमा यांसारखे धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम नियमितपणे व्हायला हवेत, जेणेकरून धम्माचे विचार समाजात रुजतील. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून फुले-आंबेडकर साहित्य संसद, यवतमाळचे अध्यक्ष किशोर भगत आणि प्रा. डॉ. अशोक कांबळे उपस्थित होते; त्यांनीही उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी विहाराला बुद्धमूर्ती दान देणारे शांतिदूत मुळे यांचा विहार समितीच्यावतीने विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, सामाजिक कार्यामध्ये महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल सुभाष गोडघाटे (बिलायता) आणि स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविल्याबद्दल प्रणय दामोदर कांबळे यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला सरपंच शुभांगी पुसनाके, उपसरपंच विनय जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष अरविंद राठोड व ग्रामपंचायत सदस्य पवन चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. सायंकाळी 'रात्र बुद्ध भीम गीताची' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात आशिष खरतडे, अक्षय नगराळे, सुनील नगराळे आदी कलाकारांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी घोटीसह विरूळ, कवठा, वागदा, पाटापांगरा, कापेश्वर, भांबोरा, यवतमाळ, शिरोली, घाटंजी आदी गावांमधून उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक खरतडे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रेमानंद उमरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जितेंद्र खरतडे, रुपक खरतडे आणि विहार समितीच्या अनेक सदस्यांनी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## दुर्मिळ कवड्या साप आढळला

### सर्पमित्रांकडून जीवदान, प्रथमेष जाधव यांच्या नेतृत्वात बचावकार्य

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. ३० :** दिग्रस तालुक्यातील चिंचोली येथे बुधवारी (दि. २८) एका घरात शिरलेला दुर्मिळ 'पिवळ्या ठिपक्यांचा कवड्या' (यलो स्पॉटेड वुल्फ स्नेक) या बिनविषारी सापाला 'एमएच-२९ हेल्पिंग हँड्स' संस्थेच्या सदस्यांनी सुखरूप पकडून नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. या सापाची आढळ अत्यंत कमी असल्याने त्याच्या संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

चिंचोली येथील एका घरात साप निघाल्याची माहिती 'एमएच-२९ हेल्पिंग हँड्स' संस्थेचे दिग्रस तालुकाध्यक्ष प्रथमेश जाधव यांना मिळाली. त्यांनी तात्काळ सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पाहणी केली असता, तो सुमारे १४ इंच लांबीचा पिवळ्या ठिपक्यांचा कवड्या साप असल्याचे निष्पन्न झाले. हा साप पूर्णपणे बिनविषारी असून, तो मुख्यत्वे रात्रीच्या वेळी सक्रिय असतो. त्याच्या शरीरावर तोंडापासून शेपटीपर्यंत पिवळे ठिपके असतात, जे मध्यभागी अधिक मोठे असू शकतात. दिसण्यास तो विषारी मण्यार सापासारखा असल्याने अनेकदा गैरसमज होतो. पाली, सरडे आणि पक्षांची अंडी हे त्याचे मुख्य खाद्य आहे. प्रथमेश जाधव आणि त्यांच्या टीमने या सापाला कौशल्याने पकडले. त्यानंतर दिग्रस वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अजय राऊत आणि क्षेत्रसहाय्यक प्रकाश जाधव यांना माहिती देऊन, त्यांच्या मार्गदर्शनाखाली सापाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. या बचावकार्यात निशांत बनसोड, राहुल रोडे, आशिष भस्मे, विजय कांबळे, संकेत ढोरे, रूपाली खिराडे, सुनील तायडे यांनी सहकार्य केले. विटांचे ढिगारे व खडकाळ प्रदेशात या सापाचे वास्तव्य असते, असे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## थोडक्यात

### लोखंडी पाईपने एकास मारहाण

**आर्णी :** तालुक्यातील महागाव येथे मुलांना पैसे न घेता आंबे का दिले, या कारणावरून एका कुटुंबाला चौघांनी मारहाण केल्याची घटना २८ मे रोजी सायंकाळी घडली. गुलाबराव नाटकर (वय ५५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी निरंजन राठोड याने त्यांना लोखंडी पाईपने मारले. तर, निरंजनचा भाऊ निवृत्ती राठोड याने फिर्यादीचा मुलगा प्रकाश याला मारून त्याचा हात फॅक्चर केला. फिर्यादीचा लहान मुलगा ओम व पत्नी यांनाही काठी, पाईप व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

### रेती तस्करीचा ट्रक पकडला

**आर्णी :** बोरगाव रोड परिसरात २९ मे रोजी पहाटे पोलिसांनी केलेल्या कारवाईत एक ब्रास रेतीची विनापरवाना चोरटी वाहतूक करणारा ट्रक पकडण्यात आला. याप्रकरणी पोलीस शिपाई समीर बन यांनी दिलेल्या तक्रारीवरून ट्रकचालक शेख जावेद शेख नुर (वय ३२, रा. अमराई पुरा, आर्णी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी अशोक लेलँड कंपनीचा ट्रक (एमएच-२९ बीई ९१२३) आणि ५ हजार रुपये किमतीची रेती असा एकूण ७ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

### जप्तीतील घरावर घेतला ताबा

**महागाव :** तालुक्यातील सातघरी येथे कर्ज प्रकरणामुळे फायनान्स कंपनीने जप्त करून सील केलेल्या घरात आरोपी कुटुंबाने कुलूप तोडून पुन्हा ताबा घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महिंद्रा रुरल फायनान्स लि.चे शाखा व्यवस्थापक अभय राकेश यांनी २९ मे रोजी तक्रार दिली. वसराम राठोड व त्यांच्या कुटुंबातील इतर तिघांनी संगनमत करून हे कृत्य केले. त्यांनी २०१? मध्ये १० लाख रुपयांचे गृहकर्ज घेतले होते, पण परतफेड न केल्याने मालमत्ता जप्त करण्यात आली होती.

### दुचाकी लंपास

**यवतमाळ :** पार्कींगमध्ये लावलेली दुचाकी लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी वाहन क्र. एम.एच. २९ बि.जिआर १६१९ किंमत २५,००० रूपयाची कोल्हे सभागृहाच्या पार्विंग्गमध्ये लावली असता अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना १७ मे रोजी घडली. यापकरणी मुरलीधर हिंमतराव चौधरी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द कलम ३०३ नुसार गुन्हा नोंद केला.

# उमरखेडमध्ये रासायनिक खतांची 'लिंकिंग'

## खरिपाच्या तोंडावर कृषी केंद्रांकडून शेतकऱ्यांची लूट; खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून आर्थिक शोषण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर

**उमरखेड, दि.३०: उमरखेड तालुक्यात खरीप हंगामाच्या तोंडावर कृषी केंद्रांकडून रासायनिक खतांची 'लिंकिंग'करून शेतकऱ्यांची लूट होत असल्याचा आरोप शेतकरी बांधवांकडून केला जात आहे. रासायनिक खतांच्या कृत्रिम तुटवड्याने शेतकरी हवालदिल झाले असून, कृषी विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



> 'यावर्षीच्या खरीप हंगामासाठी तालुक्याला पुरेसा खत पुरवठा झाला आहे. रासायनिक खतांची अजिबात टंचाई नाही. जर कोणी कृषी केंद्र चालक खते देण्यास नकार देत असेल, आगाऊ रक्कम मागत असेल किंवा 'लिंकिंग' करत असेल, तर शेतकऱ्यांनी तत्काळ कृषी विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवावी,'
>
> -गंगाधर बळवंतकर, तालुका कृषी अधिकारी, उमरखेड.

### कृषी विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

- जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड व जिल्हाधिकारी विकास मीना यांनी खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे पुरविण्याचे व रासायनिक खतांची "लिंकिंग" होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश कृषी विभागाला दिले आहे. उमरखेडमध्ये रासायनिक खतांची लिंकिंग' सुरू झाली असताना अधिकारी शेतकरी बांधवांना आधी तक्रार करा मग कार्यवाही करू असे आवाहन करीत आहेत. त्यामुळे कृषी विभागाच्या कार्यप्रणालीवरच प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

वेळेपूर्वीच सुरू झालेल्या जोरदार पावसामुळे उमरखेड तालुक्यातील पेरणीपूर्व कामांना वेग आला आहे. शेतकरी बी-बियाणे आणि रासायनिक खतांची जुळवाजुळव करण्यात व्यस्त असतानाच, त्यांना आवश्यक रासायनिक खते मिळत नसल्याने ते मोठ्या संकटात सापडले आहेत. या परिस्थितीचा फायदा घेत काही कृषी केंद्र चालक शेतकऱ्यांची अडचण ओळखून, महत्त्वाच्या रासायनिक खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती (लिंकिंग) करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असून, कृषी विभागाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शासनाचा कृषी विभाग शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी मुबलक प्रमाणात बी-बियाणे व रासायनिक खते उपलब्ध करून देण्यास जबाबदार असतो. यासाठी जिल्हास्तरावर हंगामपूर्व आढावा बैठका घेऊन खतांच्या मागणीचा व उपलब्धतेचा आढावा घेतला जातो. असे असतानाही, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना खते मिळत नसल्याने, 'मागणीनुसार उपलब्ध केलेला खतसाठा गेला कुठे? कृषी केंद्र चालकांनी साठवणूक तर केली नाही ना?' असे अनेक प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. रासायनिक खतांचे भाव आधीच गगनाला भिडलेले असताना, त्यातच कृषी केंद्र चालकांकडून होणाऱ्या या 'लिंकिंग'च्या गोरखधंद्यामुळे, पेरणीसाठी शेती तयार असूनही पेरणी कशी करावी, या विवंचनेत शेतकरी सापडले आहेत. एकीकडे शेतकऱ्यांचे असे आर्थिक शोषण सुरू असताना, दुसरीकडे तालुका कृषी विभाग आणि तालुका कृषी अधिकारी मात्र या सर्व प्रकाराकडे केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप होत आहे. मात्र, तालुका कृषी अधिकारी गंगाधर बळवंतकर यांनी तालुक्यात खतांचा पुरेसा पुरवठा झाला असून, कोणतीही टंचाई नसल्याचा दावा केला आहे.

**CAPTION**

### मे हीट नव्हे 'मे-हरियाली'...



**यवतमाळ :** यंदा मे महिन्यात झालेल्या अकाली पावसामुळे निसर्गात अनपेक्षित बदल दिसून येत आहेत. सामान्यतः मे महिन्यातील कडक उन्हामुळे करळगाव घाटातील वृक्षराजी निष्पर्ण झालेली असते, परंतु यावर्षी हा घाट हिरवाईने नटलेला आहे. ही हिरवीगार वनराई म्हणजे उन्हाळ्यात पावसाळ्याची अनुभूती देणारा निसर्गाचा एक आगळाच चमत्कार म्हणावा लागेल. ऋतू बदलला की महिना ओळखायला मार्ग नसल्याचा हा अनुभव शेकडो वर्षांत प्रथमच पाहायला मिळत असल्याचे मत व्यक्त होत आहे. ही अनोखी हिरवळ या बदलाची साक्ष देत असून, पर्यावरण बदलाच्या चर्चांनाही यामुळे उजाळा मिळावा आहे. निसर्गाचा हा मनोहारी बदल आश्चर्यचकित करणारा आहे. (छायाचित्र : जय राठोड, यवतमाळ)

# सव्वातीन लाखांचा गांजा जप्त

## दिग्रस पोलिसांची कारवाई; घरमालक अटकेत, अमली पदार्थांवर धाड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**दिग्रस, दि.३०:** दिग्रस तालुक्यातील साखरा येथे पोलिसांनी बुधवारी, दि. २८ मे रोजी दुपारी एका घरावर छापा मारून २७ किलो १०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला. या गांजाची अंदाजित किंमत ३ लाख २५ हजार २०० रुपये असून, तो पाच प्लास्टिक पिशव्यांमध्ये साठवला होता. याप्रकरणी घरमालक लक्ष्मण राजू चव्हाण (वय ५५, रा. साखरा) याला तत्काळ अटक करण्यात आली.

ही धडक कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी चिलुमुला रजनीकांत आणि पोलिस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अत्यंत गोपनीय पद्धतीने करण्यात आली. दारव्हा येथील पोलिस पथकातील अविनाश गोदामले यांच्यासह दिग्रसचे सहायक पोलिस निरीक्षक गोविंद पांडव, उपनिरीक्षक राजेश लाहेकर, पोलिस अंमलदार रवींद्र मोलेवार, महादेव फलटणकर, रवींद्र जगताप आणि अन्य पोलिसांनी ही धाडसी कामगिरी यशस्वीरीत्या पार पाडली. आरोपी लक्ष्मण चव्हाण याच्या साखरा येथील घराची झडती घेतली असता, पाच मोठ्या प्लास्टिक पिशव्यांमध्ये हा अमली पदार्थ विक्रीसाठी लपवून ठेवल्याचे उघड झाले. त्याला तत्काळ जेरबंद करून त्याच्याविरुद्ध संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करत आहेत. या मोठ्या कारवाईने परिसरात खळबळ उडाली.

# उन्हाळी पीक नुकसानीचे पंचनामे करा!

## मनसेची मागणी; शेतकऱ्यांना मदत द्या, अन्यथा आंदोलनाचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि.३०:** नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसाने आर्णी तालुक्यातील उन्हाळी ज्वारी, तीळ, भुईमूग, मका यांसारख्या काढणीला आलेल्या उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने तातडीने पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) केली आहे.

या मागणीचे सविस्तर निवेदन मनसेच्या शिष्टमंडळाने सोमवारी, दि. २६ मे रोजी आर्णी तहसीलदारांमार्फत यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेली तयार पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने शेतकरीवर्ग मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असून, त्यांना तत्काळ मदतीची नितांत गरज आहे, असे निवेदनात म्हटले आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन त्वरित पंचनामे पूर्ण करावेत आणि योग्य नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना शेतकऱ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून भव्य आंदोलन उभारेल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला. निवेदन देताना मनसे सैनिक महेश बाते, गौरव बावरे, सचिन यलगंधेवार, दीपक बोरकर, कपिल ठाकरे, बलदेव आडे, विकास ठमके, अभी सपाटे, धीरज कोडावे व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### वाहनाच्या धडकेत एकजण ठार



**मारेगाव, दि. ३० :** तालुक्यातील बोटोणी-जवळका दरम्यान शुक्रवारी (दि. ३०) सकाळी अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने आवळगाव येथील प्रदीप गुणवंत राऊत (वय ४०) हे जागीच ठार झाले. राऊत हे सकाळी ७ वाजता त्यांच्या सोयऱ्याला सासुरवाडी खंडणी येथे सोडून आवळगावकडे परत येत होते. गावातील गजानन पंधरे यांनी त्यांचा भाऊ अतुल राऊत यांना प्रदीप रस्त्यावर जखमी अवस्थेत पडल्याची माहिती दिली. अतुल, गावकरी व नातेवाईकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, प्रदीप रस्त्याच्या मधोमध डोक्याला गंभीर मार लागलेल्या अवस्थेत आढळले. अज्ञात वाहनाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात गाडी चालवून धडक दिल्याने मृत्यू झाल्याची फिर्याद अतुल राऊत यांनी दिली.

**→ दिन विशेष : जागतिक तंबाखूविरोधी दिन**

# तंबाखूमुळे भारतात एका मिनिटाला एकाचा मृत्यू

## डॉ. ज्ञानेश्वर पुनसे; निकोटीनमुळे कर्करोगाचा धोका

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ अतिश काळपांडे



> 'विशेषतः भारतात, तंबाखू चघळण्याच्या सवयीमुळे (गुटखा, पानमसाला, मावा, खर्रा आणि घोटलेला तंबाखू) तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. वेळीच निदान आणि उपचार न झाल्यास हा आजार प्राणघातक ठरू शकतो. त्यामुळे, तंबाखूच्या कोणत्याही प्रकारच्या सेवनाला 'नकार' देऊन निरोगी आयुष्याचा स्वीकार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.'
>
> -डॉ. ज्ञानेश्वर पुनसे, दंत चिकित्सक, माऊली हॉस्पिटल यवतमाळ

**यवतमाळ, दि. 30 :** भारत देशात एका मिनिटाला एका व्यक्तीचा मृत्यू केवळ तंबाखूमुळे होतो. निकोटीनमुळे कर्करोगाचा व हृदयरोगाचा वाढता धोका असल्याने नागरिकांनी तंबाखूला नकार देऊन निरोगी आयुष्याचा स्वीकार करावा, असे आवाहन येथील प्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ. ज्ञानेश्वर पुनसे यांनी केले आहे. ते जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त दैनिक 'अजिंक्य भारत'शी संवाद साधत होते.

**अजिंक्य भारत संवाद**

### निकोटिन: व्यसनाचा प्रारंभ आणि धोके

- तंबाखूतील निकोटिन मेंदूतील डोपामिनची पातळी वाढवून तात्पुरता आनंद देते, पण त्याचे पर्यवसान व्यसनात होते. यामुळे कर्करोग (फुफ्फुस, तोंड, घसा), उच्च रक्तदाब, हृदयविकार, आणि गर्भवती महिलांमध्ये गर्भाला हानी पोहोचते. मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीवरही याचा गंभीर परिणाम होतो.

दरवर्षी 31 मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो, ज्या[...] मुख्य उद्देश तंबा[...] सेवनामुळे होणारे गंभीर दुष्परिणाम, व्यसनमुक्तीचे महत्त्व आणि याविषयी व्यापक जनजागृती करणे हा आहे. तंबाखू हे केवळ एक व्यसन नसून, ती एक जागतिक आरोग्य समस्या बनली आहे, जी दरवर्षी लाखो लोकांच्या मृत्यूला कारणीभूत ठरते. तंबाखूमध्ये आढळणारे निकोटिन हे अत्यंत व्यसन लावणारे रसायन आहे. ते मेंदूतील 'डोपामिन'या रसायनाची पातळी वाढवून तात्पुरती आनंदाची भावना निर्माण करते, [...]्यामुळे व्यक्तीला [...]ारंवार तंबाखूची [...]फ येते आणि ती त्याच्या पूर्णपणे आहारी जाते. तंबाखूमध्ये निकोटिन व्यतिरिक्त सुमारे 7हजारपेक्षा अधिक हानिकारक रसायने असतात, त्यापैकी अनेक विषारी आणि थेट कर्करोगाला निमंत्रण देणारी (कॅन्सरकारक) आहेत. यामध्ये कार्बन मोनोऑक्साइड, टार, ॲसिटोन, अमोनिया, फॉर्मल्डिहाइड यांसारख्या घातक घटकांचा समावेश असतो. कार्बन मोनोऑक्साइडमुळे रक्तातील ऑक्सिजन वहन क्षमता कमी होते, तर टार फुफ्फुसांमध्ये साचून कर्करोगाचा धोका वाढवतो. तंबाखू सेवनाचे अल्पकालीन परिणामांमध्ये तोंडात दुर्गंधी, श्वास घेण्यास त्रास, हृदयगती वाढणे, चक्कर किंवा मळमळजाणवणे यांचा समावेश होतो. दीर्घकालीन परिणामांमध्ये हृदयविकाराचा झटका, फुफ्फुसांचे गंभीर आजार (सीओपीडी, ब्रॉंकायटिस), फुफ्फुस तोंड, घसा, अन्ननलिका यांचा कर्करोग, प्रजनन क्षमतेवर परिणाम, तसेच त्वचा आणि दातांचे गंभीर नुकसान यांचा समावेश होतो.



# बाजार समिती निवडणूक आखाड्यात 'अभद्र युती'

## भाजप-काँग्रेस गट एकत्र, तर काँग्रेस-शिंदे सेना विरोधात!; ३९ उमेदवार रिंगणात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ अरुण डोंगशनवर

**पांढरकवडा, दि. ३०:** पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ७ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजपा आणि काँग्रेस अशी मुख्यतः लढत होत असली तरी काँग्रेसमधील एक गट भाजपासोबत आहे; तर दुसरीकडे राज्यात काँग्रेस आणि शिंदे सेना विरोधात असताना मात्र स्थानिक पातळीवर काँग्रेस आणि शिंदे सेना एकत्र येत भाजपाविरोधात निवडणूक लढवीत आहे.

पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ७ जून रोजी होणाऱ्या १८ जागांच्या निवडणुकीकरिता भाजपा व काँग्रेसप्रणित पॅनेलच्या १८ -१८ उमेदवारांसह तीन अपक्ष उमेदवारांनी आपले नामांकन कायम ठेवल्याने निवडणुकीच्या मैदानात ३९ उमेदवार कायम आहेत. भाजपा-काँग्रेसप्रणित शेतकरी सहकार विकास पॅनेल हे माजी आमदार अण्णासाहेब देशमुख पारवेकर- आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवीत आहेत. दुसरीकडे राज्य पातळीवर एकमेकांचे विरोधात असलेले काँग्रेस आणि शिंदे सेना काँग्रेसचे अखिल भारतीय काँग्रेसच्या आदिवासी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे यांच्या नेतृत्वात सदर निवडणूक लढवीत आहेत. त्यांचेसोबत शिंदे सेनेचा खेतानी गट निवडणूक लढवीत सहकार क्षेत्रात आपली मुळे घट्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. ७ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीत १८ संचालकांपैकी सहकार संस्था मतदारसंघातून ११ संचालक निवडून द्यायचे आहेत. या संचालकांना २२ सहकारी संस्थांचे संचालक मतदान करणार आहेत. ग्रामपंचायत मतदारसंघातून चार संचालक निवडून द्यायचे असून त्यांना ग्रामपंचायतीचे सदस्य मतदान करणार आहेत. व्यापारी मतदारसंघातून दोन आणि हमाल मापारी मतदारसंघातून एक अशा १८ संचालकांच्या निवडणुकीसाठी ही निवडणूक पार पडणार आहे. महायुती सरकारने सर्वसामान्य शेतकऱ्यांना सुद्धा निवडणूक लढण्याचा अधिकार प्रदान केल्यानंतर होणारी कृषी उत्पन्न बाजार समितीची ही पहिलीच सार्वत्रिक निवडणूक होय.

### उमरखेड बाजार समितीसाठी आज मतदान

- उमरखेड : उमरखेड बाजार समितीच्या १८ संचालकपदासाठी आज, शनिवारी, ३१ मे रोजी मतदान होत असून, ४० उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. दोन प्रमुख राजकीय आघाड्यांत थेट लढतीने निवडणुकीची रंगत वाढली आहे. काँग्रेस, शिवसेना (उबाठा) व शिवसेनेने (शिंदे गट) एकत्र येत 'शेतकरी विकास आघाडी' (काँग्रेसप्रणीत) निर्माण केली आहे. तर, काँग्रेसमधून भाजपवासी झालेले माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर व विजयराव खडसे यांच्या नेतृत्वात, सत्यशोधक पॅनेलला सोबत घेऊन भाजपने 'वसंतराव नाईक शेतकरी विकास आघाडी' (भाजपप्रणीत) उभी केली आहे; त्यांच्यासाठी ही अतिशय महत्त्वपूर्ण पहिलीच मोही सहकारातील निवडणूक आहे.